

सीएए आणि एनआरसी

राज्यघटना बदलणारे सूत्र

हुमायून मुरसल



सीएए आणि एनआरसी

राज्यघटना बदलणारे सूत्र

हुमायून मुरसल

प्रकाशक
सोसायटी फॉर मुस्लिम्स सोशिअल चेंज, कोल्हापूर

सीएए आणि एनआरसी

राज्यघटना बदलणारे सूत्र

प्रकाशन दिनांक
२५ डिसेंबर २०१९

प्रकाशक
सोसायटी फॉर मुस्लिम्स सोशिअल चेंज
पुण्य प्रवाह,
आर. एच. ३, ५०२,
नागाळा पार्क,
कोल्हापूर.
मोबाइल : ९१७५४३७५४९
ई-मेल : humaunmursal@gmail.com

अर्थसहाय्य
मलिका आणि उमर फारुक शेख, कोल्हापूर.

मुद्रक
ए. आर. प्रिंटर्स, शनिवार पेठ, पुणे ३०.

बोल, के लब आजाद हैं तेरे
बोल, जबाँ अब तक तेरी है,
तेरा सुतवाँ जिस्म है तेरा;
बोल, के जाँ अब तक तेरी है ।
बोल, यह थोडा वक्त बहुत है।।
जिस्म ओ जाँ की मौत से पहले,
बोल, के सच जिंदा है अब तक;
बोल, जो कुछ कहना है कह-ले!

- फैज अहमद फैज

हिंदू, मुस्लिम, शीख, बौद्ध, जैन, ख्रिश्चन, पारसी आणि निधर्मी
सांस्कृतिक विविधतेला आणि एकात्मतेला बळकट करणाऱ्या ...
स्वातंत्र्यलढ्यातील एकीच्या आठवणी ताज्या करणाऱ्या...
जामिया मिल्लिया, अलिगड युनिव्हर्सिटी
आणि संपूर्ण भारतातील लढवय्या विद्यार्थी आणि
खासकरून विद्यार्थिनींना...
विनम्रतापूर्वक अर्पण!

अनुक्रम

प्रस्तावना

▶ नुकतेच वाचले, महाराष्ट्रात ११ महिन्यांत ११,००० शेतकऱ्यांनी आत्महत्या केल्या. शेतकरी आत्महत्या ही भारतीय अर्थव्यवस्थेतील सर्वांत गंभीर समस्या आहे. शेतमालाला भाव आणि सातबारा कोरा करण्याचे स्वप्न पाहत शेतकरी असेच दम तोडत राहतील. महागाईचा आगडोंब उसळला आहे. उच्च शिक्षण अत्यंत महागडे बनल्याने कष्टकऱ्यांच्या हातातून निसटत आहे. सामाजिक सुरक्षेची हालत खराब आहे. असंघटित क्षेत्रातील कामगार, मजुरांची अवस्था अत्यंत खराब आहे. बेरोजगारीने आजवरच्या इतिहासातील सर्वोच्चांक गाठला आहे. सरकारकडे या समस्येवर काहीच उपाय दिसत नाही. सरकारला बीएसएनएल, तेल, रेल्वेसह मोठ्या कंपन्या भांडवलदारांना कवडीमोलाने विकायची घाई आहे. हे कारस्थान जनतेच्या नजरेत येऊ नये, लोक 'अर्थ'हीन प्रश्नात गुंतून राहावेत सरकारने यासाठी ही वेळ साधलेली आहे. पण सीएए आणि एनआरसी हा हिंदू राष्ट्र स्थापनेकडे जाण्याच्या त्यांच्या स्वतंत्र नियोजित कार्यक्रमाचा भाग आहे. नागरिकत्व कायद्याला धर्माचा आधार देत घटनेतूनच घटना बदलण्याची पायवाट निर्माण करण्याचा हा अत्यंत धूर्त प्रयत्न आहे.

हिंदुत्व कार्ड वापरण्याचा त्यांचा होरा चुकला. भारतात या कायद्याला झालेल्या तगड्या विरोधाने मोदी आणि भाजपाची राज्य सरकारे बिथरलेली दिसतात. हिंदू-मुस्लिमांच्या दिसलेल्या एकजुटीने भाजपाच्या राजकारणाचा पाया हादरला आहे. यामुळे अस्वस्थ होऊन विरोध करणाऱ्यांचे 'कपडे' पाहायचे भारताच्या पंतप्रधानांनी आवाहन केले! लिंचिंग होताना पंतप्रधानाना कपडे दिसले नाहीत? हिंदू-मुस्लिमांना वेगळे करण्याचा हा प्रयत्न आहे. रामलीलाची रॅली प्रति आंदोलन सुरू करण्याची हाक आहे.

मोदींनी 'एनआरसी आमचा अजेंडाच नाही, कधी या विषयावर आम्ही बोललोच नाही आणि फक्त नागरिकता कायदा लागू करणार आहे,' अशी

रामलीला मैदानात मोठ्ठा यू-टर्न करणारी घोषणा केली आहे. अमित शहांनी भर लोकसभेत एनआरसी लागू करणार म्हणून घोषणा केली. त्याचे पुरावे उपलब्ध आहेत. आज केंद्रीय मंत्रिमंडळाने एनपीआर म्हणजे नॅशनल पीपल्स रजिस्टर तयार करण्यासाठी मंजुरी दिली आणि त्यासाठी चार हजार कोटी रुपये मंजूर केले आहेत. अमित शहा टीव्ही चॅनेलला मुलाखत देऊन 'एनपीआर आणि एनआरसीचा काहीही संबंध नाही', असे सांगत आहेत; पण किती खोटे बोलावे आणि जनतेला उल्लू बनवावे, याला काही मर्यादा उरलेली नाही. पीएनआर ही एनआरसीची सुरुवात आहे. त्याआधारेच एनआरसी बनते. पाहा कायदा.

दि सिटिझनशिप (रजिस्ट्रेशन ऑफ सिटिझन्स अॅन्ड इश्यू ऑफ नॅशनल आयडेंटिटी कार्ड्स) रूल २००३.

रूल २ : (स) 'पॉप्युलेशन रजिस्टर' म्हणजे खेडे किंवा ग्रामीण भाग किंवा गाव किंवा प्रभाग किंवा सीमांकित (रजिस्ट्रार जनरल ऑफ सिटिझन रजिस्ट्रेशनद्वारा सीमांकित) केलेल्या गावातील किंवा शहरातील प्रभागात बहुधा वास्तव्यास असलेल्या व्यक्तींच्या माहितीचा तपशील असलेले रजिस्टर.

रूल ३ : नॅशनल रजिस्टर ऑफ इंडियन सिटिझन -

(५) लोकल रजिस्टर ऑफ इंडियन सिटिझनमधील समाविष्ट व्यक्तिसंबंधी माहितीचा तपशील पॉप्युलेशन रजिस्टरमधून योग्यरीत्या पडताळणी केलेला असेल.

रूल ४ : नॅशनल रजिस्टर ऑफ इंडियन सिटिझन तयार करणे.

(३) पॉप्युलेशन रजिस्टरमध्ये एकत्रित केलेल्या प्रत्येक कुटुंब आणि व्यक्तीची माहिती, लोकल रजिस्टर ऑफ इंडियन सिटिझन्स तयार करताना समाविष्ट करण्यापूर्वी लोकल रजिस्ट्रार तपासेल आणि छाननी करेल. या कामी रजिस्ट्रार जनरल ऑफ सिटिझन रजिस्ट्रेशन यांच्या निर्देशनाप्रमाणे एक किंवा अधिक व्यक्तींचे साहाय्य मिळू शकेल.

(४) छाननी प्रक्रियेत ज्या व्यक्तीची नागरिकता संशयास्पद आढळेल. अशा व्यक्तीचा तपशील लोकल रजिस्ट्रार योग्य शेऱ्यासहित अधिक तपासासाठी

पॉप्युलेशन रजिस्टरमध्ये नोंदवेल आणि संशयास्पद नागरिकत्वाबाबतची माहिती संबंधित व्यक्ती अथवा कुटुबांला योग्य निर्देशित नमुन्यात (छाननी प्रक्रिया संपताच) तत्काळ कळवण्यात येईल.

मोदींची ही माघार नव्हे. ही कसरत केवळ एनआरसीचा मुद्दा मागे घेतल्याचे दाखवून हिंदूंना आंदोलनातून बाहेर काढायचा डाव आहे. मग सीएएसाठी मुस्लिमांना अलग पाडून त्यांना पोलिस यंत्रणेमार्फत मोडून काढण्याची शातिर चाल आहे. धार्मिक ऐक्य आपली शक्ती आहे. धार्मिक फूट भाजपाची ताकद आहे. त्यामुळे हे ऐक्य अबाधित ठेवण्याचे आव्हान पेलावे लागेल.

जामियामध्ये दिल्ली पोलिसांनी केलेला लाठीमार अमानुष होता. कर्नाटक आणि उत्तर प्रदेशच्या सरकारांनी पोलिसी बळाचा राक्षसी वापर केला आहे. भाजपशासित राज्यांत आज अखेर १७ पैकी १४ जणांचा गोळीबारात मृत्यू झाला. अर्थात मारले जाणारे मुसलमान आहेत. विशेष असे, की पोलिसांनी गोळीबार केल्याचे अमान्य केले आहे. क्रॉस फायरिंगमध्ये लोकांनी स्वत:ला मारले, ही नवी थिअरी आली आहे. आंदोलनात हत्यारबंद लोक संरक्षण देऊन घुसविले जात आहेत. पुन्हा, मारले गेलेल्यांवर गुन्हे दाखल केले आहेत. म्हणजे सरकारी मदत नाही, हे सांगायची गरज नाही. मारल्या जाणाऱ्या तरुणांबद्दल मोदींनी आपल्या रॅलीमध्ये चकार शब्द उच्चारला नाही. जणू ते सारे देशद्रोही आहेत. पोलिसांचे जरूर कौतुक केले. मोदींच्या रॅलीनंतर निघालेल्या मोर्च्यांनी 'देश के गद्दारोंको, गोली मारो सालोंको'चा नारा लावला. चौकात आंदोलकांचे फोटो लावून अटकसत्र, दंडवसुली, दुकानांना लॉक अशा अनेक प्रकारांनी आंदोलकांवर सरकारी हातोडा चालवण्यात येत आहे. पोलिस मुस्लिमांच्या घरांत घुसून तोडफोड करत आहेत. घरांतल्या स्त्रियांना डोके फुटेपर्यंत मारहाण केली जात आहे. दुकान, मशीद, गाड्या आणि इतर संपत्तीची नासधूस स्वत: पोलिस करत आहेत. सीसीटीव्ही फुटेज मिळू नये म्हणून कॅमेरे तोडत आहेत. शिकणारी मुले आणि कमावत्या पुरुषांवर अत्यंत गंभीर गुन्हे दाखल करत आहेत. यातून एकच संदेश आहे : मुस्लिमांना सरकारला विरोध करण्याचा लोकशाही अधिकार

नाही. सरकार जो निर्णय करेल त्याला निमूटपणे शरण जा, अन्यथा तुमचा विरोध बंड समजून मोडून काढू. शासनसंस्थेकडून मुस्लिमांना दुय्यम नागरिकत्वाची ही घोषणा आहे. सुप्रीम कोर्ट, हायकोर्ट सुमोटो काही करणार नाही. मीडिया बोलणार नाही... मुस्लिमांनी गुलामी मान्य करावी, हा दबाव आहे. २४ डिसेंबर नंतरचे रवीश कुमार यांचे प्राइम टाइम एपिसोड पहा. सर्व खुलासा आँखों देखा होईल.

कायद्याचे राज्य, कायद्यापुढे समानता हे लोकशाहीचे तत्त्व मोडीत काढणारा, हा द्वेष आणि सूडाचा मार्ग आहे. आंदोलन हिंसक होते यापेक्षा पोलिसांनी जरासुद्धा संयम दाखविला नाही किंवा दडपशाही करण्याची संधी शोधली, हे सत्य आहे. यापुढे एका बाजूला पोलिसी दडपशाही आणि दुसऱ्या बाजूला ध्रुवीकरण करण्याचे जोरदार प्रयत्न होतील. हिंसा उफाळून येऊ शकते. तरुणांनी हिंसेची शक्यता निर्माण न होऊ देता आंदोलन अत्यंत संयमाने हाताळले पाहिजे.

जामिया आणि अलिगड युनिव्हर्सिटीच्या विद्यार्थ्यांना संपूर्ण भारतातून पाठिंबा मिळाला. धर्मापलीकडे जाऊन एकजूट दाखविणाऱ्या देशातील तरुण विद्यार्थी आणि खासकरून विद्यार्थिनींचे अभिनंदन केले पाहिजे. या आंदोलनातून नवे नेतृत्व, संघटन, विचारप्रणाली, समाजकारण आणि राजकारण उदयाला येण्याची शक्यता आहे. पण ही सुरुवात आहे. लक्ष्य खूप दूर आहे, खडतर आहे. त्यामुळे थोड्याशा यशाने हुरळून न जाता अंतिम लक्ष्य हस्तगत करेपर्यंत सातत्याने दीर्घकाळ लढ्याची तयारी केली पाहिजे... सहिष्णुता, सत्याग्रह आणि अहिंसेचा मार्ग न सोडता.

हुमायून मुरसल

कोल्हापूर

२५ डिसेंबर २०१९

१

आधारकार्ड आणि नंबर, 'नॅशनल आयडेंटिटी कार्ड आणि नंबर' बनवला जावा

▸ नॅशनल आयडेंटिटी कार्ड किंवा नॅशनल आयडेंटिटी नंबरला विरोध कोणीच करणार नाही

'एनआरसी'चा हेतू काय हे सर्वांत महत्त्वाचे आहे. सगळ्या भारतीय नागरिकांचे रजिस्टर बनवायचे असेल तर जरूर बनवावे. त्यासाठी अत्यंत सोपे मार्ग आहेत. 'एनआरसी' म्हणजे देशातील भारतीय नागरिकांची नोंदवही. दवाखान्यात पेशंटची नोंदवही असते. शाळेत मुलांची नोंदवही हवीच. कोर्टात कज्जेदारांच्या नोंदीविना काम कसे चालेल? कारखान्यातील कामगार, सरकारी नोकर, मतदार, बँक खातेदार यांची कोणतीही माहिती (डिजिटल भाषेत 'डाटा') नोंदवल्याविना या संस्थांना आपले काम सांभाळणे शक्य आहे का? मग केंद्र सरकार १३० कोटी नागरिकांची नोंदवही ठेवणार असेल तर आपण नको कशाला म्हणा? एकदा आधारकार्ड हेच नॅशनल आयडेंटिटी कार्ड मानले गेले आणि आधार नंबर हाच नॅशनल आयडेंटिटी नंबर मानला गेला की नागरिकांची नोंदवही म्हणजे 'नॅशनल रजिस्टर ऑफ सिटिझन्स्' बनविण्याचे कारकुनी आणि तांत्रिक काम आहे. सरकारने आपल्या ॲथॉरिटीमार्फत ते निवांत करावे. त्याचा जनतेशी संबंध काय? यासाठी अकारण 'एनआरसी'च्या जाचक, अन्याय्य आणि अनावश्यक कायद्यांची गरज काय? त्याची प्रक्रिया म्हणून एवढी प्रचंड यंत्रणा, नोंदण्या, नोटिशी, सुनावण्या, कोर्ट-कचेऱ्या, दंड-शिक्षेची गरज काय? डिटेन्शन कॅम्पची भीती आणि जनतेचा छळ कशाला? सरकारने अब्जावधी रुपयांचा खर्च कशासाठी करायचा? नागरिकांना दस्तऐवजाचा हक्क देणारा कायदा जरूर करावा. आजच्या एनआरसीचे सर्व कायदे रद्द करावेत. 'न रहेगा बाँस, न बजेगी बांसुरी!'

आपल्याकडे प्रत्येक ओळखपत्रातील माहिती विशिष्ट आणि मर्यादित कारणांपुरतीच अधिकृत असते. अनेक ओळखपत्रे बाळगूनही (त्यातील माहिती

परिपूर्ण नसल्याने) व्यक्तीची नागरिक म्हणून संपूर्ण ओळख पटविणे कठीण असते. म्हणून त्याने भारतीय नागरिकता सिद्ध होत नाही. एकदा आधार हा नागरिकत्त्वाचा पुरावा मानणारा कायदा झाला की प्रश्न मिटला. आधारकार्ड, नॅशनल आयडेंटिटी कार्ड आणि आधार नंबर नॅशनल आयडेंटिटी नंबर बनल्यानंतर या नंबरशी जोडलेला माहितीचा डिजिटल उतारा सरकारकडे उपलब्ध असेल. बँक खाते, मतदार कार्ड, एलआयसी, पासपोर्ट, ड्रायव्हिंग लायसेन्स... अशा कोणत्याही कागदपत्रासाठी हा नॅशनल आयडेंटिटी नंबर दिल्यास एका क्लिकवर उतारा जोडला जाईल. पडताळणीसाठी इतर कशाची गरज राहणार नाही. कोणतेही ओळखपत्र ऑनलाइन तत्काळ मिळाल्याने जाच नाहीसा होईल. प्रत्येक ठिकाणी आणि दरवेळी कागदपत्र देण्यात जाणारा वेळ, पैसा, प्रवास आणि श्रम यांची बचतच होईल. नव्हे, काही दिवसांनी विविध ओळखपत्रे ठेवणेच बंद होईल. एकाच नॅशनल आयडेंटिटी कार्डवर सगळी कामे करता येतील. मग स्त्री असो वा पुरुष, गरीब असो वा श्रीमंत, प्रत्येकजण स्वत:ची अत्यंत विश्वासार्ह ओळख घेऊन अत्यंत आत्मविश्वासाने पृथ्वीतलावर कोठेही वावरू शकेल. शिक्षण, रोजगार, नोकरी, दवाखाना, उद्योग, बँका, एजन्सी, बांधकाम, सरकारी परवाने, ...कोणत्याही ठिकाणी किंवा कामात तू कोण, हा प्रश्न आपोआप बेमतलब होईल. नागरिक स्व-ओळखीच्या अद्‌भुत आणि असामान्य डिजिटल शक्तीचा अनुभव घेऊ शकेल. आता आधारकार्डच्या विश्वासार्हतेमुळे निव्वळ बोटाचा ठसा घेऊन एका मिनिटात मोबाइल सिमकार्ड मिळते ना? इतक्या उपयुक्त आणि शक्तिशाली 'नॅशनल आयडेंटिटी कार्ड'ला दळभद्री विरोध कोण करेल?

लोकशाहीमध्ये जनता सार्वभौम आहे, सरकार नव्हे!

मूठभर बेकायदा स्थलांरितांचा शोध घेण्यासाठी एनआरसी प्रक्रियेची आवश्यकता नाही. जनतेला वेठीस धरणारी आणि गुन्हेगार ठरविणारी आसाम 'एनआरसी'ची नक्कल करण्याची तर अजिबात गरज नाही. बेकायदा स्थलांतरितांना शोधण्यासाठी सरकारी यंत्रणा आहेत आणि कायदा आहे त्याचा वापर करावा. ती सरकारची जबाबदारी आहे. पण, प्रत्येक नागरिकाला आपले नागरिकत्त्व सिद्ध करायला सांगणे सरकारी विकृतपणा आहे. भटके, विमुक्त, आदिवासी, एकटाक स्त्रिया, बेघर, अशिक्षित, शेतमजूर, दारिद्र्यात खितपत पडलेली गरीब जनता, महापूर, भूकंप आणि वादळात बरबाद होणारी जनता... ज्यांच्याकडे कागदपत्रे असण्याची शक्यताच नाही. भारतातल्या लाखो भिकारी,

साधू, संत, फकीर.. यांच्याकडे नागरिकत्वाच्या पुराव्याची कोणती कागदपत्रे मागणार? जनतेने पुरावा का द्यायचा? नागरिकत्वाचा दस्तऐवज मागण्याचा अधिकार आणि हक्क जनतेचा आहे. तो कसा द्यायचा, त्यासाठी काय करायचे ही सरकारची जबाबदारी आहे. त्यासाठी जनतेला जाब विचारून अपमानित करण्याचा सरकारला अजिबात अधिकार नाही, हे जनतेने अधिकारवाणीने सांगितले पाहिजे. नाही तर पुन्हा तेच... काळा पैसा शोधण्यासाठी गोरगरिबांचा पैसा काढून घेण्यासारखा मनमानी आणि लहरी कारभार सुरू होईल. अतिरेकी नाही हे सिद्ध करण्यासाठी उद्या सगळ्या जनतेने चौकशीसाठी 'एनआयए'कडे उपस्थित राहावे, असे आदेश काढले जातील. शरणागताप्रमाणे हात वर करून घराबाहेर काढले जाईल अन् घराघराची झडती सुरू होईल. तुम्ही चोर, दरोडेखोर नाही हे सिद्ध करण्यासाठी प्रत्येक नागरिकाने पोलिस ठाण्यात हजर होण्याचा आदेश दिला जाईल. लोकशाहीत जनता सार्वभौम आहे. भाजपाचे सरकार किंवा मोदी-अमितशाहची जोडी नव्हे! पोलिस, नोकरशाही मुजोर आणि बलशाली बनविण्याची आणि नागरिकांना कमजोर करण्याची ही चाल आहे. जनतेने वेळीच सावध होण्याची गरज आहे. ही लोकशाहीची नुसती थट्टा नव्हे, तर नागरिकांच्या मुलभूत अधिकारांचे हनन आहे. जनतेने संसदेत भाजपाला बहुमत दिले हुकुमशहा बनण्यासाठी कोणाला सिंहासनवर बसविलेले नाही. जनतेला गुलाम करण्याचे हे षड्यंत्र हाणून पाडले पाहिजे.

'सीएए' आणि 'एनआरसी' हिंदू-मुस्लिमांची सामाजिक फाळणी पूर्ण करण्यासाठी तर नाही ...?

देशाची फाळणी झाली, पण सावरकरांचा द्विराष्ट्राचा सिद्धांत भारतात अपूर्ण राहिला आहे. हिंदू-मुस्लिमांची सामाजिक फाळणी बाकी आहे. राम मंदिरासोबत हिंदुराष्ट्र घडविण्याच्या तयारीला जोम भरण्यासाठी 'सीएए'चे इंधन पुरेल असा मोदी सरकारचा अंदाज आहे. हिंदुराष्ट्राचे स्वप्न उराशी बाळगणाऱ्यांनी गेली १४०० वर्षे अस्तित्वात असलेल्या इस्लामिक राष्ट्रांचा इतिहास आणि फलित यांचा जरूर अभ्यास करावा. इस्लाम राष्ट्रधर्म बनविल्याने मुस्लिमांचे दारिद्र्य, दु:ख संपले नाही. यादवी, हिंसा, बलात्कार, भ्रष्टाचार, भेसळ, काळे धंदे, काळा पैसा, सारे दुर्व्यवहार इस्लामी म्हणवणाऱ्या राष्ट्रांत व्यवस्थित चालतात. मुंडके छाटणाऱ्यांच्या देशात बलात्कारही होतात आणि स्त्रिया गुलामही राहतात. स्वातंत्र्य, बंधुभाव, मानवी हक्क नुसते स्त्रियांना नव्हे, पुरुषांनाही मिळाले नाहीत. सामान्य माणसाला शांतता, सुव्यवस्था आणि कसली सुखप्राप्ती झाली नाही.

धार्मिक नेत्यांनी आणि राजकारण्यांनी मिळून सत्ता वाटून घेतली. जनतेच्या हाती धर्माचा खुळखुळा दिला. राजकारण्यांना जनतेत भ्रम निर्माण करावे लागतात. धर्मराष्ट्र असो वा नास्तिक राष्ट्र, माणसांची स्वप्ने भंगलेली राहिली आहेत. हिंदुराष्ट्र झाल्याने अल्पसंख्याकांची अवस्था आणखी बिघडेल, पण कष्टकरी हिंदू स्त्री-पुरुषांच्या आयुष्यात काही फरक पडणार नाही. नाही तरी पेशवाईचा अनुभव महाराष्ट्राला आहेच! भाजपा, आरएसएस आणि मित्र परिवार संघटना हिंदूंना हिंदुराष्ट्राचे भव्य स्वप्न दाखवत आहेत. स्वातंत्र्य चळवळीतील सर्व धर्मांच्या जनतेने केलेला त्याग, दिलेले बलिदान आणि हिंदू-मुस्लिम ऐक्याचा विचार देणाऱ्या महापुरुषांना एका दमात खड्ड्यात घालण्याचा हा प्रयत्न आहे. 'सारे जहाँसे अच्छा'वाला जगात धार्मिक आणि सांस्कृतिक विविधतेचा खास भारतीय आदर्श उद्ध्वस्त करण्याचा हा प्रयत्न आहे. इस्लामी राष्ट्र उभारण्याच्या शेकडो वर्षांच्या फसलेल्या प्रयत्नांची नक्कल करण्याचा हा प्रयत्न नकलीच ठरणार आहे. भारताचा सौदी अरेबिया किंवा पाकिस्तान करणे, हा समस्त आधुनिक, पुरोगामी भारतीयांचा अपमान आहे. भारताला भारत असू द्या. भारतात मुस्लिमांना इस्लामी धर्मराष्ट्राचे स्वप्न दाखविता येत नाही म्हणून काही संकुचित विचारसरणीच्या लोकांनी त्यांना आखरतच्या स्वप्नात ठार वेडे केले आहे! मुस्लिमांना पैगंबरांच्या 'हजरत मु'आज यांच्या संदर्भातील, जीवनात विवेक आणि बुध्दीचा वापर करून निर्णय करण्यास सांगणाऱ्या हसीदची आठवण करून दिली पाहिजे, तर बहुजन हिंदूंना महात्मा ज्योतिबा फुले, डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि महात्मा गांधींनी दिलेला विवेकी सामाजिक विचार जागवण्याची गरज आहे. 'मानसिक गुलामी' संपविल्याशिवाय कोणत्याच समाजाची राजकीय आणि आर्थिक मुक्ती शक्य नाही.

एनआरसीचे सर्व कायदे सरकारने तात्काळ रद्द करावेत. नागरिकत्वासाठी आवश्यक दस्तऐवज मोफत आणि तात्काळ उपलब्ध करून देणार कायदा करावा.

◆ आसाममधून कोणाला तरी बाहेर करायचे होते. त्याची कारणे, इतिहास वेगळा आहे. पण त्या धर्तीवर आता भारतातून कोणाला तरी बाहेर करायचे आहे, हा विचार चुकीचा आहे. स्वत:ला हिंदुत्ववादी म्हणवणारे आजवर मुस्लिमांकडून देशप्रेमाचे प्रमाणपत्र मागून अपमानित करत आहेत. मोदी सरकारने सरसकट सगळ्याच भारतीयांना नागरिक असल्याचे सिद्ध करायला सांगून अपमानित केले आहे. प्रत्येकाला आपले नागरिकत्व सिद्ध करायला लावणारे आणि जनतेचा छळ

करणारे एनआरसीचे कायदे नागरिकविरोधी आहेत, नागरिकत्वाच्या हक्कावर प्रश्नचिन्ह लावणारे आहेत. व्यक्तीचे मानवाधिकार काढून घेणारे आणि प्रसंगी त्याला बेकायदा घुसखोर ठरविणारे आहेत, कॉन्सन्ट्रेशन कॅंपमध्ये दडपणारे आहेत. कोणत्याही परिस्थितीत असे एनआरसीचे सर्व काळे कायदे रद्द झाले पाहिजेत.

◆ मुलगा शाळेत असेल तर बोनाफाइड सर्टिफिकेट किंवा शाळेचा विद्यार्थी असल्याचे सर्टिफिकेट शाळा देते. पेशंट हॉस्पिटलमध्ये असेल तर सर्टिफिकेट हॉस्पिटलच्या वतीने डॉक्टर देतो. शाळा, हॉस्पिटल किंवा कोणतीही इतर संस्था स्वत: रेकॉर्ड तयार करते आणि त्याआधारे सर्टिफिकेट देते. शाळा आणि हॉस्पिटल विद्यार्थी किंवा पेशंट असल्याचे सिद्ध करायला सांगत नाहीत. ती स्वत: बनविलेले रेकॉर्ड तपासते. सरकार रेकॉर्ड्सची जनक आणि कारभार हाकणारी सर्वोच्च निर्णायक संस्था आहे. जनतेचे रेकॉर्ड बनविणे, राखणे आणि नागरिकांना पुरवणे ही सरकारची प्राथमिक जबाबदारी होती. असे काम झाले नाही हा सरकारचा करंटेपणा आहे. त्याची शिक्षा जनतेला देता येणार नाही. पण जनतेने सरकारला त्यांच्या चुकीची माफी द्यावी. सरकारने स्वत:ला दुरुस्त करावे.

◆ भारतात अजूनही ५० टक्के जनता निरक्षर आणि अडाणी आहे. जनतेला दस्तऐवजांची भानगड कळणार नाही. त्यासाठी जनतेला कागदपत्रांचे महत्त्व समजावणारी, कागदपत्रं तयार करण्याविषयी माहिती देणारी, राष्ट्रीय पातळीवर व्यापक जनजागृती करणारी मोहीम सरकारने चालवावी. कचरा साफ करण्यासाठी मोदीजी हातात झाडू घेतात. केंद्र सरकार अब्जावधी रुपये खर्च करते. ही मोहीम कमी महत्त्वाची नाही. जन्म-मृत्यूपासून अनेक महत्त्वाचे दस्तऐवज हा नागरिकांचा हक्क आणि अधिकार आहे. दस्तऐवज तयार करून तो नागरिकांना सोपविणे सरकारची जबाबदारी आहे. आज आदिवासी, भटके, विमुक्त, जंगल व डोंगरदऱ्यांत राहणारी जनता, पोटासाठी स्थलांतर करणारी जनता आणि स्त्रिया अशा ५० टक्के जनतेकडे कोणतीच कागदपत्रे नाहीत. सरकार दरबारापर्यंत पोहोचणे त्यांना शक्य नाही. सरकार त्यांच्या दारी जाऊ शकते. त्यामुळे सर्वांत प्रथम प्रत्येक नागरिकाला किमान आवश्यक कागदपत्रे सरकारकडून मिळण्याचा हक्क देणारा आणि सरकारची जबाबदारी निश्चित करणारा कायदा करण्यात यावा. रजिस्ट्रेशन ऑफ बर्थ ॲन्ड डेथ ॲक्ट, १९६९चा कायदा आणि नॅशनल रजिस्ट्रेशन ॲथॉरिटी ऑफ इंडियाच्या यंत्रणेची पुर्नरचना करावी.

◆ 'आधारकार्ड' हेच नागरिकत्त्वाचे 'नॅशनल आयडेंटिटी कार्ड' आणि 'आधार नंबर' हाच 'नॅशनल आयडेंटिटी नंबर' मानला जाणे सर्वांत सोयीचे आहे. तसा नवा कायदा करण्यात यावा. बहुतेक जनतेच्या हाती असलेले हे आयडेंटिटी कार्ड आहे. आधारकार्डामध्ये व्यक्तीची बायोमेट्रिक आणि इतर व्यक्तिगत माहिती डिजिटली नोंदविलेली आहे. अर्थात नागरिकत्व कायद्यातील काही अटींची पूर्तता करण्यासाठी काही अन्य कागदपत्रांची गरज लागेल (उदा. नागरिकाची जन्मतारीख, जन्माचे ठिकाण किंवा त्याच्या आई-वडिलांची अशी कागदपत्रे इत्यादी). नागरिकत्वासाठी आधारकार्डमधला डाटा अपग्रेड करावा लागेल. हा डाटा अपग्रेड करण्यापूर्वी नागरिकांच्या हाती सरकारने आवश्यक दस्तऐवज सुपूर्द करणे आवश्यक आहे. तसेच अधिकची माहिती आवश्यक असेल तर २०२१च्या जनगणनेमध्ये सरकारने ती एकत्र करावी.

◆ ज्यांच्याकडे या स्वरूपाचे दस्तऐवज उपलब्ध आहेत त्यांचा प्रश्न नाही; पण ज्यांच्याकडे दस्तऐवज नाहीत किंवा कोणतेच पुरावे नाहीत, अशांसाठी त्यांचे तोंडी वा इतर पुरावे नोंदवून, प्रत्येक नागरिकाचे पायाभूत दस्तऐवज सरकारने आपल्या यंत्रणेमार्फत तयार करावेत. यासाठी शपथपत्रावर नागरिकांनी दिलेली माहिती, ते परराज्यातून आले असतील किंवा राज्याच्या अन्य भागांतून आले असतील तर सरकारी यंत्रणेने मूळ ठिकाणाहून आपल्या यंत्रणेमार्फत खात्री करावी. जनतेचे सहकार्य घ्यावे. अशाप्रकारे कागदपत्रे तयार करून देण्याची संबंधित अधिकाऱ्यांना सूचना करावी. यांच्या दस्तऐवजामध्ये पत्ता, नावात बदल, नावाच्या लिखाणातील चुका, लग्नानंतरचे नावातील बदल, जन्मतारखेतील बदल किंवा अन्य त्रुटी असतात. त्या दुरुस्त करण्यासाठी सरकारने मोहीम हाती घ्यावी. संबंधितांशी संवाद करून योग्य प्रकारे कागदपत्रे दुरुस्त करून घेण्यात यावीत. झुंबड उडणार नाही, लोकांची कर्मचाऱ्यांची गैरसोय होणार नाही, कोणत्याही कारणांनी लोकांची छळणूक होणार नाही अशा पद्धतीने नियोजन करण्यात यावे. नागरिकांशी अपराधी किंवा गुन्हेगारांसारखे वर्तन न करण्याच्या आणि अत्यंत सभ्यतेने वागण्याच्या सक्त सूचना अधिकारी व कर्मचारीवर्गाला देण्यात याव्यात. जनतेनेसुद्धा जबाबदारीने आणि नम्रतेने वागावे. थोडक्यात, दस्तऐवज तयार अथवा दुरुस्त करणारी प्रक्रिया सिटिझन फ्रेंडली असली पाहिजे. त्यासाठी केंद्र व राज्य सरकारांनी व्यापक राष्ट्रीय मोहीम सुरू करावी.

◆ जे लोक, भाऊबंद, जवळचा किंवा दूरचा नातेवाईक, शेजार, मित्रमंडळी

असा कोणताच पुरावा/साक्षसुद्धा उपलब्ध करू शकणार नाहीत. ते साहजिकच परकीय असू शकतील. त्यांची नोंद करावी. त्यांना नागरिक असल्याचे सिद्ध करण्याची पूर्ण संधी द्यावी. त्यानंतर असे कोणी परकीय म्हणजे बेकायदा स्थलांतरित आढळतील त्यांचे मानवी अधिकार तत्काळ काढून घेऊन जेलमध्ये पाठविण्याची राक्षसी कल्पना डोक्यातून काढून टाकावी. नाझी आणि हिटलरच्या कॉन्सन्ट्रेशन कॅम्पमधल्या अमानुष घटनांची आठवण करून देणाऱ्या डिटेन्शन कॅम्पची कल्पना सोडून द्यावी. त्यापेक्षा मानवीय डिप्लोमॅटिक पद्धतीने त्यांच्या मूळ देशाशी बोलणी करून परत पाठविण्याची व्यवस्था करावी. निवडणूक अथवा तत्सम अधिकार गोठवावेत, पण सन्मानाने जगण्याचा आणि इतर सर्व मानवी सुविधा मिळण्याच्या कोणत्याही अधिकारापासून अजिबात वंचित करण्यात येऊ नये. कोणत्याही माणसाची अवहेलना, अपमान किंवा त्याला अपराधी ठरवण्याचा अमानुषपणा करू नये. शक्य असल्यास मानवतेच्या आधारावर त्याला नागरिकत्व द्यावे.

◆ जे लोक स्टेटलेस ठरतील त्यांना नागरिकत्व देऊन सामावून घ्यावे. त्यासाठी योजना तयार करावी आणि प्रश्न मार्गी लावावा.

◆ निर्वासितांसाठी आपल्या देशात कायदे नाहीत, धोरण नाही. निर्वासित हा एक अत्यंत पीडित वर्ग आहे. आंतरराष्ट्रीय नियमांना अनुसरून यांना सर्व मानवी अधिकार व सुविधा पुरवण्यात याव्यात. त्यांचे पुनर्वसन करावे. स्वदेशी जाणे अशक्य असेल तर या लोकांना नागरिकत्व प्रदान करण्याचा कायदा असावा.

◆ जे कोणी समाजद्रोही अथवा देशद्रोही व्यवहार करतील त्यांच्यासाठी कायदा आणि कायदा राखणारी व्यवस्था आहे. त्यासाठी नागरिकत्व हा निकष लावण्याची गरज नाही. हिंदू-मुस्लिम भेदाचे राजकारण राक्षसी आणि देशविरोधी आहे. याचा खात्मा करणारे राजकारण करावे लागेल. सर्व भारतीयांची ती जबाबदारी आहे.

◆ सीएए कोणत्याही स्थितीमध्ये रद्द झाला पाहिजे. धर्माधारित नागरिकत्व देण्याचे यापुढे प्रयत्न पुन्हा होऊ नयेत यासाठी नवा धर्माधारित नागरिकत्व प्रतिबंधित करणारा कायदा बनविला जावा.

◆ पाकिस्तान, बांगला देशच काय, जगातल्या ज्या कोणा कुटुंबाचे /व्यक्तीचे धर्म, वंश, विचारसरणी अथवा अन्य कारणांनी स्वातंत्र्य किंवा जीवन धोक्यात येते, अशा सतावल्या जाणाऱ्यांना भारतात मानवाधिकार आणि

नागरिकत्व बहाल करणारा कायदा करावा. कायदा केला म्हणून संपूर्ण जगातील जनता भारतात अवतरणार नाही. ही फुकाची भीती दाखवू नये.

◆ आंतरराष्ट्रीय पातळीवर अशा मानव अधिकारांच्या रक्षणासाठी भारताने जगाचे नेतृत्व करावे. भारतीयांसाठी ही मोठी अभिमानाची गोष्ट ठरेल. त्यासाठी आम्ही सगळे भारत सरकारच्या सोबत ठामपणे राहू. पडेल ती मदत देऊ. पण हिंदू-मुस्लिम दंगे घडवून त्या चिखलात कमळ उमलवण्याच्या अमानवी कल्पनेचा त्याग करावा. भाजपमधील मानवतावाद मानणाऱ्यांनी पक्षनेतृत्वावर त्यासाठी दबाव टाकावा, असे मी आवाहन करतो.

◆ आपण लढताना नेहमी आपले हितसंबंध सांभाळणे योग्य नाही. आमचे नागरिकत्त्वाचे हक्क धोक्यात आले हे खरे. पण, सोबतच 'मायग्रंट्स, इल्लीगल मायग्रंट्स, स्टेटलेस सिटिझन्स आणि रेफ्युजीज' हे नेहमी दुय्यम दर्जाचे नागरिक किंवा नागरिकत्वाचे कोणतेही हक्क नसणारे अल्पसंख्य लोक आहेत. संख्या अपुरी असल्याने ते नेहमी कमजोर आणि दुर्लक्षित राहतात. पण आपल्याला ही संधी आहे- यांच्या अधिकारांबद्दल आवाज उठविण्याची, त्यांना मानवी हक्क आणि देश मिळवून देण्याची, ही लढाई आपण अग्रक्रमाने सोबत लढावी असे मला वाटते. त्या दृष्टीने मी मागण्या मांडलेल्या आहेत. याबाबत गांभीर्याने विचार व्हावा. जनतेसमोर शांततामय संघर्षाचा हुकमी पर्याय उपलब्ध आहे.

'जगाला नवी दिशा देणारा सभ्य, सुसंस्कृत, मानवतावादी भारत घडविण्यासाठी'च्या मागण्या.

१. सीएए कायदा नागरिकत्वाला धर्माचा आधार देणारा आणि घटनाविरोधी आहे, म्हणून तत्काळ रद्द केला जावा.

२. एनआरसीशी संबंधीत सर्व कायदे रद्द करण्यात यावे. फॉरिनर्स ॲक्ट १९४६ दुरुस्त करावा. एमआयडीटी ॲक्टच्या १९८३ च्या धर्तीवर नवा कायदा करावा. पासपोर्ट ॲक्ट, डेथ ॲन्ड बर्थ ॲक्ट, एव्हिडन्स ॲक्ट या अनुशंगीक कायद्यात बदल करावेत.

३. आधार कार्ड हाच नागरिकत्वाचा दस्तऐवज मानणारा कायदा करण्यात यावा.

४. प्रत्येक नागरिकाला महत्वाचे अधिकृत दस्तऐवज मिळणे हा मुलभूत हक्क आहे आणि ते उपलब्ध करून देणे सरकारचे कर्तव्य आहे. कोणत्याही भारतीय व्यक्तीला नागरिकत्व सिद्ध करावे लागू नये. कोणताही पुरावा किंवा दस्तऐवज नसलेल्या भारतीयांना तोंडी साक्ष नोंदवून अधिकृत आणि मोफत

दस्तऐवज बनवून देणारा कायदा करावा.

५. परकियांना शोधणारे कायदे व यंत्रणा आहे. त्याचा वापर करावा. डिटेन्शन कॅपचे धोरण सरकारने रद्द करावे.

६. बेकायदा परकिय नागरिक, निर्वासीत, स्वतःचा देश नसलेले लोक, स्थलांतरीत लोक आणि धार्मिक वा राजकीय कारणांनी छळ होणाऱ्या अल्पसंख्य समुहांसाठी आंतर्राष्ट्रीय कायदे आणि मानवतावादाच्या आधारे मानवी हक्क आणि नागरिकता देणारे धोरण आणि कायदे करण्यात यावेत. याबाबतीत भारताने जगाचे नेतृत्व करावे.

७. धार्मिक भेदभाव करणाऱ्या लोकप्रतिनिधी आणि सरकारी नोकरांवर कडक कारवाई करणारा कायदा करावा. ◆

दस्तऐवज तयार करण्यासाठी तोंडी किंवा अन्य पुरावे वापरता येतील.

नागरिकत्वाच्या पुराव्यासाठी फक्त लिखित दस्तऐवज असण्याची गरज नाही. वाचा-

दि सिटिझनशिप (रजिस्ट्रेशन ऑफ सिटिझन्स अॅन्ड इश्यू ऑफ नॅशनल आयडेंटिटी कार्ड्स), रूल २००३.

रूल १० : नॅशनल रजिस्टर ऑफ इंडियन सिटिझनमधून नाव आणि तपशील काढून टाकणे.

सब-रूल (१) रजिस्ट्रार जनरल ऑफ सिटिझन रजिस्ट्रेशन किंवा अधिकृत अधिकाऱ्याने दिलेल्या आदेशाद्वारे नॅशनल रजिस्ट्रार ऑफ इंडियन सिटिझनमधून नागरिकाचे नाव आणि तपशील काढून टाकता येईल.

सब-रूल (४) : अर्जदाराला आपली बाजू मांडण्याची संधी दिल्यानंतर आणि प्रतिपादनाच्या पुष्ठ्यर्थ दस्तऐवज किंवा तोंडी पुरावा सादर केल्यानंतर, सब रूल (३) अंतर्गत अपील अर्ज निकाली काढण्यात येईल.

आता आपण हे कायदेच रद्द करण्याची मागणी केली आहे. फक्त प्रचलित कायद्यातसुद्धा तोंडी पुराव्यांची तरतूद आहे हे दाखविण्यासाठी हे नोंदविले आहे, बस्स, एखाद्या व्यक्तीच्या नागरिकत्वाबद्दल संशय आल्यास जी कारवाई होईल, तेव्हा आपली बाजू मांडताना व्यक्तीने सादर करावयाचा पुरावा तोंडीसुद्धा असू शकतो, हे रूल १० : सब रूल (४) मध्ये स्पष्ट लिहिले आहे.

त्याचबरोबर, तोंडी पुरावासुद्धा नागरिकत्व सिद्ध करण्यासाठी पुरेसा पुरावा

होऊ शकतो, हे 'लाल बाबू हुसेन आणि इतर वि. इलेक्ट्रोरल ऑफिसर' ही सुप्रीम कोर्टातील महत्त्वाच्या निकालामध्येसुद्धा नमूद आहे. या केसमध्ये पुराव्याचे दस्तऐवज किंवा अन्य प्रकारचे, म्हणजे तोंडी पुरावासुद्धा ग्राह्य मानण्याचा निर्णय आहे. ॲड. प्रशांत भूषण यांनी या संदर्भात आपले म्हणणे यू-ट्यूबवर मांडले आहे. एखाद्या व्यक्तीने आपले पाहुणे, भाऊबंद, शेजार अथवा परिसरातील मित्रपरिवारापैकी काहीजणांना पुरावा म्हणून सादर केले. त्यांनी त्या व्यक्तीला किंवा तिच्या आई-वडिल/आजोबांना ओळखत असल्याची आणि व्यक्ती नागरिक असल्याबाबत साक्ष दिली, तरी तो सबळ पुरावा किंवा दस्तऐवज म्हणून स्वीकारला जाऊ शकतो. त्याआधारे अधिकृत लिखित दस्तऐवज बनवून दिले आणि सादर केले जाऊ शकतात. लोकांनी आपली कागदपत्रे बाळगायला हरकत नाही. पण नागरिकत्व सिद्ध करण्यासाठी, खासकरून मुसलमानांची धांदल उडालेली आहे. जीव तोडून कागद गोळा करण्यासाठी ते धावाधाव करताहेत. काही लोक अकारण भीती निर्माण करत आहेत. हे सारे निरर्थक आहे. घाबरण्याचे अजिबात कारण नाही. उतारा वाचा-

The officer, holding the enquiry, shall bear in mind that the enquiry being quasi-judicial nature. He must entertain all such evidence, documentary or otherwise, the concerned affected person may like to tender in evidence and disclose all such material on which he proposed to place reliance, so that the concerned person has had a reasonable opportunity of rebutting such evidence. The concerned person, it must always be remembered, must have a reasonable opportunity of being heard. [Lal babu Husain and others Vs. Electoral registration officer and others SC 1995] ◆

२
एनआरसीला विरोध का?

▶ **आसाम एनआरसीचा अनुभव अत्यंत दुःखदायक आणि भयावह आहे.**

लोकांना आसाम एनआरसीचा अत्यंत वाईट अनुभव आला आहे. ४० वर्षे भारतीय सैन्यात सेवा केलेला माणूस एनआरसीत समावेश न झाल्याने परकीय म्हणून डिटेन्शन कॅम्पमध्ये गेला! राष्ट्रपती फकरुद्दिन अली अहमद यांचे कुटुंबीय परकीय ठरले आहेत. ज्यांनी आसाम आंदोलनात भाग घेतला तेच हिंदू परकीय ठरले आहेत. कोणाची आई डिटेन्शन कॅम्पमध्ये तर कोणाची आई नागरिक आणि लहान मुले डिटेन्शन कँपमध्ये. लाखो कुटुंबे उद्ध्वस्त झाली आहेत. आज १९लाख लोकांनी आपला देश गमावला आहे. ते बहिष्कृत आणि कलंकित बनले आहेत. माणूसपण हरवलेल्या या लोकांनी यापुढे कसे जीवन व्यतीत करायचे? लोकांच्या दुःखाला सीमा राहिलेल्या नाहीत. ही सारी गोरगरीब, कष्टकरी जनता आहे. या जनतेला उद्ध्वस्त केल्याबद्दल केंद्र सरकारला बधाई द्यायची की भारतीय नागरिकांनी आनंद साजरा करायचा? अशा भयंकर अनुभवानंतर जनता एनआरसीला स्वीकृती कशी देईल?

● **आसाम एनआरसीविषयी सरकार आणि सत्ताधारी भाजपाने अविश्वास दाखवून रद्द करण्याची मागणी केली आहे. मग जनता कसा विश्वास ठेवेल?**

आसाम एनआरसीचा मुद्दा फार जुना आणि उर्वरित भारताहून वेगळा आहे. बांगला देशाची खुली सीमा ही मुख्य समस्या आहे. १९५१ ला प्रथम एनआरसी तयार झाले. फाळणीपासून आणि खासकरून १९७१ बांगला युद्धानंतर मोठ्या प्रमाणावर आसाममध्ये स्थलांतर होत आले. १९७९मध्ये आसू आणि गण परिषदेने बेकायदा स्थलांतरितांना शोधून घालवण्यासाठी आंदोलन आरंभले. हे आंदोलन १९८५ पर्यंत सहा वर्षे चालले. या आंदोलनात धर्म हा आधार नव्हता.

आसामी भाषा, संस्कृती आणि वांशिक मुद्दा महत्वपूर्ण होता. बेकायदा स्थलांतरित हिंदू-मुस्लिम दोघांना यांचा विरोध होता. नंतर हे आंदोलन बोडो, उल्फासारख्या अतिरेकी संघटनांच्या हाती गेले. १९८३मध्ये आसामच्या नेल्लीमध्ये ३००० मुस्लिमांची कत्तल करण्यात आली. पुढे भाजपने मतांसाठी गैरलागू अनेक मुद्दे प्रचारात आणले. बेसुमार बंगाली मुस्लिम घुसखोर स्थानिक आसाममध्ये येत आहेत. थोड्याच वर्षांनी मूळ आसामी अल्पसंख्य बनतील. हे घुसखोर देशात उत्पात माजवतील. यांच्यापासून देशाच्या आंतरिक सुरक्षेला आणि अखंडतेला धोका आहे. मुस्लिम बांग्लादेशी घुसखोर हा देशभर राजकीय मुद्दा बनविला. या म्हणण्याला आसामचे गव्हर्नर एस. के. सिन्हा, रजिस्ट्रार जनरल ऑफ इंडिया, केंद्रीय मंत्री गुजराल या सर्वांनी नकळत दुजोरा दिला. केंद्रीय गृहमंत्री इंद्रकुमार गुजराल यांनी १९९७ मध्ये इंटेलिजन्स ब्यूरोच्या आधारे भारतात १ कोटी आणि आसाममध्ये ४० लाख बेकायदा घुसखोर असल्याचे आणि आसाममध्ये अतिरेकी संघटना वाढल्या असून ४० आसामी मुस्लिम अफगाण आणि काश्मीरमध्ये प्रशिक्षणासाठी गेल्याचे लोकसभेत सांगितले. सेन्ससने १९७१ ते १९९१च्या दरम्यान आसाममध्ये मुस्लिमांची संख्या ७७.४२ टक्क्यांनी तर हिंदूंची संख्या ४१.८९ टक्क्यांनी वाढली असे सांगितले. याची गंभीर दखल घेत सुप्रीम कोर्टाने सरबनंदा सोनोवाल विरुद्ध युनियन ऑफ इंडिया २००५च्या निवाड्यात 'घुसखोरीमुळे आसाम राज्य बाह्य आक्रमण आणि अंतर्गत अशांततेला तोंड देत' असल्याची गंभीर टिप्पणी करून केंद्र सरकारने घटनेतील कलम ३५५ अंतर्गत आसामच्या संरक्षणासाठी आवश्यक पावले उचलावीत असे सुचविले.

38. This being the situation there can be no manner of doubt that the state of Assam is facing "external aggression and internal disturbance" on account of large scale illegal migration of Bangaldesi nationals. It, therefore, becomes the duty of Union of India to take all measures for protection of the State of Assam from such external aggression and internal disturbance as enjoined in Article 355 of the constitution. Having regard to this constitutional mandate, the question arises whether the Union of India has taken any measure for that purpose. (page 32)

अर्थात सुप्रीम कोर्टाने हे घुसखोर मुस्लिम आहेत असे म्हटलेले नाही. पण, आंदोलनाच्या परिणामी, सुप्रीम कोर्टाने आपल्या देखरेखीखाली एनआरसीची संपूर्ण प्रक्रिया पार पडली. शेवटी सत्य काय निघाले? एनआरसी अंतिम यादीत १९ लाख परकीय आणि त्यामध्ये ६ लाख मुस्लिम आणि १३ लाख हिंदू आहेत. ही संख्यासुद्धा पुढील प्रक्रियेत कमी होईल. म्हणजे सरकार आणि त्यांच्या एजन्सीने दिलेली आकडेवारी अविश्वसनीय होती हे समोर आले.

आसाम एनआरसी प्रक्रिया राबविण्यासाठी एकूण ५२००० हजार कर्मचाऱ्यांनी सुप्रीम कोर्टाच्या देखरेखीखाली २०१३ पासून सहा वर्षे राबून ६.६ कोटी कागदपत्रे तपासली. संपूर्ण आसाममध्ये फेब्रुवारी १७ ते ६ जून २०१८ अखेर ८० दिवसांत एकूण ९.१५ लाख फॅमिली ट्री हिअरिंग ६२४१ चौकशी अधिकाऱ्यांनी तपासले. २ एप्रिल ते ७ जून २०१८ मध्ये २६.०८ लाख स्त्रियांचे गाव पंचायतीने दिलेले लग्नाचे सर्टिफिकेट गावातील पंचायत सेक्रेटरी किंवा सर्कल अधिकारी यांच्याकडून तपासण्यात आल्या. तपासणी केंद्र मूळ गावापासून लांब अंतरावर असल्याने अनेकांना आपली पाळलेली जनावरे किंवा इतर वस्तू विकून प्रवासखर्च सोसावा लागला. केंद्र सरकारने या कामी १२२० कोटी रुपये खर्च केले. ३.२ कोटी गोरगरीब जनतेला आपला बचाव करण्यासाठी घरातले किडूकमिडूक विकून पदरचे ७००० हजार कोटी रुपये खर्च करावे लागले. लोकांनी आपल्या आयुष्याची पाच-पाच वर्षे खर्ची घातली. हाती आले ते प्रचाराच्या विपरीत.

सुप्रीम कोर्टाच्या देखरेखीखाली झालेल्या आसाम एनआरसी अंतिम यादीवर आणि प्रक्रियेच्या पारदर्शकतेवर ना आंदोलक विश्वास ठेवायला तयार आहेत, ना भाजप, ना राज्य सरकार, ना मोदी सरकार! त्यांच्या मते घुसखोर बंगाली मुस्लिमांनी खोटी कागदपत्रे देऊन एनआरसीमध्ये नावे नोंदविली आहेत. त्यामुळे एनआरसीची झालेली गणना रद्द करून नव्याने गणना घेण्यात यावी, अशी या लोकांनी मागणी केली आहे. अर्थात, सुप्रीम कोर्टाने ही मागणी फेटाळली आहे. एनआरसीबद्दल ज्यांना संशय आहे तेच आता देशात एनआरसी लागू करू इच्छितात हे अजब आहे.

सत्ताधारीच एनआरसीबाबत संतुष्ट नसतील तर आधी केंद्र सरकारने एनआरसी लागू करण्याच्या प्रक्रियेतला गोंधळ संपवला पाहिजे. विश्वसनीय

कागदपत्रे नसतील, प्रक्रिया संशयास्पद असेल, तर नागरिकत्व सिद्ध करण्याचा हा मार्ग योग्य नाही, असा अर्थ निघतो. मग नागरिकांनी एनआरसीवर कसा विश्वास ठेवायचा? सत्ताधाऱ्यांच्या अजब भूमिकेमुळे जनतेच्या मनात एनआरसीबाबत सरकारची विश्वासार्हता आणि हेतूबद्दल अधिकच संशय निर्माण झालेला आहे.

● **'सेक्शन ६ ए' : सुप्रीम कोर्टाचा निर्णय आसाम एनआरसीचा पायाच खिळखिळा करणारा आहे.**

राजीव गांधी पंतप्रधान असताना १९८६मध्ये आसाम आंदोलक, राज्य सरकार आणि केंद्र सरकार यांच्यात आसाम करार झाला. हा करार घटनादुरुस्ती करून नागरिकता कायदा १९५५ मध्ये 'सेक्शन ६ ए' म्हणून समाविष्ट करण्यात आला. 'सेक्शन ६ ए'मधील तरतुदींनुसार १९६६ पूर्वी आसाममध्ये बाहेरून आलेल्या सर्व स्थलांतरितांना भारतीय नागरिकाचा दर्जा मिळेल. १९६६ ते १९७१ दरम्यान आसाममध्ये दाखल झालेल्या व निरंतर वास्तव्य केलेल्यांचे नाव १० वर्षांसाठी मतदारयादीतून वगळण्यात येईल, पण त्यांना नागरिकाचे इतर अधिकार असतील. त्यानंतर त्यांनाही पूर्ण नागरिक मानले जाईल. तसेच २५ मार्च १९७१ नंतर भारतात बाहेरून आलेल्या सर्वांना परकीय मानले जाईल. त्यांची ओळख पटवून आणि शोधून त्यांना भारताबाहेर पाठविण्यात येईल. या कराराची अंमलबावणी म्हणून परकीय घुसखोर शोधण्यासाठी केंद्र सरकारने आसाममध्ये एनआरसी लागू करण्याचा अधिकृत निर्णय १९९९ मध्ये केला. प्रत्यक्षात प्रायोगिक सुरुवात २०१० मध्ये झाली.

पण, दरम्यान नागरिकता कायदा १९५५च्या कायद्यात समाविष्ट 'सेक्शन ६ ए'च्या घटनात्मक वैधतेला सुप्रीम कोर्टात आव्हान देण्यात आले आहे. सध्या दोन न्यायाधीशांचे खंडपीठ याची सुनवणी करत आहे. या तरतुदीला आव्हान देणाऱ्यांचे मुख्य म्हणणे असे, की उर्वरित भारतात बाहेरून स्थलांतर करून आलेल्यांना भारतीय नागरिक होण्यासाठी अंतिम तारीख १९ जुलै १९४८ आहे. नागरिकता कायदा १९५५ मधील सेक्शन ६ ए नुसार आसामसाठी मात्र अंतिम तारीख २४ मार्च १९७१ आहे. या तारखांतील फरक आसामबाबत भेदभाव करणारा आहे. न्यायमूर्ती रंजन गोगोईंसह दोन न्यायाधीशांच्या पीठाने या संदर्भात १३ ऑगस्ट २०१९ रोजी या सुनावणीत महत्त्वपूर्ण आदेश दिला आहे-

'आम्ही हे स्पष्ट करत आहोत, की रिट पिटिशन (सी) नं. ५६२ ऑफ २००१२ आणि रिट पिटिशन (सी) नं. ३११ ऑफ २०१५ च्या कॉन्स्टिट्युशन बेंचद्वारा या बाबतीत दिल्या जाणाऱ्या आदेशास अधीन राहून नॅशनल सिटिझन ऑफ इंडिया अपडेट करण्यात येईल.''

तसेच कन्स्टिट्युशनल बेंचने १७ डिसेंबर २०१४ च्या आदेशात या रिट पिटिशनच्या सुनावणीदरम्यान सेक्शन ६ एमधील तरतुदी भारतीय राज्यघटनेतील कोणकोणत्या कलमांशी मेळ खात नाहीत, याची यादी करून १३ प्रश्न निश्चित केले आहेत. थोडक्यात, खंडपीठाचा निर्णय जर 'सेक्शन ६ ए'च्या विरोधात गेला तर आसाम एनआरसीची संपूर्ण कवायत संकटात सापडू शकते. हा निर्णय होईपर्यंत आसाममध्ये एनआरसी लागू होणार नाही.

● **एनआरसीमुळे खासगी जीवनावर सरकारचे अतिक्रमण होणार आहे.**

काही लोकांना नागरिकांच्या खाजगी जीवनाची काळजी वाटते. त्यांच्या म्हणण्याप्रमाणे एनआरसीच्या निमित्ताने जी काही बायोमेट्रिक आणि खासगी माहिती एकत्र होते आहे, त्याआधारे सरकार तंत्रज्ञानाच्या माध्यमातून आपल्यावर सतत पाळत ठेवेल. आपली प्रत्येक हालचाल, खासगी जीवन, व्यवहार यांची माहिती घेत राहील. ही माहिती सुरक्षित राहणार नाही. याचा गैरवापर होईल. खासगी जीवन जगण्याच्या मूलभूत अधिकारावर हे अतिक्रमण आहे.

जनतेची साशंकता दुर्लक्षित करता येण्याजोगी नाही. तरी याची दुसरी बाजू आहे. इंटरनेट, मोबाइल सर्फिंग आणि लोकेशनमुळे आपली प्रत्येक क्लिक आणि हालचाल आज ट्रेस होते. गुगलकडे सर्वांची खासगी माहिती, फोन कॉन्टॅक्ट, कॅमेरा, मेमरीसह सर्व काही नोंदले जातेच. अनेक ॲप हे करतात. गुगल माहिती सुरक्षित नाही हेसुद्धा आपण अनुभवले आहे. आता जीपीआरएस, सॅटेलाइट टेक्नॉलॉजी, सेन्सर टेक्नॉलॉजी इतकी विकसित झाली आहे की कोणती गोष्ट लपून राहणे कठीण आहे. ओसामाचा शोध अमेरिकेने कसा घेतला माहीत आहे ना? आता कॅमेऱ्यांचे अल्ट्रा हाय-डायमेंन्शन लेन्स जगातले कोणतेही ठिकाण आणि व्यक्तीवर झूम होऊ शकतात! आधारबाबतीत सुप्रीम कोर्टाने काय केले? खासगी जीवनावर होणाऱ्या आक्रमणाचा मुद्दा महत्त्वाचा आहेच. यावर पुरेसा गंभीर्याने विचार होणे आवश्यक आहे.

मोदीनी आपल्या रामलिला मैदानतील भाषणात डिटेन्शन कॅम्प स्थापन करण्याची योजना सरकारकडे

नसल्याचे आणि विरोधी पक्ष खोटा प्रचार करत असल्याचे सांगितले. प्रत्यक्षात मात्र, सरकारने डिटेन्शन

कॅम्प संदर्भात जारी केलेले आदेश आणि लोकसभेत दिलेल्या माहितीचे पुरावे मीडियामध्ये प्रसिद्ध झाले

आहेत. आसाममध्ये गोलपाडा जिल्ह्यात माटिया गावात ३००० बेकायदा स्थलांतरीसाठी ४६ कोटी रुपये

खर्च करून पहिले डिटेन्शन सेंटर बांधण्यात येत आहे. या हिशेबाने आसाममधील १९ लाख बेकायदा स्थलांतरितांसाठी डिटेन्शन सेंटरच्या केवळ बांधकामाचा खर्च अंदाजे ५० हजार कोटी रुपये येईल. यानंतर कैद्यांना सांभाळण्यासाठीचा खर्च वेगळा! संपूर्ण भारतासाठी येणारा खर्च विचारात घेतला तर मोदी है तो मुमकीन है ! ही वेडगळ कल्पना देशाला कोठे घेऊन जाईल याची कल्पना करवत नाही. डिटेन्शन कॅम्पची योजना अव्यवहार्य आहे, हे कोणीही सांगू शकेल. पण अल्पसंख्याकांच्या मनात भयाचे वातावरण निर्माण करणे आणि जमल्यास त्यांचे मतदानाचे अधिकार काढून घेणे, हा यामागील खरा उद्देश आहे. सोबत यामुळे भक्तांना स्फुरण चढले तर निवडणुका सोप्या होतील हा डावपेच आहे.

सारांश :

एनआरसीबाबत केंद्र सरकार, आसाम राज्य सरकार आणि सत्ताधारी भाजप यांचीच भूमिका गोंधळाची आहे. सुप्रीम कोर्टाने देखरेख करूनही त्यांनी आसाम एनआरसीची प्रक्रिया आणि निकाल अमान्य केले आहेत. तसेच आसाम एनआरसीची अंतिम यादी तयार झाली असली, तरी सुप्रीम कोर्टात नागरिकता कायदा १९५५ 'सेक्शन ६ ए'च्या घटनात्मक वैधतेलाच आव्हान देण्यात आले आहे. एनआरसीचे नूतनीकरण मुळात '६ ए'च्या तरतुदीनुसार झाले असल्याने '६ ए' घटनाबाह्य ठरल्यास दशकाहून अधिक काळ आणि हजारो कोटी रुपये, मनुष्यबळाचे श्रम वाया जातील. आसामचा मूळ प्रश्न मात्र तसाच राहील.

आता देशभरात एनआरसी लागू होताना पुन्हा एकदा नागरिकता (दुरुस्ती)

कायदा २०१९, महत्वाची भूमिका वठवणार आहे. तीन देशांतून येणाऱ्या मुस्लिमांना नागरिकत्व नाकारणारा हा कायदा वादग्रस्त असून घटनात्मकदृष्ट्या वैध ठरणे कठीण आहे. म्हणजे आसामप्रमाणेच या कायद्याच्या घटनात्मक वैधतेला आव्हान दिले जाईल. शिवाय नव्या कायद्याने नागरिकता प्राप्त करण्याची तारीख ३१ डिसेंबर २०१४ पर्यंत वाढविल्यामुळे नॉर्थ ईस्ट राज्यांत असंतोषाचा आगडोंब उसळला आहे. या सर्व प्रकारामुळे एनआरसी परत लोंबकळत राहू शकते. मुळात राजकीय वादग्रस्ततेमुळे केवळ एका आसाम राज्यामध्ये एनआरसी लागू करताना जनतेला इतक्या हालअपेष्टा सोसाव्या लागल्या, संपूर्ण भारतात लागू करताना काय होईल याचा नुसता अंदाज केलेला बरा. त्यामुळे याची व्यवहार्यता न तपासता पुढे जाण्याचा हव्यास केल्यास मुसळ केरात जाऊ शकते. हाती क्लेश, दुःख, अपव्यय आणि असंतोषाशिवाय काही लागण्याची शक्यता कमी आहे. ◆

३

एनआरसी कायदेशीर प्रक्रिया : अव्यवहार्य आणि जुलमी

▶ भाजपाची राज्यघटना बदलण्याची खेळी

'एनआरसी'ची मूळ आयडिया (द्वारा आरएसएस थिंक टँक) भाजपाची आहे. अटल बिहारी वाजपेयींच्या काळात २००३ मध्ये घटनादुरुस्तीद्वारे ही आयडिया कायद्यात आणली गेली. ओव्हरसीज सिटिझनची कल्पनासुद्धा याच कायद्याने प्रत्यक्षात आणली गेली आहे. त्यासाठी रूल बनवून प्रक्रिया निश्चित केली. मी जेव्हा एनआरसी आणि नवा नागरिकता कायदा यांचा एकत्रित विचार करतो तेव्हा पूर्वीपासूनच भाजपाच्या कोअर टीमकडे ही योजना तयार असली पाहिजे, याची खात्री पटते. मोदी सरकार वाजपेयी सरकारच्या संकल्पनेची पूर्तता करत आहे, त्यामुळे ते मागे सरकणार नाहीत.

याचा अर्थ भाजपाने अत्यंत विचारपूर्वक राज्यघटना बदलण्याची ही योजना तयार ठेवलेली आहे. नागरिकत्वाला धर्माधार देण्याच्या भाजपाच्या या दीर्घ योजनेचा काँग्रेससकट कोणत्याच पक्षाला अंदाज येऊ नये याचे आश्चर्य वाटते. भाजपा हिंदूराष्ट्राची राज्यघटनेतच पायवाट तयार करत असताना, राजकीय प्रगल्भतेचा दावा करणारे डावे झोपा काढत होते का? काँग्रेस पुढे १० वर्षे सत्तेत होती. त्यांनी या विषयाकडे लक्ष दिले नाही. उलट, याच योजनेतील एनपीआरची अंमलबजावणी केली! हे प्रकरण विरोधी पक्षांची वैचारिक दिवाळखोरी दाखविते. विरोधी पक्षाला नुसता संघटनात्मक पक्षाघात झालेला नाही, मुळात हे पक्ष वैचारिकदृष्ट्या विकलांग बनले आहेत, ही गोष्ट भारतीय लोकशाही व्यवस्थेसाठी अत्यंत धोक्याची घंटा आहे.

विरोधी राजकीय पक्ष अजूनसुद्धा सवयीप्रमाणे या प्रकरणाला सत्तेची खेळी म्हणून पाहत आहेत. देशाची धर्मनिरपेक्ष राज्यघटना मोडीत काढण्याचा हा प्रयत्न आहे इतक्या गांभीर्याने घेताना ते दिसत नाहीत. आंदोलनात धर्मनिरपेक्ष म्हणवणारे राजकीय पक्ष आहेत कुठे? जनतेच्या असंतोषावर स्वार होऊन सत्तेत जाण्याची संधी आहे का याचा नुसता शोध सुरू आहे. या वेळी खरा संघर्ष केवळ

विविध युनिव्हर्सिटी आणि कॉलेजमधील बहादूर विद्यार्थी/विद्यार्थिनी करताहेत. त्यांचे कौतुक करावे तितके कमी आहे. हा संघर्ष पुढे चालू ठेवण्यासाठी त्यांना संघटित करणे आणि एकत्र ठेवणे आवश्यक आहे. असो.

प्रकरणाच्या शेवटी 'परिशिष्ट-१'मध्ये 'एनआरसी'संबंधी मूळ कायद्याचे मराठी भाषांतर दिले आहे. या कायद्यांतर्गत एनआरसी आहे काय, त्याची अंमलबजावणी कशी होणार? या प्रक्रियेविषयी तपशील पुढीलप्रमाणे -

१) 'एनआरसी'शी संबंधित कायदेशीर तरतुदी नागरिकता कायदा १९५५ आणि दि सिटिझनशिप (रजिस्ट्रेशन ऑफ सिटिझन्स ॲन्ड इश्यू ऑफ नॅशनल आयडेंटिटी कार्ड्स) रूल, २००३ मध्ये आढळतात. त्यानंतर रजिस्ट्रार जनरल आणि सेन्सस कमिशनरच्या वेबसाइटवर इतर माहिती उपलब्ध आहे. मूळ कायद्यातील तरतुदी संक्षिप्त असतात. त्याआधारे बनलेल्या रूल्समध्ये यंत्रणा आणि राबविण्याच्या प्रक्रियेचा तपशील असतो. त्यानंतर नोटिफिकेशन, सर्क्युलरद्वारे बारीकसारीक व्यवहारिक निर्देश दिले जातात. शिवाय कोर्ट केसेसमध्ये काही बाबी अधिक स्पष्ट होतात. या ठिकाणी मूळ तरतूद आणि रूल्समध्ये नमूद गोष्टी मांडलेल्या आहेत. त्यामुळे बऱ्याच बाबतींत स्पष्टीकरण पुरेसे मिळत नाही. तरी रूलच्या आधारे माहिती पुढीलप्रमाणे-

२) २००३ च्या घटनादुरुस्तीने नागरिकता कायदा १९५५ मध्ये 'सेक्शन १४ ए' जोडण्यात आले. सेक्शन १४ एमध्ये केंद्र सरकार 'नॅशनल रजिस्टर ऑफ इंडियन सिटिझन' आणि 'नॅशनल रजिस्ट्रेशन ॲथॉरिटी' गठित करेल अशी तरतूद करण्यात आली. सक्तीने नागरिकांची नोंदणी करून 'नॅशनल आयडेंटिटी कार्ड' देण्याची भाषा यातच केली गेली आहे. 'रजिस्ट्रार जनरल, इंडिया', हे 'नॅशनल रजिस्ट्रेशन ॲथॉरिटी' म्हणून पदभार सांभाळतील आणि 'रजिस्ट्रार जनरल ऑफ सिटिझन रजिस्ट्रेशन' म्हणून कार्य पाहतील, असेही या कायद्यात स्पष्ट करण्यात आले आहे. पुढे या कायद्यातील तरतुदीनुसार दि सिटिझनशिप (रजिस्ट्रेशन ऑफ सिटिझन्स ॲन्ड इश्यू ऑफ नॅशनल आयडेंटिटी कार्ड्स) रूल, २००३ तयार करण्यात आले. त्यातील सिटिझन्स रजिस्टर तयार करण्याचे टप्पे आणि प्रक्रियेचा तपशील देण्यात आला आहे.

३) रजिस्ट्रार जनरल आणि सेन्सस कमिशनरच्या वेबसाइटवरील माहितीप्रमाणे पॉप्युलेशन रजिस्टर तयार करण्यामागे भारतातील रहिवाशांचा बायोमेट्रिक आणि डिमोग्राफिक व्यापक डाटा तयार करणे हा उद्देश आहे. त्यासाठी १५ प्रकारची माहिती गोळा करण्यात येईल- १) व्यक्तीचे नाव, २)

कुटुंबप्रमुखाशी नाते, ३) वडिलांचे नाव, ४) आईचे नाव, ५) विवाहित असल्यास पती अथवा पत्नीचे नाव, ६) लिंग, ७) जन्मतारीख, ८)विवाहित/अविवाहित, ९)जन्माचे ठिकाण, १०) नॅशनॅलिटी, ११) सध्याचा पत्ता, १२) सध्याच्या ठिकाणी वास्तव्याचा कालावधी, १३) कायमचा पत्ता, १४) व्यवसाय, १५) शिक्षण.

२०११च्या सेन्ससवेळी पॉप्युलेशन रजिस्टरची माहिती गोळा करण्यात आली आहे. २०१५ मध्ये घरोघरी सर्व्हे करून ही माहिती अपडेट करण्यात आली आहे. आता पुन्हा २०२१च्या जनगणनेची माहिती गोळा करताना पुन्हा अपडेट करण्यात येईल. हे काम एप्रिल ते सप्टेंबर २०२०च्या दरम्यान पूर्ण करण्यात येईल.

४) रूल २००३ मध्ये 'पॉप्युलेशन रजिस्टर'चा उल्लेख झाला आहे. पॉप्युलेशन रजिस्टर म्हणजे गाव आणि वॉर्ड पातळीवर मागील सहा महिन्यांपासून आणि पुढे सहा महिने वास्तव्य करणाऱ्या प्रत्येक 'व्यक्तिची'(नागरिक आहे की नाही येथे विषय नाही) नोंदणी असलेले स्थानिक दप्तर होय. हे पॉप्युलेशन रजिस्टर स्थानिक पातळीवरील सरकारी अधिकारी (म्हणजे ग्रामसेवक, म्युन्सिपल अधिकारी वगैरे ज्यांना लोकल रजिस्ट्रार नावाने ओळखले जाईल.) आपल्या विभागात सर्वसाधारणपणे वास्तव्य करणाऱ्या सर्व व्यक्तींशी संबंधित माहिती गोळा करून पॉप्युलेशन रजिस्टर तयार करतील. एकदा 'लोकल पॉप्युलेशन रजिस्टर' तयार झाले की हीच माहिती गाव आणि वॉर्ड पातळीवर 'लोकल रजिस्टर ऑफ इंडियन सिटिझन' तयार करण्यासाठी वापरली जाईल.

५) रजिस्ट्रार जनरल ऑफ सिटिझन रजिस्ट्रेशन आदेशान्वये संपूर्ण भारतात नॅशनल रजिस्टर ऑफ इंडियन सिटिझनचा आरंभ करण्याची तारीख सूचित करण्यात येईल. या कालावधीत प्रत्येक व्यक्तीला 'लोकल रजिस्ट्रार ऑफ सिटिझन रजिस्ट्रेशन'कडे आपली नोंदणी करावी लागेल. अचूक व्यक्तिगत माहिती सादर करणे ही प्रत्येक नागरिकाची जबाबदारी आहे. अठरा वर्षे पूर्ण न केलेला अल्पवयीन किंवा जो शारिरीक आव्हान असलेला आहे, अशा अवलंबितांची माहिती सादर करणे कुटुंबप्रमुखाची जबाबदारी आहे. अनाथालय, वृद्धाश्रम, मानसिक रोग्यांचे आश्रयघर अशा संस्थांमध्ये वास्तव्य करणाऱ्या व्यक्तींच्या बाबतीत संस्थाप्रमुखाची जबाबदारी असेल. नॅशनल रजिस्टर ऑफ इंडियन सिटिझन्स तयार करण्यासाठी जबाबदार असलेल्या अधिकाऱ्यांना सहकार्य करणे आणि लोकल रजिस्टर ऑफ इंडियन सिटिझन्सकडे आरंभकाळाच्या दरम्यान नोंदणी करणे प्रत्येक भारतीय नागरिकाला बंधनकारक

आहे.

६) डिस्ट्रिक्ट रजिस्ट्रार, (जिल्हाधिकारी) सब-डिस्ट्रिक्ट किंवा तालुका रजिस्ट्रार (प्रांत किंवा तहसीलदार) किंवा लोकल रजिस्ट्रार (ग्रामसेवक) ऑफ सिटिझन रजिस्ट्रेशन आदेशाद्वारे कोणत्याही व्यक्तीला, कोणत्याही व्यक्तीच्या नागरिकत्त्वाची स्थिती निश्चित करणारी त्याच्याजवळील कोणतीही माहिती सादर करण्यासाठी आदेश देऊ शकतो, आणि आदेशानुरूप मागितलेली माहिती सादर करणे अशा व्यक्तींकरिता बंधनकारक आहे.

७) 'लोकल रजिस्टर ऑफ इंडियन सिटिझन'मध्ये माहिती समाविष्ट करण्यापूर्वी लोकल रजिस्ट्रार व्यक्तींसंबंधी माहितीचा तपशील पॉप्युलेशन रजिस्टरमधून योग्यरीत्या पडताळणी, छाननी करून घेतील.

८) पुढे छाननी प्रक्रियेत ज्या व्यक्तीची नागरिकता संशयास्पद आढळते त्याचा तपशील लोकल रजिस्ट्रार योग्य शेऱ्यासहित अधिक तपासासाठी पॉप्युलेशन रजिस्टरमध्ये नोंदवेल. अशा नागरिकत्व संशयास्पद असणाऱ्या व्यक्ती अथवा कुटुंबाला तातडीने योग्य निर्देशित नमुन्यात, छाननी प्रक्रिया संपताच, कळविण्यात येईल. म्हणजे सिटिशनशिप रजिस्ट्रेशनचा खरा वाद येथून सुरू होतो.

९) वादग्रस्त व्यक्ती किंवा कुटुंबाची माहिती नॅशनल रजिस्ट्रर ऑफ इंडियन सिटिझनसमध्ये नोंदवण्याचा किंवा वगळण्याचा अंतिम निर्णय घेण्यापूर्वी सब-डिस्ट्रिक्ट किंवा तालुका रजिस्ट्रार ऑफ सिटिझन रजिस्ट्रेशन (तहसीलदार किंवा प्रांत) यांच्यापुढे वादग्रस्त व्यक्तीला आपली बाजू मांडण्याची संधी देण्यात येईल. सब-डिस्ट्रिक्ट किंवा तालुका रजिस्ट्रार तक्रारीची नोंद झाल्यानंतर ९० दिवसांच्या आत आपले निरीक्षण नोंदवेल किंवा माफक मुदतवाढ घेतल्यास सकारण लेखी नोंद करून मुदतवाढ संपण्यापूर्वी आपला निकाल देईल, असे रूलमध्ये स्पष्ट करण्यात आले आहे.

१०) जर सब-डिस्ट्रिक्ट किंवा तालुका रजिस्ट्रार यांच्या आदेशाने कोणावर अन्याय झाला असे वाटल्यास संबधित व्यक्ती आदेशाच्या तारखेपासून ३० दिवसांच्या आत डिस्ट्रिक्ट रजिस्ट्रार ऑफ सिटिझन रजिस्ट्रेशन यांच्याकडे अपील करू शकते.

११) डिस्ट्रिक्ट रजिस्ट्रार ऑफ सिटिझन रजिस्ट्रेशन अन्याय झालेल्या व्यक्तीला आपले म्हणणे सादर करण्याची संधी दिल्यानंतर अपील सादर झाल्यापासून ९० दिवसांच्या आत अंतिम निर्णय घेईल. तक्रारदाराची बाजू खरी ठरल्यास तसा तपशील नॅशनल रजिस्टर ऑफ इंडियन सिटिझनमध्ये नोंदवण्यात

येईल.

१२) कोणतीही हरकत मागविण्यासाठी किंवा कोणत्याही नावाची नोंदणी किंवा दुरुस्त्यासाठी, लोकल रजिस्टर ऑफ इंडियन सिटिझनचा ड्राफ्ट, सब-डिस्ट्रिक्ट किंवा तालुका रजिस्ट्रार प्रसिद्ध करतील,

१३) लोकल रजिस्टर ऑफ इंडियन सिटिझन्स्'च्या ड्राफ्टमध्ये जर विशिष्ट नोंदीविरुद्ध कोणतीही हरकत किंवा नावाचे समावेशन किंवा कोणत्याही दुरुस्त्या असतील तर ड्राफ्ट प्रसिद्ध झालेल्या तारखेपासून ३० दिवसांच्या आत विशिष्ट नमुन्यात हरकतीची कारणे आणि स्वरूप स्पष्ट करून हरकत नोंदवता येईल.

१४) सब-डिस्ट्रिक्ट किंवा तालुका रजिस्ट्रार अशा हरकती विचारात घेतील आणि ९० दिवसांच्या आत थोडक्यात निकाली काढतील आणि अशाप्रकारे तयार केलेले लोकल रजिस्टर ऑफ इंडियन सिटिझन त्यानंतर डिस्ट्रिक्ट रजिस्ट्रार ऑफ सिटिझन रजिस्ट्रेशन (म्हणजे जिल्हाधिकारी) यांच्याकडे सादर करतील, जे लोकल रजिस्टर ऑफ इंडियन सिटिझनमधील नोंदी पुढे नॅशनल रजिस्टर ऑफ इंडियन सिटिझनमध्ये नोंदविल्या जातील असे पाहतील.

१५) प्रत्येक कुटुंब आणि व्यक्तीसंबंधी डाटाबेस तयार करण्याच्या कामी आणि या नियामातील तरतुदींची अंमलबजावणी करण्यासाठी केंद्र सरकार, राज्य सरकार, लोकल बॉडीजचे अधिकारी किंवा त्यांच्या अधिकारातील कर्मचारी, रजिस्ट्रार जनरल ऑफ सिटिझन रजिस्ट्रेशन किंवा त्यांच्या वतीने अधिकृत करण्यात आलेल्या व्यक्तीला साहाय्य करतील.

१६) व्यक्तीचा मृत्यू झाल्यास, कायद्याच्या सेक्शन ८ प्रमाणे भारतीय नागरिकत्व हिरावून घेतल्यास किंवा व्यक्ती अथवा कुटुंबामार्फत दिली गेलेली माहिती चुकीची आढळून आल्याने नागरिकत्व संशयास्पद आढळल्यास, रजिस्ट्रार जनरल ऑफ सिटिझन रजिस्ट्रेशन किंवा अधिकृत अधिकाऱ्याने दिलेल्या आदेशाद्वारे नॅशनल रजिस्ट्रार ऑफ इंडियन सिटिझनमधून नागरिकाचे नाव आणि तपशील काढून टाकता येईल. अशाप्रकारे नाव वगळल्यास संबंधित व्यक्तीला, किंवा तिच्या जवळच्या नातेवाइकाला नॅशनल रजिस्ट्रार ऑफ सिटिझन्सकडून रीतसर कळविण्यात येईल. भारतीय नागरिकत्व समाप्त झाले असल्यास डिस्ट्रिक्ट रजिस्ट्रार ऑफ सिटिझन रजिस्ट्रेशन यांना ३० दिवसांच्या आत कळविणे हे संबंधित भारतीय नागरिकाचे कर्तव्य आहे.

१७) सिटिझन रजिस्टरमधून नाव काढून टाकल्याने अन्याय झाला असे एखाद्या व्यक्तीस वाटल्यास संबंधित व्यक्तीला अशा आदेशापासून ३०

दिवसांच्या आत याविरुद्ध संबंधित अधिकाऱ्याकडे अपील करता येईल. अर्जदाराला आपली बाजू मांडण्याची संधी दिल्यानंतर आणि प्रतिपादनाच्या पुष्ठ्यर्थ दस्तऐवज किंवा तोंडी पुरावा सादर केल्यानंतर अपील अर्ज निकाली काढण्यात येईल.

१८) रजिस्ट्रार जनरल ऑफ सिटिझन रजिस्ट्रेशन इलेक्ट्रॉनिक किंवा इतर अन्य साधनांच्या माध्यमात नॅशनल रजिस्टर ऑफ इंडियन सिटिझनचा सांभाळ करतील आणि रजिस्ट्रेशन ऑफ बर्थ्स ॲन्ड डेथ्स ॲक्ट, १९६९ (१८ ऑफ १९६९) आणि ॲक्टमध्ये उल्लेखलेल्या विविध रजिस्टरमधील उताऱ्यांच्या आधारे निरंतर नूतनीकरण होत राहील. यासाठी जन्म अथवा मृत्यू अशा कुटुंबातील कोणत्याही घटनेप्रसंगी लोकल रजिस्ट्रर ऑफ इंडियन सिटिझनमध्ये त्याची रीतसर नोंद करणे किंवा नोंद काढणे हे प्रत्येक कुटुंबप्रमुखाचे कर्तव्य आहे.

१९) नावातील बदल किंवा दत्तक प्रकरणात संबंधित कायद्यामुळे अर्जदाराच्या पालकांच्या नावात झालेला बदल किंवा रहिवास पत्त्यातील बदल किंवा वैवाहिक अवस्थेतील बदल किंवा लिंगबदल अशा प्रत्येक बदलाच्या बाबतीत संबंधीत व्यक्तीकडून अर्ज प्राप्त होऊन आणि त्याची रीतसर तपासणी झाल्यानंतर, सब-डिस्ट्रक्ट किंवा तालुका रजिस्ट्रार नॅशनल रजिस्टर ऑफ इंडियन सिटिझनमध्ये बदल करण्यास अधिकृत मान्यता देतील.

२०) रजिस्ट्रार जनरल ऑफ सिटिझन रजिस्ट्रेशन किंवा त्यांच्या वतीने नियुक्त झालेले अधिकृत अधिकारी ज्याची नॅशनल रजिस्टर ऑफ इंडियन सिटिझनमध्ये नोंद झाली आहे अशा प्रत्येक नागरिकाला 'नॅशनल आयडेंटिटी कार्ड' प्रदान करतील.

२१) नॅशनल आयडेंटिटी कार्ड ही केंद्र सरकारची मालमत्ता राहील. कायद्यानुसार होणारा वापर वगळता, कोणतीही व्यक्ती नॅशनल आयडेंटिटीच्या कार्डमध्ये स्वेच्छेने बदल, अदलाबदल, नष्ट किंवा कोणत्याही प्रकारे वापर करणार नाही. मृत्यू अथवा नागरिकत्व गमावणे अशा घटना घडल्यास संबंधित नागरिक किंवा जवळचा नातेवाईक परिस्थितीप्रमाणे रजिस्ट्रार जनरल ऑफ सिटिझन रजिस्ट्रेशन किंवा त्यांच्या वतीने अधिकृत अधिकारी यांच्याकडे नॅशनल आयडेंटिटी कार्ड जमा करेल. आयडेंटिटी कार्ड गमावल्यास तत्काळ जवळच्या पोलिस ठाण्यात आणि संबंधित अधिकारी यांना कळविणे परिस्थितीनुरूप नागरिक किंवा त्याच्या जवळच्या नातेवाइकाचे कर्तव्य असेल.

२२) व्यक्तीने अथवा कुटुंबप्रमुखाने, संस्थाचालकाने अधिकाऱ्यांना माहिती

न देणे, चुकीची माहिती देणे, जन्म-मृत्यूची नोंद न करणे, तसेच सरकारी कर्मचाऱ्याने रजिस्ट्रार जनरलच्या किंवा त्याने नियुक्त अधिकाऱ्याच्या आदेशाचे पालन न करणे दंडनीय आहे. यासाठी १००० रुपये दंड होऊ शकतो.

एनआरसी : अव्यवहार्य आणि जुलमी

खरे तर, वर उल्लेख केलेल्या टप्प्यात हे प्रकरण संपत नाही. छळवाद इथून पुढे सुरू होतो. कारण जी व्यक्ती आपले नागरिकत्त्व सिद्ध करू शकणार नाही, किंवा एखादी व्यक्ती संशयास्पद आहे, अशी तक्रार कोणीही संबंधित अधिकाऱ्याकडे नोंदविली आणि अधिकाऱ्याला त्यात तथ्य आढळले तर त्यासंबंधी माहिती खालचे अधिकारी जिल्हाधिकाऱ्याकडे पाठवतील. जिल्हाधिकारी, म्हणजे या कार्यासाठी डिस्ट्रिस्ट रजिस्ट्रार ही तक्रार फॉरिनर्स ॲक्ट १९४६ अंतर्गत स्थापन झालेले फॉरिनर्स (ट्रॅब्युनल) ऑर्डर १९६४ प्रमाणे स्थापन झालेल्या ट्रॅब्युनलकडे निर्णयासाठी सोपवतील.

येथे मुख्य अडचण अशी आहे, की फॉरेनर्स ॲक्ट अंतर्गत एखादी व्यक्ती नागरिक आहे हे सिद्ध करण्याची जबाबदारी खुद्द आरोप झालेल्या व्यक्तीची आहे. आरोप करणाऱ्यावर किंवा सरकारी अधिकाऱ्याची ही जबाबदारी नाही. त्यामुळे येथे व्यक्तीला आपण नागरिक आहोत हे सिद्ध करणारा सबळ पुरावा सादर करावा लागतो. या ट्रॅब्युनलचे नेमलेले न्यायाधीश म्हणजे कोर्टाचे जज नसतात. आसाममध्ये अशा ट्रॅब्युनलमध्ये लोकांनी सादर केलेली कागदपत्रे मोठ्या प्रमाणावर नाकारली गेली. कागदपत्रांतील अनेक त्रुटी यासाठी पुढे करण्यात आल्या. यासाठी लोकांना खूप खस्ता खाव्या लागल्या आणि लोक एनआरसी- बाहेर राहिले. जर ट्रॅब्युनलने व्यक्तीच्या विरुद्ध निकाल दिला तर जिल्हाधिकारी व्यक्तीचे नाव एनआरसीमधून वगळण्याची शिफारस करेल. ती व्यक्ती पोलिसांच्या दृष्टीने बेकायदा स्थलांतरित ठरते. तिच्यावर नियमाप्रमाणे कारवाई होऊन व्यक्ती जेलमध्ये जाते. अर्थात ट्रॅब्युनलच्या विरोधात हायकोर्ट आणि शेवटी सुप्रीम कोर्टात न्याय मागता येतो ; पण हा महागडा आणि त्रासदायक न्याय लोक मिळवू शकत नाहीत. आता, या प्रक्रियेला मी उल्लेखलेल्या नियमावलीमध्ये नमूद नाही पण आसाममध्ये हे घडले आहे. या वर्षीच्या फेब्रुवारीमध्ये आसाम पार्लेमेंटरी अफेअर्स आणि ट्रान्स्पोर्ट मिनिस्टर चंद्रमोहन पटोरी यांनी आसाम विधानसभेला दिलेल्या माहितीप्रमाणे १९८५ ते ऑगस्ट २०१८ असे एकूण ६,२६,७९३ व्यक्तींना ट्रॅब्युनलकडे संशयित परकीय म्हणून रेफर करण्यात आले. त्यापैकी ट्रॅब्युनलने १०८८१५ जणांना भारतीय आणि

१०३७६४ जणांना परकीय घोषित केले.

शिवाय, व्यक्ती नागरिक सिद्ध झाली नाही तर परकीय म्हणून अशा प्रकारची कारवाई अटळ दिसते. आणखी एक मुद्दा महत्त्वाचा आहे. दस्तऐवजांची तपासणी करून किंवा दिलेली माहिती नोंदविण्याचा अधिकार सर्वांत खालच्या सरकारी कर्मचाऱ्याचा आहे. त्याने नजरचुकीने किंवा जाणीवपूर्क चूक केली तर? कम्युनालायझेशन इतके खोलवर आहे कोणावर भरवसा करणे कठीण झाले आहे. टी.एन. शेषनच्या काळात अशाच प्रकारे आसाममध्ये संशयास्पद वाटणाऱ्या मतदारांच्या बाबतीत मतदारयादीमध्ये त्यांच्या नावापुढे 'डी व्होटर' नोंदवण्याचा आदेश निघाला. या कृतीत काही लाख लोकांना या कर्मचाऱ्यांनी डी व्होटर बनवून टाकले. यांनी मतदानाचा हक्क गमावलाच, पण आज त्यामुळे एनआरसीच्या बाहेर राहण्याची पाळी त्यांच्यावर आली. उद्या स्थानिक पातळीवर हा प्रकार घडणार नाही याची शाश्वती कोण देणार? ही चूक दुरुस्तसुद्धा कदाचित होईल, पण त्यानिमित्त लोकांना अकारण छळाला सामोरे जावे लागू शकते. असाममध्ये सध्या ५०० फॉरिन ट्रॅब्युनल कार्यरत होते. महाराष्ट्रात काय घडेल? कल्पना करता येणे कठीण आहे.

पुढे एनआरसीमध्ये नोंद करण्याची जबाबदारी नागरिकाची, बदल किंवा दुरुस्ती करून घेण्याची जबाबदारी नागरिकाची आणि मी नागरिक आहे हे सिद्ध करण्याची जबाबदारी नागरिकाची, याचा अर्थ काय? नागरिकांची सोय करण्यासाठी एनआरसी आहे की छळ मांडण्यासाठी, असा साहजिकच प्रश्न पडतो. बरे, नोंद करताना चुका असतील, दुरुस्त्यांसाठी किंवा जर अधिकाऱ्यांनी त्याच्या नोंदीवर, दस्तऐवजावर आक्षेप घेतला तर त्यासाठी तहसीलदारापासून जिल्हाधिकाऱ्यांपर्यंत ज्या सुनावण्या लागतील त्यासाठी वर्षानुवर्षे त्याला खेटे मारावे लागतील. लोकांना न्यायदानाचा अत्यंत वाईट अनुभव आहे. सरकारी कर्मचाऱ्यांची अरेरावी आणि बेफिकरी त्यांचा जीव घेईल. मध्यमवर्गीय, शिकलेले लोक मेटाकुटीला येतील. मग, अशिक्षित, गरीब, मजूर, भटके विमुक्त, डोंगरदऱ्यांत, लांब अंतरावर खेड्यात राहणारी माणसे काय करतील? पोट भरण्याचे सोडून, कर्ज काढून तहसीलदार आणि जिल्हाधिकाऱ्यांच्या दारात बसून राहतील? ही कल्पनाच भयानक, अत्याचारी आहे. जुन्या काळातील कोण्या लहरी, विकृत, जुलमी आणि मूर्ख राजाची गोष्ट आठवायला होते.

या स्वरूपात आणि पद्धतीने एनआरसी होणार असेल तर आपली नागरिकत्वाची कबर खणून ठेवण्याचा हा आचरट प्रकार आहे. आपले मढे आपण

ओढत असल्याची स्वप्ने पडल्यासारखे वाटते. रौलट ॲक्टपेक्षा हा भयानक प्रकार आहे. असे प्रकार हाणून पाडण्याशिवाय दुसरा उपाय नाही. 'काळरात्र झाली. अरे, पुन्हा आयुष्याच्या पेटवा मशाली' म्हणावे लागेल. त्यामुळे सरकारला वाकवण्याशिवाय तरणोपाय दिसत नाही.

परिशिष्ट १

भारतीय नागरिकत्व कायदा, १९५५

सेक्शन १४ A नॅशनल आयडेंटिटी कार्ड प्रदान करणे

(१) केंद्र सरकार प्रत्येक भारतीय नागरिकाची सक्तीने नोंदणी करून त्याला नॅशनल आयडेंटिटी कार्ड प्रदान करू शकेल.

(२) केंद्र सरकार नॅशनल रजिस्टर ऑफ इंडियन सिटिझन्स तयार करू शकेल आणि त्या कार्यासाठी नॅशनल रजिस्ट्रेशन ॲथॉरिटी गठित करेल.

(३) सिटिझनशिप (अमेंडमेंट) ॲक्ट २००३, लागू होण्याच्या तारखेपासून रजिस्ट्रेशन ऑफ बर्थ ॲन्ड डेथ ॲक्ट, १९६९ (१८ ऑफ १९६९)च्या सेक्शन ३ सब- सेक्शन (१) अंतर्गत नेमण्यात आलेले रजिस्ट्रार जनरल, इंडिया हे नॅशनल रजिस्ट्रेशन ॲथॉरिटी म्हणून पदभार सांभाळतील आणि रजिस्ट्रार जनरल ऑफ सिटिझन रजिस्ट्रेशन म्हणून कार्य पाहतील.

(४) रजिस्ट्रार जनरल ऑफ सिटिझन रजिस्ट्रेशन यांना त्यांचे कार्य आणि जबाबदारी पार पाडण्यासाठी आवश्यक इतर सहाय्यक अधिकारी आणि कर्मचारी- वर्ग यांची केंद्र सरकार नियुक्ती करेल.

(५) सक्तीने भारतीय नागरिकांची नोंदणी करण्यासाठी कोणत्या प्रक्रियेचे पालन करावे हे निर्देशित करण्यात येईल.

दि सिटिझनशिप (रजिस्ट्रेशन ऑफ सिटिझन्स ॲन्ड इश्यू ऑफ नॅशनल आयडेंटिटी कार्ड्स) रूल २००३.

सिटिझनशिप ॲक्ट १९५५च्या सेक्शन १८ सब-सेक्शन (१) व (३) अंतर्गत प्राप्त अधिकारानुसार केंद्र सरकारद्वारा सदर नियमावली बनवलेली आहे.

रूल २ : व्याख्या

(a) 'ॲक्ट' म्हणजे दि सिटिझनशिप ॲक्ट, १९५५ (५५ ऑफ १९५५)

(b) 'चीफ रजिस्ट्रार ऑफ बर्थ ॲन्ड डेथ' म्हणजे रजिस्ट्रेशन ऑफ बर्थ ॲन्ड डेथ ॲक्ट, १९६९ (१८ ऑफ १९६९) अंतर्गत नियुक्त चीफ रजिस्ट्रार ऑफ

बर्थ ॲन्ड डेथ,

(c) ‘सिटीझन’ म्हणजे भारतीय राज्यघटना आणि ॲक्टमधील तरतुदींनुसार,

(d) ‘डिरेक्टर ऑफ सिटिझन रजिस्ट्रेशन’ म्हणजे सेन्सस ॲक्ट १९४८ अंतर्गत राज्य किंवा केंद्रशासित प्रदेशात केंद्र सरकारद्वारा नियुक्त डिरेक्टर ऑफ सेन्सस, जो राज्य किंवा परिस्थितीनुसार केंद्रशासित प्रदेशात डिरेक्टर ऑफ सिटिझन रजिस्ट्रेशन म्हणून कार्य करेल.

(e) ‘डिस्ट्रिक्ट रजिस्टर ऑफ इंडियन सिटिझन’ म्हणजे बहुदा जिल्ह्यात वास्तव्य करणाऱ्या भारतीय नागरिकांचा तपशील असलेले रजिस्टर.

(f) ‘डिस्ट्रिक्ट रजिस्ट्रार ऑफ सिटिझन रजिस्ट्रेशन’ म्हणजे कोणत्याही नावाने संबोधला जाणारा, प्रत्येक महसुली जिल्ह्याचा जिल्हाधिकारी, जो डिस्ट्रिक्ट रजिस्ट्रार ऑफ सिटिझन रजिस्ट्रेशन म्हणून कार्य करेल,

(g) ‘लोकल रजिस्टर ऑफ इंडियन सिटिझन’ म्हणजे खेडे किंवा ग्रामीण भाग किंवा गाव किंवा प्रभाग किंवा सीमांकित (रजिस्ट्रार जनरल ऑफ सिटिझन रजिस्ट्रेशनद्वारा सीमांकित) केलेल्या गावातील किंवा शहरातील प्रभागात वास्तव्य करणाऱ्या भारतीय नागरिकांच्या माहितीचे तपशील असलेले रजिस्टर,

(h)‘लोकल रजिस्ट्रार ऑफ सिटिझन रजिस्ट्रेशन’ म्हणजे राज्य सरकारद्वारा नियुक्त सर्वांत खालच्या भौगोलिक विभागाचे अधिकारक्षेत्र असलेला, अर्थात खेडे किंवा ग्रामीण भाग किंवा गाव किंवा प्रभाग किंवा सीमांकित (रजिस्ट्रार जनरल ऑफ सिटिझन रजिस्ट्रेशनद्वारा सीमांकित) केलेल्या गावातील किंवा शहरातील प्रभागाचा स्थानिक अधिकारी किंवा महसुली अधिकारी, जो लोकल रजिस्टर ऑफ इंडियन सिटिझन तयार करण्याचे कार्य करेल,

(i) ‘नॅशनल आयडेंटिटी कार्ड’ म्हणजे नियम १३ अंतर्गत जारी केलेले आयडेंटिटी कार्ड.

(j) ‘नॅशनल आयडेंटिटी नंबर’ म्हणजे रजिस्ट्रार जनरल ऑफ सिटिझन रजिस्ट्रेशन, इंडियाद्वारा प्रत्येक भारतीय नागरिकासाठी निर्धारित खास आयडेंटिटी नंबर.

(k) ‘नॅशनल रजिस्टर ऑफ इंडियन सिटिझन’ म्हणजे भारतात आणि भारताबाहेर वास्तव्य करणाऱ्या भारतीय नागरिकांचा तपशील असलेले रजिस्टर,

(l) ‘पॉप्युलेशन रजिस्टर’ म्हणजे खेडे किंवा ग्रामीण भाग किंवा गाव किंवा प्रभाग किंवा सीमांकित (रजिस्ट्रार जनरल ऑफ सिटिझन रजिस्ट्रेशनद्वारा सीमांकित) केलेल्या गावातील किंवा शहरातील प्रभागात बहुधा वास्तव्यास

असलेल्या व्यक्तींच्या माहितीचे तपशील असलेले रजिस्टर.

(m) 'रजिस्ट्रार जनरल ऑफ सिटिझन रजिस्ट्रेशन' म्हणजे रजिस्ट्रेशन ऑफ बर्थ अॅन्ड डेथ अॅक्ट, १९६९ (१८ ऑफ १९६९) अंतर्गत नियुक्त रजिस्ट्रार जनरल, इंडिया, जो रजिस्ट्रार जनरल ऑफ सिटिझन रजिस्ट्रेशन म्हणून कार्य करेल.

(n) 'स्टेट रजिस्टर ऑफ इंडियन सिटिझन' म्हणजे बहुधा राज्यात वास्तव्य करणाऱ्या भारतीय नागरिकांच्या माहितीचे तपशील असलेले रजिस्टर.

(o) 'सब-डिस्ट्रिक्ट ऑर तालुका रजिस्ट्रार ऑफ सिटिझन रजिस्ट्रेशन' म्हणजे परिस्थितीनुरूप कोणत्याही नावे संबोधला जाणारा, सब-डिस्ट्रिट किंवा तालुक्याचा सब-डिस्ट्रिक्ट मॅजिस्ट्रेट किंवा तालुका एक्झिक्युटिव्ह मॅजिस्ट्रेट, जो सब-डिस्ट्रिक्ट ऑर तालुका रजिस्ट्रार ऑफ सिटिझन रजिस्ट्रेशन म्हणून कार्य करेल.

(p) 'सब-डिस्ट्रिक्ट रजिस्टर ऑफ इंडियन सिटिझन' म्हणजे कोणत्याही नावाने संबोधल्या जाणाऱ्या तालुका अथवा सब-डिस्ट्रिक्टच्या ठिकाण सर्वसाधारणपणे वास्तव्य करणाऱ्या भारतीय नागरिकांच्या माहितीचे तपशील असलेले रजिस्टर

रूल ३. नॅशनल रजिस्टर ऑफ इंडियन सिटिझन-

(१) रजिस्ट्रार जनरल ऑफ सिटिझन रजिस्ट्रेशन हे नॅशनल रजिस्टर ऑफ इंडियन सिटिझन निर्माण करतील आणि त्याची देखरेख करतील,

(२) शक्यतो रजिस्ट्रार जनरल ऑफ सिटिझन रजिस्ट्रेशन यांच्याशी सल्लामसलत करून केंद्र सरकार आदेश काढेल. त्याप्रमाणे नॅशनल रजिस्टर ऑफ इंडियन सिटिझनमध्ये माहितीच्या तपशिलाचा समावेश असेल आणि सदर रजिस्टरची स्टेट रजिस्टर ऑफ इंडियन सिटिझन, डिस्ट्रिक्ट रजिस्टर ऑफ इंडियन सिटिझन, सब- डिस्ट्रिक्ट रजिस्टर ऑफ इंडियन सिटिझन आणि लोकल रजिस्टर ऑफ इंडियन सिटिझन अशा उपविभागांत विभागणी करण्यात येईल,

(३) नॅशनल रजिस्टर ऑफ इंडियन सिटिझनमध्ये प्रत्येक नागरिकाच्या संबंधित खालील माहितीचा तपशील समाविष्ट असेल :

(अ) नाव, (ब) वडिलांचे नाव, (क) आईचे नाव, (ड) लिंग, (ई) जन्म-तारीख, (च) जन्मठिकाण, (छ) पत्ता, (सद्य आणि कायम), (ज) विवाह-विवाहित असल्यास तारीख, पत्नीचे नाव, (झ) शरीरावरील खुणा, (य) नागरिक म्हणून नोंदणीची तारीख,(र) रजिस्ट्रेशनचा नंबर, (ल) नॅशनल

आयडेंटिटी नंबर.

(४) लोकल रजिस्ट्रारच्या अधिकारक्षेत्रात सर्वसाधारणपणे वास्तव्य करणाऱ्या सर्व व्यक्तींशी संबंधित माहिती गोळा करून पॉप्युलेशन रजिस्टर तयार करण्यासंदर्भातील तारीख निश्चित करण्याबाबतचा आदेश केंद्र सरकार मंजूर करू शकेल.

(५) लोकल रजिस्टर ऑफ इंडियन सिटिझनमधील समाविष्ट व्यक्तींसंबंधी माहितीचे तपशील पॉप्युलेशन रजिस्टरमधून योग्यरीत्या पडताळणी केलेले असेल.

रूल ४ : नॅशनल रजिस्टर ऑफ इंडियन सिटिझन तयार करणे

(१) नॅशनल रजिस्टर ऑफ इंडियन सिटिझन तयार करण्याकरिता केंद्र सरकार स्थानिक ठिकाणी वास्तव्य करणाऱ्या प्रत्येक कुटुंब आणि व्यक्तीसंबंधी निर्देशित स्वरूपातील आणि नागरिकत्वासंबंधी माहितीचा तपशील गोळा करण्यासाठी संपूर्ण देशात घरोघरची गणना हाती घेईल.

(२) रजिस्ट्रार जनरल ऑफ सिटिझन रजिस्ट्रेशन ऑफिशियल गॅझेटमधून गणनेचा समय आणि कालावधीचे प्रकटन करेल.

(३) पॉप्युलेशन रजिस्टरमध्ये एकत्रित केलेली प्रत्येक कुटुंब आणि व्यक्तीची माहिती लोकल रजिस्टर ऑफ इंडियन सिटिझन्स तयार करताना समाविष्ट करण्यापूर्वी लोकल रजिस्ट्रार तपासेल आणि छाननी करेल या कामी रजिस्ट्रार जनरल ऑफ सिटिझन रजिस्ट्रेशन यांच्या निर्देशनाप्रमाणे एक किंवा अधिक व्यक्तींचे साहाय्य मिळू शकेल.

(४) छाननी प्रक्रियेत ज्या व्यक्तीची नागरिकता संशयास्पद आढळते अशा व्यक्तीचा तपशील लोकल रजिस्ट्रार योग्य शेऱ्यासहित अधिक तपासासाठी पॉप्युलेशन रजिस्टरमध्ये नोंदवेल आणि संशयास्पद नागरिकत्वाबाबत माहिती संबंधित व्यक्ती अथवा कुटुबांला योग्य निर्देशित नमुन्यात, छाननी प्रक्रिया संपताच, तत्काळ कळवण्यात येईल.

(५) (ए) सब-रूल (४) मध्ये उल्लेखलेल्या प्रत्येक व्यक्ती किंवा कुटुंबाला आपली माहिती नॅशनल रजिस्टर ऑफ इंडियन सिटिझनसमध्ये नोंदवण्याचा किंवा वगळण्याचा अंतिम निर्णय घेण्यापूर्वी सब-डिस्ट्रिक्ट किंवा तालुका रजिस्ट्रार ऑफ सिटिझन रजिस्ट्रेशन यांच्यापुढे आपली बाजू मांडण्याची संधी देण्यात येईल.

(बी) सब-डिस्ट्रिक्ट किंवा तालुका रजिस्ट्रार नोंदणी झाल्यानंतर ९० दिवसांच्या आत आपले निरीक्षण नोंदवेल किंवा माफक मुदतवाढ घेतल्यास

सकारण लेखी नोंद करून मुदतवाढ संपण्यापूर्वी नोंदवेल,

(६) (अ) कोणतीही हरकत मागविण्यासाठी किंवा कोणत्याही नावाची नोंदणी किंवा दुरुस्त्यांसाठी लोकल रजिस्टर ऑफ इंडियन सिटिझनचा ड्राफ्ट सब-डिस्ट्रिक्ट किंवा तालुका रजिस्ट्रार प्रसिद्ध करतील कुटुंब किंवा व्यक्तींची जमा केलेली आणि सादर झालेली माहिती अंतिमत: नॅशनल रजिस्टर ऑफ इंडियन सिटिझनमध्ये नोंदवण्यात येईल.

(बी) लोकल रजिस्टर ऑफ इंडियन सिटिझन्सबाबत जर विशिष्ट नोंदीविरुद्ध कोणतीही हरकत किंवा नावाचे समावेशन किंवा कोणत्याही दुरुस्त्या असतील तर लोकल रजिस्टर ऑफ सिटिझन्स ड्राफ्ट प्रसिद्ध झालेल्या तारखेपासून ३० दिवसांच्या आत रजिस्ट्रार जनरल ऑफ सिटिझन रजिस्ट्रेशन यांच्याद्वारा निर्देशित केले जाईल अशा नमुन्यात हरकतीची कारणे आणि स्वरूप स्पष्ट करून हरकत नोंदवता येईल.

(सी) सब-रूल (५) (ए)मधील तरतुदींच्या अधीन सब-डिस्ट्रिक्ट किंवा तालुका रजिस्ट्रार अशा हरकती विचारात घेतील आणि ९० दिवसांच्या आत थोडक्यात निकाली काढतील, आणि अशाप्रकारे तयार केलेले लोकल रजिस्टर ऑफ इंडियन सिटिझन त्यानंतर डिस्ट्रिक्ट रजिस्ट्रार ऑफ सिटिझन रजिस्ट्रेशन यांच्याकडे सादर करतील, जे लोकल रजिस्टर ऑफ इंडियन सिटिझनमधील नोंदी पुढे नॅशनल रजिस्टर ऑफ इंडियन सिटिझनमध्ये नोंदविल्या जातील असे पाहतील.

(७) (ए) सब-रूल (५) किंवा सब-रूल (६) अंतर्गत, सब-डिस्ट्रिक्ट किंवा तालुका रजिस्ट्रार यांच्या आदेशाने बाधित झालेली कोणतीही व्यक्ती आदेशाच्या तारखेपासून ३० दिवसांच्या आत डिस्ट्रिक्ट रजिस्ट्रार ऑफ सिटिझन रजिस्ट्रेशन यांच्याकडे अपील करू शकते.

(इ) डिस्ट्रिक्ट रजिस्ट्रार ऑफ सिटिझन रजिस्ट्रेशन बाधित व्यक्तीला आपले म्हणणे सादर करण्याची संधी दिल्यानंतर अपील सादर झाल्यापासून ९० दिवसांच्या आत अंतिम निर्णय घेईल.

(ब) अपील मंजूर झाल्यास तसा तपशील नॅशनल रजिस्टर ऑफ इंडियन सिटिझनमध्ये नोंदवण्यात येईल.

रूल ५ : केंद्र सरकार, राज्य सरकार आणि लोकल बॉडीजच्या अधिकाऱ्यांनी रजिस्ट्रार जनरल ऑफ सिटिझन रजिस्ट्रेशनला साहाय्य करण्याविषयी-

प्रत्येक कुटुंब आणि व्यक्तीसंबंधी डाटाबेस तयार करण्याच्या कामी आणि या

नियमातील तरतुदींची अंमलबजावणी करण्यासाठी केंद्र सरकार, राज्य सरकार, लोकल बॉडीजचे अधिकारी किंवा त्यांच्या अधिकारातील कर्मचारी, रजिस्ट्रार जनरल ऑफ सिटिझन रजिस्ट्रेशन किंवा त्यांच्या वतीने अधिकृत करण्यात आलेल्या व्यक्तीला साहाय्य करतील.

रूल ६ : नॅशनल रजिस्टर ऑफ इंडियन सिटिझनचा आरंभ

(१) रजिस्ट्रार जनरल ऑफ सिटिझन रजिस्ट्रेशन आदेशान्वये संपूर्ण भारतात नॅशनल रजिस्टर ऑफ इंडियन सिटिझनचा आरंभ करण्याची तारीख सूचित करतील.

(२) सबरूल (१)अंतर्गत झालेल्या आदेशामध्ये रजिस्ट्रार जनरल ऑफ सिटिझन रजिस्ट्रेशनने निर्देशित केल्यास नॅशनल रजिस्टर ऑफ इंडियन सिटिझनसची स्थापना करण्यासाठी आरंभकाळ नमूद केला जाऊ शकतो.

(३) सब- रूल (२)अंतर्गत निर्देशित आरंभकाळात प्रत्येक व्यक्तीने लोकल रजिस्ट्रार ऑफ सिटिझन रजिस्ट्रेशनकडे आपली नोंदणी अवश्य करावी लागेल.

रूल ७ : कुटुंबप्रमुख आणि व्यक्तीला माहिती सादर करावी लागेल

(१) रूल ४ अंतर्गत नॅशनल रजिस्टर ऑफ इंडियन सिटिझन्स तयार करण्यासाठी जबाबदार असलेल्या अधिकाऱ्यांना सहकार्य करणे आणि लोकल रजिस्टर ऑफ इंडियन सिटिझन्सकडे आरंभकाळाच्या दरम्यान नोंदणी करणे प्रत्येक भारतीय नागरिकाला बंधनकारक आहे.

(२) निर्देशित कालावधीदरम्यान पॉप्युलेशन रजिस्टर तयार करण्यासाठी प्रत्येक कुटुंब सदस्याचे नाव आणि संख्या आणि रूल ३ मधील सब-रूल (३)मध्ये नमूद इतर अचूक माहिती देण्याची जबाबदारी त्या कुटुंबाचा प्रमुख असणाऱ्याची आहे.

(३) लोकल रजिस्ट्रार ऑफ सिटिझन रजिस्ट्रेशनकडे एकदा नोंदणी करणे आणि अचूक व्यक्तिगत माहिती सादर करणे ही प्रत्येक नागरिकाची जबाबदारी आहे.

(४) अवलंबितांच्या बाबतीत जसे अठरा वर्षे पूर्ण न केलेला अल्पवयीन किंवा जो शारीरिक आव्हान असलेला आहे, त्याच्या बाबतीत माहिती सादर करण्याची जबाबदारी कुटुंबप्रमुखाची असेल :

संस्था उदा. अनाथालय, वृद्धाश्रम, मानसिक रोग्यांचे आश्रयघर यांचा विचार करता, संस्थेमध्ये वास्तव्य करणाऱ्या व्यक्तींच्या बाबतीत आवश्यक तपशील सादर करणे ही त्या संस्थेच्या प्रमुखाची जबाबदारी असेल.

रूल ८ : डिस्ट्रिक्ट रजिस्ट्रार, सब-डिस्ट्रिक्ट किंवा तालुका रजिस्ट्रार किंवा लोकल रजिस्ट्रार ऑफ सिटिझन रजिस्ट्रेशन यांचा माहिती मिळवण्याचा अधिकार-

डिस्ट्रिक्ट रजिस्ट्रार, सब-डिस्ट्रिक्ट किंवा तालुका रजिस्ट्रार किंवा लोकल रजिस्ट्रार ऑफ सिटिझन रजिस्ट्रेशन आदेशाद्वारे कोणत्याही व्यक्तीला कोणत्याही व्यक्तीच्या नागरिकत्वाची स्थिती निश्चित करणारी त्याच्याजवळील कोणतीही माहिती सादर करण्यासाठी आदेश देऊ शकतो, आणि आदेशानुरूप मागितलेली माहिती सादर करणे अशा व्यक्तीकरिता बंधनकारक आहे.

रूल ९ : नॅशनल रजिस्ट्रार ऑफ इंडियन सिटिझनमध्ये नोंदी करण्याची प्रक्रिया -

नॅशनल रजिस्टर ऑफ इंडियन सिटिझन तयार करण्यासाठी आणि त्या रजिस्टरमध्ये कुटुंब आणि व्यक्तींच्या बाबतीत नोंदवायच्या प्रस्तावित तपशिलासंदर्भातील दावे आणि हरकती निकाली काढण्याबाबत अवलंबिली जाणारी प्रक्रिया रजिस्ट्रार जनरल ऑफ सिटिझन रजिस्ट्रेशन आदेशाद्वारे निर्देशित करतील.

रूल १० : नॅशनल रजिस्टर ऑफ इंडियन सिटिझनमधून नाव आणि तपशील काढून टाकणे -

(१) रजिस्ट्रार जनरल ऑफ सिटिझन रजिस्ट्रेशन किंवा अधिकृत अधिकाऱ्याने दिलेल्या आदेशाद्वारे नॅशनल रजिस्ट्रार ऑफ इंडियन सिटीझनमधून नागरिकाचे नाव आणि तपशील खालील परिस्थितीत काढून टाकता येईल-

(अ) व्यक्तीच्या मृत्यूमुळे, किंवा

(ब) कायद्याच्या सेक्शन ८ प्रमाणे भारतीय नागरिकत्व हिरावून घेतल्यास, किंवा (क) व्यक्ती अथवा कुटुंबामार्फत दिली गेलेली माहिती चुकीची आढळून आल्याने व्यक्तीच्या नागरिकत्वाच्या अवस्थेवर परिणाम झाल्याने

(२) सब- रूल (१) क्लॉज (अ)प्रमाणे भारतीय नागरिकत्व समाप्त झाले आहे हे डिस्ट्रिक्ट रजिस्ट्रार ऑफ सिटिझन रजिस्ट्रेशन यांना ३० दिवसांच्या आत कळविणे हे संबंधित भारतीय नागरिकाचे कर्तव्य आहे.

(३) सब-रूल (१) खाली आदेश झाल्याप्रसंगी संबंधित व्यक्तीला, किंवा मृत्यू झाला असल्यास त्याच्या जवळच्या नातेवाइकाला नॅशनल रजिस्टर ऑफ सिटिझनसमधून माहिती काढून टाकण्याबद्दल रीतसर कळवण्यात येईल.

जर अधिकृत अधिकाऱ्याने दिलेल्या आदेशामुळे एखादी व्यक्ती बाधित होत

असेल तर अशा आदेशापासून ३० दिवसांच्या आत अशा आदेशाविरुद्ध संबंधित अधिकाऱ्याकडे अपील करता येईल.

(४) अर्जदाराला आपली बाजू मांडण्याची संधी दिल्यानंतर आणि प्रतिपादनाच्या पुष्ट्यर्थ दस्तऐवज किंवा तोंडी पुरावा सादर केल्यानंतर सब-रूल (३)अंतर्गत अपील अर्ज निकाली काढण्यात येईल.

रूल ११ : नॅशनल रजिस्टर ऑफ इंडियन सिटिझनचे नूतनीकरण आणि सांभाळ-

(१) रजिस्ट्रार जनरल ऑफ सिटिझन रजिस्ट्रेशन इलेक्ट्रॉनिक किंवा इतर अन्य साधनांच्या माध्यमात नॅशनल रजिस्टर ऑफ इंडियन सिटिझनचा सांभाळ करतील, ज्याचे रजिस्ट्रेशन ऑफ बर्थस ॲन्ड डेथ्स ॲक्ट, १९६९ (१८ ऑफ १९६९) आणि ॲक्टमध्ये उल्लेखलेल्या विविध रजिस्टरमधील उताऱ्यांच्या आधारे निरंतर नूतनीकरण होत राहील.

(२) जन्म अथवा मृत्यू अशा कुटुंबातील कोणत्याही घटनेप्रसंगी लोकल रजिस्ट्रार ऑफ इंडियन सिटिझनमध्ये त्याची रीतसर नोंद करणे किंवा नोंद काढणे हे प्रत्येक कुटुंबप्रमुखाचे कर्तव्य आहे.

(३) चीफ रजिस्ट्रार ऑफ बर्थ्स ॲन्ड डेथ्स आणि बर्थ ॲन्ड डेथ्सची नोंदणी करण्याच्या कामात गुंतलेले सर्व इतर अधिकारी नॅशनल रजिस्टर ऑफ इंडियन सिटिझनच्या नूतनीकरणाच्या कामी सब-रूल (१)च्या अधीन रजिस्ट्रार जनरल ऑफ सिटिझन रजिस्ट्रेशन यांना साहाय्य करतील.

रूल १२ : नॅशनल रजिस्टर ऑफ इंडियन सिटिझनमधील नोंदीमध्ये बदल करणे-

संबंधित व्यक्तीकडून अर्ज प्राप्त होऊन आणि त्याची रीतसर तपासणी झाल्यानंतर सब-डिस्ट्रक्ट किंवा तालुका रजिस्ट्रार नॅशनल रजिस्टर ऑफ इंडियन सिटिझनमध्ये खालील तपशिलाबाबत बदल करण्यास अधिकृत मान्यता देतील :

(ए) नावातील बदल, किंवा

(बी) दत्तक प्रकरणात संबंधित कायद्यामुळे अर्जदाराच्या पालकांच्या नावात झालेला बदल, किंवा

(सी) रहिवास पत्त्यातील बदल, किंवा

(डी) वैवाहिक अवस्थेतील बदल, किंवा

(इ) लिंगबदल

रूल १३ : नॅशनल आयडेंटिटी कार्डचे वाटप

रजिस्ट्रार जनरल ऑफ सिटिझन रजिस्ट्रेशन किंवा त्यांच्या वतीने नियुक्त झालेले अधिकृत अधिकारी ज्याची रूल (३)मधील सब-रूल (३)अंतर्गत तपशीलवार माहिती नॅशनल रजिस्टर ऑफ इंडियन सिटिझनमध्ये नोंद झाली आहे अशा प्रत्येक नागरिकाला नॅशनल आयडेंटिटी कार्ड प्रदान करतील.

रूल १३ : नॅशनल आयडेंटिटी कार्ड ही सरकारी मालमत्ता आणि त्याला व्यवस्थित सांभाळणे ही नागरिकांची जबाबदारी-

(१) नॅशनल आयडेंटिटी कार्ड ही केंद्र सरकारची मालमत्ता राहील.

(२) कायदेशीर होणारा वापर वगळता कोणतीही व्यक्ती नॅशनल आयडेंटिटीचे कार्डमध्ये स्वेच्छेने बदल, अदलाबदल, नष्ट किंवा अन्यप्रकारे वापर करणार नाही.

(३) रूल १० मधील सब-रूल (१)मध्ये नमूद कोणतीही घटना घडल्यास संबंधित नागरिक किंवा जवळचा नातेवाईक परिस्थितीप्रमाणे रजिस्ट्रार जनरल ऑफ सिटिझन रजिस्ट्रेशन किंवा त्यांच्या वतीने अधिकृत अधिकारी यांच्याकडे नॅशनल आयडेंटिटी कार्ड जमा करेल.

(४) आयडेंटिटी कार्ड गमावल्यास तत्काळ जवळच्या पोलिस ठाण्यात आणि संबंधित अधिकारी यांना कळविणे परिस्थितीनुरूप नागरिक किंवा त्याच्या जवळच्या नातेवाइकाचे कर्तव्य असेल.

रूल १७ : शिक्षापात्र बाबी

रूल ५ए, ७ए, ८ए, १०ए, ११ए आणि १४ मधील तरतुदींचे उल्लंघन एक हजार रुपयांच्या दंडास पात्र राहील. ◆

४

नागरिकता दुरुस्ती कायदा २०१९ : गरज किती? उपयोग किती? टिकेल किती?

▶ नवीन नागरिकता कायदा २०१९च्या प्रस्तावनेत कायदा दुरुस्ती का करावी लागते याचे स्पष्टीकरण देण्यात आले आहे. त्यानुसार-

अफगाणिस्तान, पाकिस्तान आणि बांगला देश त्यांच्या घटनेनुसार इस्लामिक राष्ट्र आहेत. या देशांत राहणाऱ्या हिंदू, शीख, बौद्ध, जैन, पारसी आणि ख्रिश्चन समुदायांचा या देशात धर्माच्या आधारावर छळ होत आलेला आहे. त्यांना आपल्या धर्माचे पालन करणे, प्रचार करण्यास मज्जाव आणि प्रतिबंध करण्यात येतो. त्यामुळे त्यांनी आश्रयासाठी भारतात पलायन केले आहे. त्यांच्याकडील दस्तावेज मुदतबाह्य झाले, अपुरे असले किंवा नसले तरी ते भारतात राहत आले आहेत. हे लोक नागरिकत्व कायद्याच्या सेक्शन ५ किंवा ६ प्रमाणे अर्ज करण्यास अपात्र आहेत.

केंद्र सरकारने पासपोर्ट एन्ट्री (इन टु इंडिया कायदा)१९२० आणि फॉरिनर्स ॲक्ट १९४६ आणि नोटिफिकेशनद्वारे जारी ता. ७/९/२०१५ आणि १८/७/२०१६ नियम किंवा आदेशांच्या अंतर्गत शिक्षेपासून सुरक्षित करण्यासाठी स्थलांतरितांना सूट दिली आहे. त्याचबरोबर ता. ८/१/२०१६ आणि १४/९/२०१६ च्या आदेशाने त्यांना दीर्घ मुदतीचा व्हिसा देऊ केला आहे. आता या स्थलांतरितांना भारतीय नागरिक करण्याचे प्रस्तावित केले आहे.

वर उल्लेखिलेल्या धर्माचे आणि देशातील लोक भारतीय वंशाचे असल्याचा पुरावा सादर करू शकत नसल्याने सेक्शन ५ अंतर्गत नागरिकत्वासाठी अर्ज करू शकत नाहीत. सेक्शन ६ प्रमाणे नॅच्युरलायझेशनसाठी अर्ज करावे तर तिसऱ्या शेड्युलप्रमाणे १२ वर्षे वास्तव्याची अट आहे. या अडचणीमुळे त्यांना भारतीय नागरिक होण्याची संधी नाकारली जाते. यास्तव वास्तव्याची अट पाच वर्षांची करण्याचे प्रस्तावित केले आहे.

तसेच, नॉर्थ ईस्टमधील आदिवासी लोकांना राज्यघटनेच्या शेड्यूल सहाप्रमाणे आणि बेंगाल ईस्टर्न फ्रंटियर रेग्युलेशन १८७३ अंतर्गत 'इनर लाइन'ने संरक्षित

लोकांना या कायद्यापासून सुरक्षित करू इच्छिते.

कायद्यात करण्यात आलेल्या दुरुस्त्या खालीलप्रमाणे आहेत-

दि सिटिझनशिप अमेंडमेंट ॲक्ट २०१९

(सेक्शन २) : अन्वयार्थ

सब- सेक्शन (१) : (बी) 'बेकायदा स्थलांतरित' म्हणजे परकीय व्यक्ती, जिने

(अ) वैध पासपोर्ट किंवा इतर प्रवासाची कागदपत्रे आणि इतर असे दस्तऐवज किंवा याबाबतीत निर्देशित करण्यात येईल अशा कायद्याखाली किंवा अधिकाराविना भारतात प्रवेश केला आहे

(ब) वैध पासपोर्ट किंवा इतर प्रवासाची कागदपत्रे आणि इतर असे दस्तऐवज किंवा या बाबतीत निर्देशित करण्यात येईल अशा कायद्याखाली किंवा अधिकारासह भारतात प्रवेश केला आहे, परंतु परवानगीपेक्षा अधिक काळासाठी भारतात राहिला आहे.

कायद्यातील नवीन दुरुस्ती-

'परंतु जर हिंदू, शीख, बौद्ध, जैन, पारसी किंवा ख्रिश्चन समाजाशी संबंधित व्यक्तीने ३१ डिसेंबर २०१४ रोजी किंवा तत्पूर्वी अफगाणिस्तान, बांगला देश किंवा पाकिस्तानातून भारतात प्रवेश केला असेल आणि पासपोर्ट (एन्ट्री इन टु इंडिया) ॲक्ट १९२० मधील सेक्शन (३), सब- सेक्शन (२) क्लाज (ब)मधून किंवा फॉरिनर्स ॲक्ट १९४६ मधील लागू होणाऱ्या तरतुदीमधून किंवा नियम किंवा त्याअधीन केलेल्या आदेशातून, केंद्र सरकारने ज्या व्यक्तीला सूट दिली असेल तिला या कायद्यांतर्गत बेकायदा स्थलांतरित समजले जाणार नाही.''

सेक्शन ६ बी (१) केंद्र सरकार किंवा त्याने याकरिता नियुक्त केलेला अधिकारी निर्देशित करण्यात येतील अशा अटी, शर्ती आणि पद्धतीच्या अधीन याकरिता दाखल केलेल्या अर्जास अनुसरून, सेक्शन ६, सब-सेक्शन (१) क्लॉज (बी)मध्ये नमूद व्यक्तीला सर्टिफिकेट ऑफ रजिस्ट्रेशन किंवा सर्टिफिकेट ऑफ नॅच्युरलायझेशन प्रदान करेल.

(२) सेक्शन ५ मधील नमूद अटींची पूर्तता किंवा शेड्युल तीनमधील तरतुदीनुसार नॅच्युरलायझेशनसाठी आवश्यक अर्हता यांच्या अधीन राहून, सब - सेक्शन (१) अंतर्गत सर्टिफिकेट ऑफ रजिस्ट्रेशन किंवा सर्टिफिकेट ऑफ नॅच्युरलायझेशन बहाल केलेली व्यक्ती तिने भारतात प्रवेश केलेल्या तारखेपासून भारतीय नागरिक गणली जाईल.

(३) व्यक्तीला नागरिकत्व बहाल होताच सिटिझनशिप अमेंडमेंट ॲक्ट २०१९

लागू झालेल्या तारखेपासून, बेकायदा स्थलांतरण किंवा नागरिकत्वासंदर्भात त्याच्या विरोधात प्रलंबित असलेली कारवाई आपोआप रद्द होईल.

व्यक्तीच्या विरोधात कारवाई प्रलंबित असल्याचे कारण देऊन या तरतुदी अंतर्गत नागरिकत्वासाठी अर्ज दाखल करण्यासाठी तिला अपात्र ठरविण्यात येणार नाही आणि केंद्र सरकार किंवा याकरिता नियुक्त अधिकारी या तरतुदीखाली नागरिकत्व मिळण्यास व्यक्ती पात्र ठरते म्हणून तिचा अर्ज स्वीकारण्यास नकार देणार नाही :

पुढे असे, की या तरतुदीखाली नागरिकत्वासाठी अर्ज दाखल करणाऱ्या व्यक्तीला अर्ज दाखल केल्या कारणांनी अर्ज दाखल केल्या रोजी ती ज्या सुविधा आणि हक्कास पात्र होती त्यापासून तिला वंचित करण्यात येणार नाही.

(४) आसाम, मेघालय, मिझोराम, किंवा त्रिपुरामधील राज्यघटनेच्या शेड्युल सहामध्ये समाविष्ट असलेल्या आदिवासी क्षेत्रांना आणि बेंगॉल ईस्टर्न फ्रंटियर रेग्युलेशन, १८७३ अंतर्गत नोटिफाय केलेल्या 'दि इनर लाइन' मध्ये समाविष्ट असलेल्या क्षेत्रांना या सेक्शनमधील तरतुदी लागू होणार नाहीत.

२३ : मूळ कायद्याच्या तिसऱ्या शेड्यूलमध्ये क्लॉज (क)मध्ये खालील तरतूद करण्यात येत आहे-

की हिंदू, शीख, बौद्ध, जैन, पारसी किंवा ख्रिश्चन समुदायाच्या अफगाणिस्तान, बांगला देश किंवा पाकिस्तानशी संबंधित व्यक्तीसाठी या तरतुदीखाली आवश्यक एकूण रहिवासाचा कालावधी किंवा भारत सरकारची सेवा 'अकरा वर्षांपेक्षा कमी नाही' ऐवजी 'पाच वर्षांपेक्षा कमी नाही' असे वाचले जाईल.

नवा नागरिक कायदा या रीतीने दुरुस्त करणे खरेच आवश्यक होते का?

काही अटींअंतर्गत भारताचा नागरिक मुख्य चार प्रकारांनी होता येते : १) जन्माने, २) वंशाने, ३) नोंदणीद्वारे आणि ४) नागरिकीकरणाने (नॅच्युरलायझेशन). भारतीय नागरिकाशी लग्न केल्यामुळे नागरिकत्व मिळते. नागरिकीकरणाने भारतीय नागरिकत्व जगातील कोणतीही व्यक्ती मिळवू शकते. यासाठी भारतीय वंशाचा असण्याची अट नाही. आजवर या सर्व प्रकारांनी अनेकांना नागरिकत्व मिळाले आहे. आता सरकार ज्या अफगाणिस्तान, पाकिस्तान आणि बांगला देशच्या मुस्लिमांना वगळणारा कायदा बनविते आहे. अगदी त्या देशातील नागरिकांना, कोणत्याही धर्माचे असोत, आजवर नागरिकत्व मिळत आले आहे.

'मिनिस्ट्री ऑफ होम अफेअर्स'च्या आकडेवारीनुसार २१ डिसेंबर २०१८ अखेर ४१,३३१ पाकिस्तानी आणि ४१९३ अफगाणी विविध धार्मिक अल्पसंख्य समुदायांचे नागरिक दीर्घ मुदतीच्या व्हिसाच्या आधारे राहत आहेत. आणि सरकारने

संसदेत सांगितल्याप्रमाणे, या तीन मुस्लिम देशांतून आलेल्या सहा धर्मांच्या २४४७ स्थलांतरितांना नोंदणीद्वारे आणि नागरिकीकरणाद्वारे भारतीय नागरिकत्त्व देण्यात आले आहे. तसेच २०१६ ते २०१८ दरम्यान १५९५ पाकिस्तानी आणि ३९१ अफगाणी स्थलांतरितांना नागरिकत्व देण्यात आले आहे. यामध्ये मुस्लिम समाविष्ट आहेत की नाही हे स्पष्ट केलेले नाही. विशेष म्हणजे बलूच प्रांतातील पाकिस्तानी लोकांना भारताने आश्रय दिला आहे.

वरील आकडेवारी पाहिली की लक्षात येते, की अमेरिका, रशिया, सौदी अरेबिया किंवा युरोपच्या तुलनेत भारताने जगातील अथवा शेजारच्या राष्ट्रांतील अत्यल्प लोकांना सामावून घेतले आहे, (प्रकरण-६ पाहावे) दुसरे भारतीय नागरिकत्व प्राप्त करणे इतके सोपे नाही. दिवसेंदिवस त्यासाठी कायदे कठोर करण्यात आले आहेत. बांगला देश, पाकिस्तान आणि अफगाणिस्तानातून संभाव्य मुस्लिम अथवा मुस्लिमेतर स्थलांतरित होण्याची शक्यता पडताळून पाहिली आहे. अशी कोणतीही शक्यता दिसत नाही. त्यामुळे देशात बेकायदा स्थलांतरितांची फार मोठी समस्या निर्माण झाली आहे किंवा निर्माण होण्याची शक्यता आहे, या म्हणण्याला काहीच अर्थ नाही.

दुसरे, प्राप्त कायद्याने कोणत्याही छळ होणाऱ्या व्यक्तीला आश्रय देण्यासाठी किंवा नागरिकत्व देण्यासाठी कायद्यात सुधारणा करणे गरजेचे होते तर त्याला कोणी हरकत घेण्याचे कारण नाही. पण हे तीनच देश का निवडले? म्यानमार, श्रीलंका, नेपाळ, भूतान, चायना का नाही? या प्रत्येक देशातसुद्धा धार्मिक अल्पसंख्याकांवर अनन्वित छळ होतात. जगात अनेक देशांत हुकुमशहा आहेत. राजकीय आणि धार्मिक कारणांनी लोकांचे शिरकाण होते. जगात कोणत्याही माणसावर जीव गमावण्याचा प्रसंग आला तर मानवतेच्या आधारावर आपण त्याला नागरिकत्वाचे दरवाजे खुले करायला नको का? भारताची महान सहिष्णुता, विश्वाला कुटुंब मानणाऱ्या परंपरेचे गोडवे तर हेच लोक गात होते. अचानक विचार इतका संकुचित का झाला?

दुसरे, भारतात दलित, आदिवासी, भटके आणि विमुक्त यांच्या छळाच्या कहाण्या कमी हिंस्र आहेत का? देवळात साधा प्रवेश आजही दिला जात नाही. मानवी हक्कांचे हनन होते. मुस्लिम राष्ट्रांतील अहमदिया, हजारा, शिया, पख्तू या मुस्लिम समुदायांचासुद्धा तितकाच भयंकर छळ होतो; पण याकडे जाणीवपूर्वक दुर्लक्ष केले जाते. हे तीन देश इस्लामला आपला धर्म मानतात म्हणून मुस्लिमेतर लोकांचा धार्मिक छळ होतो, हे कारण तकलादू आहे. हा ड्रामा केवळ हिंदू-मुस्लिम समाजाची

फाळणी घडविण्यासाठी आहे. हा कायदा भारतीय घटनेचा आत्मा मारणारा आणि मानवतावादाचा खून करणारा आहे, म्हणून याला विरोध झाला पाहिजे.

धार्मिक आधारावर छळ झाल्याने किती लोकांनी पाकिस्तान आणि बांगला देशातून पलायन केले?

गृहमंत्री अमित शहा यांनी पाकिस्तान आणि बांगला देशातून मुस्लिमेतरांची संख्या कमी झाली हे दाखविणारे आकडे संसदेत सादर केले. आश्चर्य म्हणजे हे आकडे फसवे आहेत. दुसरे म्हणजे हे स्थलांतर धार्मिक छळामुळेच झाले याला कोणताही आधार नाही. ही मुद्दाम पसरवलेली धारणा आहे. पाकिस्तानमधील मुस्लिमेतर जनतेची लोकसंख्या ३.५ टक्क्यांच्या आसपास स्थिर आहे. बांगलादेशातील मुस्लिमेतरांची संख्या जरूर ५ टक्क्यांनी घटली; पण यामागे आर्थिक कारण मोठे आहे. नुसतेच हिंदू नव्हे, मोठ्या प्रमाणावर मुस्लिमांचेही स्थलांतर झाले आहे.

नागरिकता कायद्याची गरज सांगताना मोदी सरकारने पाकिस्तान, बांगला देश आणि अफगाणिस्तानात हे इस्लामी राष्ट्र आहे आणि तेथे हिंदू आणि इतर धर्मीयांवर अत्याचार होतात, असे प्रतिपादन केले आहे. हे पटविण्यासाठी लोकसभेत अमित शहांनी सांगितले, की स्वातंत्र्याच्या वेळी पाकिस्तानी लोकसंख्येत मुस्लिमेतरांचे प्रमाण २३ टक्के होते. २०११ साली हे घटून ३.७ टक्क्यांवर आले. त्याचप्रमाणे १९४७ मध्ये बांगला देशात गैरमुस्लिमांचे लोकसंख्येतील प्रमाण २२ टक्के होते, ते २०११ साली ७.८ टक्क्यांपर्यंत घसरले.

आपण पाकिस्तान आणि बांगला देशात झालेल्या जनगणनेचे आकडे घेऊन शहांनी दिलेली आकडेवारी तपासू. १९४७ साली देश स्वतंत्र झाला त्या वेळची आकडेवारी उपलब्ध नाही. फाळणीमुळे दोन्ही देशांतून मोठ्या प्रमाणावर स्थलांतर झाले आहे. त्यामुळे १९४१च्या जनगणनेची अखंड भारताची उपलब्ध आकडेवारी उपयोगाची नाही. त्यानंतर १९५१ ते २०११ पर्यंतची जनगणनेची आकडेवारी पाहू या.

१९५१ला पाकिस्तान आणि बांगला देश एकत्र होते. या वेळी एकत्रित पाकिस्तानात मुस्लिम लोकसंख्या ८५.८० टक्के आणि मुस्लिमेतरांची टक्केवारी १४.२० होती. यामध्ये आजच्या पाकिस्तानातील मुस्लिमेतरांचे प्रमाण केवळ ३.४४ टक्के आणि बांगला देशातील मुस्लिमेतरांचे प्रमाण २३.२० टक्के होते.

त्यानंतर दर दशवार्षिक जनगणनेत पाकिस्तानातील मुस्लिमेतरांचे प्रमाण पुढीलप्रमाणे आढळते-

१९६१- २.८० टक्के , १९७२, ३.२५ टक्के, १९८१- ३.३३ टक्के, १९९८- ३.७० टक्के.

तसेच, बांगला देश १९७१ मध्ये निर्माण झाला, त्याच्या लोकसंख्येतील बदल पुढीलप्रमाणे-

१९६०-१९.६० टक्के, १९७४-१४.६ टक्के, १९८१- १३.४ टक्के, २००१- १०.४ टक्के, २०११-९.६ टक्के.

वरील आकडेवारी दोन्ही देशांच्या अधिकृत सेन्ससची आहे. याची तपासणी केल्यास, पाकिस्तानची मुस्लिमेतर संख्या फाळणीनंतर ३.४४ टक्के होती ती १९९८ साली ३.७० झाली आहे असे दिसते. म्हणजे पाकिस्तानातून हिंदूंचे विशिष्ट काळात जरी पलायन झाले तरी ते अत्यल्प होते, आणि सध्या मुस्लिमेतरांची लोकसंख्या किंचित सुधारलेली दिसते.

बांगला देशाच्या बाबतीत १९७१च्या युद्धकाळात मुस्लिमेतरांची संख्या ५टक्क्यांनी घटलेली आहे. कारण स्पष्ट आहे- युद्ध. त्यानंतरही मुस्लिमेतरांच्या संख्येत सतत घट दिसते. त्याचे प्रमाण १४.६ पासून ९.६ टक्के झाले आहे. म्हणजे ही घट पुन्हा ५ टक्के इतकी आहे. बांगला देशातील पलायन छळाने झाले आहे, त्याहून गरिबी हे कारण आहे. मात्र, अमित शहा आकड्यांचा खेळ मांडत पाकिस्तानात स्वातंत्र्यानंतर २३ टक्क्यांहून मुस्लिमेतरांची संख्या ३.७ टक्क्यांपर्यंत घसरली हे सांगताना अखंड पाकिस्तानचे आकडे घेतात. वास्तविक पाकिस्तानातील मुस्लिमेतरांची लोकसंख्या नेहमी ३.५ टक्क्यांच्या आसपास राहिली आहे. बांगला देशाबाबतीतसुद्धा ते २२ टक्क्यांची लोकसंख्या ७.८ टक्क्यांवर घसरली असे सांगताना तीच चूक जाणीवपूर्वक करतात. खरे तर बांगला देश १९७१ ला बनला. त्यानंतर झालेल्या जनगणनेनुसार मुस्लिमेतरांची संख्या १४.६ टक्के होती, ती घटून ९.८ टक्के झाली. अवास्तव आकडे देऊन मुस्लिम राष्ट्रात हिंदूंचा छळ होतो. आम्ही त्यांचा बचाव करत आहोत. असा प्रचार करून हिंदूंची सहानुभूती मिळवण्याचा हा स्टंट आहे. पण त्यांनी हिंदूंना हे पण सांगितले पाहिजे, की ते फक्त ३१ डिसेंबर २०१४ पर्यंतच्या बेकायदा घुसखोरांना नागरिकत्व देणार आहेत. हा निर्णय अंमलात आणतानासुद्धा त्यांच्या नाकी नऊ येणार आहेत. कारण नॉर्थ ईस्टमधील कोणतेही राज्य त्यांना सामावून घेण्यास तयार नाही. अरुणाचल प्रदेशात चकमा हिंदू गेल्या दोन दशकांपासून नागरिकत्वाची वाट पाहत आहेत. पण हे राज्य इनर लाइन परमिटमध्ये येते. अशा राज्य आणि प्रदेशासाठी नवीन नागरिकत्व कायदा लागू न करण्याची तरतूद मोदी सरकारने केली आहे. त्यामुळे चकमा हिंदूचे ते काय करणार

आहेत, याचेही उत्तर त्यांना द्यावे लागेल.

सीएए घटनात्मकदृष्ट्या वैध ठरेल?

या कायद्याच्या घटनात्मक वैधतासंदर्भात मी मुख्यत: प्रो. मुस्तफा फैजान आणि माजी सॉलिसिटर जनरल हरीश साळवे यांचे म्हणणे विचारात घेतले आहे.

मुस्तफा फैजान यांच्या म्हणण्याप्रमाणे घटनेने भारतीय अल्पसंख्याकांसाठी विशेष तरतूद केली आहे ती शिक्षण, भाषा, संस्कृती आणि धर्मपालनाच्या बाबतीत. ती नागरिकतेसंदर्भात तरतूद नाही आणि दुसऱ्या देशाच्या अल्पसंख्याकांसाठीसुद्धा नाही. घटनेचे कलम १४, कायद्यापुढे समानता, कायद्याचे समान संरक्षण प्रदान करते आणि धर्म, भाषा, वंश, लिंग किंवा जन्माधारित भेदभाव नाकारते; पण समाजात असमानता आहे. सर्वांना एकच कायदा लागू करणे शक्य नाही. त्यामुळे असमानांना एकसमान कायदा लागू करता येणार नाही. या कायद्यांतर्गत समानतेचे तीन निकष लागू होतात.

(Classification based on intelligible differentia, differential has a rational relation with the objective of the act and it should not be arbitratory.)

कायद्याने केलेले वर्गीकरण संयुक्तिक, तर्काधारित असेल आणि मनमानी असणार नाही. हे निकष पूर्ण होत नसल्यास कायदा समानतेच्या विरुद्ध म्हणून असंविधानिक होईल. त्यामुळे धार्मिकतेवर छळल्या जाणाऱ्या अल्पसंख्याकांच्या वर्गाचा नागरिकत्वासाठी विचार करायचा तर तो केवळ तीन देशांतल्या आणि केवळ सहा धर्माच्या लोकांपुरता मर्यादित करता येणार नाही. भूतानमधील ख्रिश्चन, म्यानमारमधील रोहिंग्या किंवा श्रीलंकेतील तमिळ किंवा चायनातील उगूर यांना वगळण्याचा तर्क काय? त्यामुळे जगातल्या छळल्या जाणाऱ्या सर्वच धार्मिक अल्पसंख्याकांना तो खुला असणे समानतेच्या तत्त्वात बसेल. दुसरे, हा कायदा नॉर्थ ईस्ट राज्ये व लाइन परमिट क्षेत्रांना लागू होणार नाही. त्यामुळे या प्रदेशांत दाखल होणारे छळले गेलेले मानले जाणार नाहीत. त्यामुळे या धार्मिक अल्पसंख्याकांना नागरिकता मिळणार नाही. तसेच, फाळणीचे कारण अफगाणिस्तानसाठी लागू होत नाही. काश्मीरचा विशेषाधिकार संपविण्यासाठी ३७० कायदा रद्द केला. आता नॉर्थ ईस्ट राज्यांना विशेषाधिकार कायद्याने देण्यात येत आहे. या सर्व गोष्टींमध्ये अंतर्विरोध आहे. निकषांच्या विरुद्ध आहे. त्यामुळे सुप्रीम कोर्टात टिकणार नाही. अर्थात, विशेष खंडपीठात निकाल किती वर्षांनी लागेल याची शाश्वती मात्र देता येणार नाही. तरी सुप्रीम कोर्टाने या कायद्याच्या विरोधात दाखल झालेल्या

पिटीशनची सुनावणी घेण्याचे मान्य केल्याची बातमी नुकतीच वाचली. पाहू या.

सॉलिसिटर जनरल साळवे म्हणतात, ''भावनिक मुद्दे बाजूला काढून निव्वळ कायद्याचे विधान पाहिले तर कायद्याचा उद्देश स्पष्ट आहे. मुळात कायदा उल्लेखिलेल्या तीन देशांतील सहा प्रकारच्या धार्मिक अल्पसंख्याकांसाठी मर्यादित करण्यात आला आहे. दुसरे, ते तीनही देश राज्यधर्म घोषित करणारे आहेत. त्यामुळे त्या देशांत धार्मिक अल्पसंख्याकांचा छळ होतो आणि हे सहा समुदाय धार्मिक अल्पसंख्याक आहेत. त्यामुळे कलम १४ चे सर्व निकष त्यांना लागू होतात. कलम १५ भारतीय नागरिकांत भेद न करण्याची ग्वाही देते. परदेशातील अल्पसंख्याकांच्या बाबतीत हे लागू होत नाही. नागरिकत्वाचा कायदा मुळात इतरांना रोखण्यासाठी आहे. कोणाला परवानगी द्यायची हा सरकारचा अधिकार आहे. यात कलम २१प्रमाणे मुस्लिमांच्या हक्कांचे उल्लंघन होत नाही.'' कलम २५ परदेशातील स्थलांतरितांना लागू होत नाही. हा कायदा धर्मनिरपेक्षतासारख्या घटनेच्या मूलभूत चौकटीला धक्का लावणारा आहे का? साळवे म्हणतात, ''मुळात सुप्रीम कोर्टाने 'राज्यघटनेचा पाया' ही संकल्पना संसदेच्या घटना दुरुस्त करण्याच्या अधिकाराला मर्यादित करण्यासंदर्भात पुढे आणली. धर्मनिरपेक्षतेसाठी घटनेत विशेष कायदा नाही. धर्मनिरपेक्षतेच्या सीमा स्पष्ट नाहीत, पण त्याचा घटनेत सर्वत्र आढळ आहे. हे महत्त्वाचे तत्त्वज्ञान आहे. पण नागरिकता कायद्याने भारताशी वांशिक संबंध असलेल्या काही अल्पसंख्याकांना नागरिक होण्याची सवलत दिली म्हणून घटनेच्या पायाला धक्का बसत नाही.'' थोडक्यात, सुप्रीम कोर्टात हा कायदा पक्का टिकेल असे त्यांचे म्हणणे आहे. ◆

५

नागरिक असणे म्हणजे काय?

▶ भारतीय नागरिकत्त्वाचा प्रवास : उदारमतवादाकडून संकुचित धर्मवादाकडे

आपण धर्म आणि जातीच्या संकुचित सीमेत बंदिस्त राहून भारत देशाच्या सीमेत राहतो. देशनिष्ठेपेक्षा आपल्याला धर्माची निष्ठा श्रेष्ठ आहे, म्हणून धर्माच्या सीमेत देशाची सीमा समाविष्ट करण्याची आपण धडपड करतो. यासाठी हिंदुराष्ट्राची निर्मिती करायची आहे. देशाचे नागरिक म्हणून परस्परांतील नाते घनिष्ठ नाही, ते जातभाई आणि धर्मबंधू म्हणून अधिक घट्ट आहे. या सरंजामी नाती आणि निष्ठांना उराशी ठेवून आपण वैश्विक नागरिक होऊ शकत नाही. विविधता, सांस्कृतिक ओळख संपवून सर्वांनी एकरंगी व्हावे, असा याचा अर्थ नाही. माणूस म्हणून आपल्या संवेदना धर्म, जात आणि भाषेच्या पलीकडील असू शकतात. आपले राजकीय, आर्थिक, शैक्षणिक, सामाजिक अशा प्रत्येक बाबतीतले हितसंबंध देश म्हणून एक आहेत. (वैश्विक मानवी समाजाचा विचार नंतर कधी तरी करू.) ते परस्परविरोधी नाहीत. नागरिकांचे नातेसंबंध हे समता, स्वातंत्र्य आणि बंधुतेच्या मानवी मूल्यांनी जोडले जातात. नागरिकतेचे नाते धर्म-जातींच्या पलीकडे वैश्विक मानवी नात्यांनी जोडले जायला हवे. असमानता, विषमता आणि मानवी भेद या सामाजिक वास्तवात अविश्वासाचे वातावरण असते. तणाव आणि संघर्ष अटळ असतात. त्यामुळे राज्यघटनेतील कायद्यांच्या मदतीने विषमतेचे संबंध शासनसंस्था नियंत्रित करते. औपचारिक, नकारात्मक आणि बचावात्मक अविश्वासाचे संबंध शासनसंस्था दूर करू शकत नाही. उलट, या संबंधांचा उपयोग हुशारीने करणे म्हणजे राजकारण आहे. विभागणी, फूट, विग्रह हा राजकारणाचा पाया आहे. यात मानवाची मुक्ती नाही. नागरिक म्हणून आपली वाटचाल या राजकारणाचा पाया बदलण्याकडे झाली पाहिजे. राज्यघटना म्हणजे जणू देशाचा धर्मग्रंथ असावा; त्याला प्रमाण मानून, त्याच श्रद्धेने किंवा निष्ठेने पुरोगामी आणि आधुनिक म्हणवणारे बोलत असतात. ऐकून मला आश्चर्य वाटते. निदान शिकलेली तरुण पिढी हा विषय गांभीर्याने समजून घेईल

अशी अपेक्षा आहे. तोपर्यंत शासनाने आपली वाटचाल नागरिकत्वाला उदारमतवादाकडून धर्मवादाकडे नेण्यासाठी कशी केली पाहू या.

नागरिकत्त्व ही देशाच्या सीमेतील लोकांना सामावणारी आणि इतरांना नाकारणारी नकारात्मक संकल्पना आहे. देशाच्या निर्मितीसोबत माणसांची विभागणी करणारे संबंध अपरिहार्य बनतात. एकार्थाने नागरिकत्त्व मानवजातीची कायमस्वरूपी पक्की विभागणी करते. कायदाशास्त्रात 'जस सोली' (Jus soli) संकल्पना जन्माच्या आधारे नागरिकत्त्व सुचविते. जो देशात जन्मला तो त्या देशाचा नागरिक बनतो (अमेरिका). दुसरी थोडी संकुचित संकल्पना 'जस संग्विनिस' (Jus sanguinis) मानली जाते. या प्रकारात रक्तसंबंधातून नागरिकत्व सिद्ध होते (जर्मनी). म्हणजे केवळ भूमीवर जन्मल्याने नव्हे, नागरिक होण्यासाठी मुळात नागरिक असलेल्या आई-वडील, आजोबा यांचा वंशजसुद्धा तो असावा लागतो. व्यक्ती नागरिक आहे किंवा नाही हे कायद्याने ठरते, पण कायदे करण्याचा अधिकार संसदेतील बहुमताचा असतो. त्यामुळे नागरिकत्त्व ही शासनसंस्थेच्या अधिकाराची बाब बनते. नागरिकत्वाने व्यक्तीचा शासनसंस्थेची असलेला संबंध व्यक्त होतो. नागरिकत्वाचा हक्क मिळाल्यास व्यक्तीला सर्व प्रकारच्या मानवी हक्कांना मुकावे लागते; पण एकदा नागरिकत्व प्राप्त झाल्यास सर्व मानवी हक्क प्राप्त करण्याचा हक्क मिळतो. म्हणून नागरिकत्वाला हक्क आणि अधिकारांचा जुडगा मानले जाते. या मानवी अधिकाराविना नागरिकत्वाला अर्थ नाही. आंतरराष्ट्रीय संस्थांनी नागरिकत्वाच्या नकारात्मक, अमानवी काळ्या बाजूची दखल घेऊन पृथ्वीतलावर जन्मलेल्या प्रत्येक बालकाला राष्ट्रीयत्वाचा मूलभूत हक्क आहे असा आंतरराष्ट्रीय करार केला आहे. भारत या करारावर सही करणारा देश आहे.

भारतीय राज्यघटनेने नागरिकत्त्वाचे प्रकार सांगितलेले आहेत, कोणाला नागरिक होता येईल हे स्पष्ट केले आहे, पण नागरिकत्त्वाची व्याख्या सांगितलेली नाही. राज्यघटनेत भारताच्या नागरिकतेबाबत शक्य तितकी उदारता दाखवण्याचा प्रयत्न करण्यात आला आहे. घटनेच्या भाग दोनमधील आर्टिकल ५ द्वारे भारतीय नागरिकत्त्व जन्माधाराने सिद्ध होते. म्हणून भारताच्या नागरिकत्त्वाची सुरुवात जस सोली सिद्धांताला अनुसरून झाली. घटना अस्तित्वात आल्यानंतर भारताच्या नागरिकत्त्वाचा प्रवास हा 'जस सोली'कडून 'जस संग्विनिस'कडे झालेला आहे. आता तर भारतीय नागरिकत्त्वाला धर्म हा आधार बनविल्याने तो पार 'जस रिलिजिअस'कडे झाला आहे.

भारताचे माजी गृहराज्यमंत्री गोविंद वल्लभ पंत ५ ऑगस्ट १९५५ मध्ये नागरिकत्त्वाचा कायदा संसदेत मांडताना म्हणाले, ''भारतात जन्म झाल्याने नागरिकत्त्वाचा लाभ होतो.... आजच्या युगाचा स्वभाव आणि आत्मा लक्षात घेता आम्ही ही वैश्विक भूमिका घेतली आहे. याप्रकारे आम्ही सुसंस्कृत जगाला चालना देऊ इच्छितो.''

केंद्रीय गृहमंत्री यांनी चिदंबरम संसदेत १० नोव्हेबर १९८६ मध्ये नागरिकत्त्वाचा जन्माधार पुरेसा न मानून रक्तनाते आवश्यक केले. मूळच्या वैश्विक भावनेपासून दूर जाऊन ते म्हणतात, ''नागरिकत्वाचे कायदे कठोर करण्याचा काळ आलेला आहे... आता आमच्या लोकांना वंचित करून आम्ही इतरांसाठी उदारमतवादी राहू शकत नाही.''

आता लोकसभेत नागरिकता कायदा २०१९ मांडताना गृहमंत्री अमित शहा तर भारतीय नागरिकत्त्वासाठी टोकाचा संकुचित धर्म आधार बनवतात. धर्माच्या आधारे फाळणी झाली. पाकिस्तान, अफगाणिस्तान आणि बांगलादेशही इस्लामिक राष्ट्रे बनले आहेत. या देशांत इतर धार्मिक अल्पसंख्याकांना जाच होतो, म्हणून मुस्लिम वगळून इतरांना नागरिकत्त्व प्रदान करत आहोत, असे त्यांनी कायद्याचे निरर्थक समर्थन केले.

भारत जस सोलीकडून, जस संग्विनिसकडून जस रिलिजिअस असा दिवसेंदिवस संकुचित होत गेला आहे. उदारमतवादाचा आत्माच मारून टाकून धार्मिक राष्ट्राचा पुरस्कार करण्यापर्यंत मजल मारली. नव्या हक्कांची आणि अधिकारांची निर्मिती आणि विस्तार करण्याची क्षमता कमावणे हे नागरिक असण्याचे लक्षण आहे. स्वातंत्र्य, समता आणि बंधुता प्रस्थापित करणे हे नागरिकत्त्वाचे कर्तव्य आहे.

'सीएए'चे कारस्थान : मुस्लिमांनी नागरिकत्त्वाचे हक्क आणि अधिकार मागणे सोडून द्यावे यासाठी फाळणीचे अपराधीपण मुस्लिमांच्या मनात जागविणे, फाळणीच्या मेल्या आठवणी जागवून हिंदूंना मुस्लिमांविरुद्ध चिथावणे, हा सीएएचा मूळ राजकीय हेतू आहे. भाजपाने प्रत्येक राज्याच्या निवडणुकीत आणि लोकसभेच्या निवडणुकीत एकाही मुस्लिमाला तिकीट दिले नाही. प्रचार असा केला की आम्हाला मुस्लिमांच्या मतांची गरज नाही. मुद्दे असे निवडले की हिंदू विरुद्ध मुस्लिम होईल. हिंदुव्होटबँकेच्या जोरावर त्यांनी संपूर्ण देशाची सत्ता बळकावली. मुस्लिमांचे राजकीय खच्चीकरण होईल आणि त्यांच्या वंचित वाढ होईईल असे धोरण राबविले. मुस्लिमांवर सतत दबाव वाढवत

ठेवायचे तंत्र आहे. 'एनआरसी आणि सीएए'च्या निमित्ताने डिटेन्शन कॅम्पची आणि भारतातून हाकलून देण्याची भीती निर्माण करणे आणि मुस्लिमांचा आत्मविश्वास संपविणे हे लक्ष्य आहे. भिंतीकडेला ढकलले गेल्याने आंदोलन भडकले की पोलिसी कारवाईने संपूर्ण समाज जायबंदी करून टाकायची योजना आहे. इतका, की पुन्हा तो डोके वर काढणार नाहीत. जामियातील कारवाई त्याचे द्योतक आहे.

मुसलमान संसद आणि विधानसभेतून बाहेर फेकले गेले आहेत. साहजिकच त्यांना सत्तेतून बहिष्कृत करण्यात आले आहे, विकास आणि अर्थव्यवस्थेतून बाद करण्यात आले आहे. आरक्षण नाकारून उरलीसुरली शैक्षणिक संधी नाकारली आहे. नोकऱ्या नाहीत. वर तिहेरी तलाक, ३७०, राममंदिर... आता एनआरसी आणि सीएए यात मुस्लिमांना पिचवून टाकायचे आहे. एनआरसीनंतर मी किमान नागरिक राहिलो यावर त्यांनी समाधान मानले पाहिजे! यापुढे त्यांनी अधिकार किंवा हक्कांची भाषा बोलू नये! सरळ शरणागती पत्करली पाहिजे! या राजकारणामागचे हे उद्दिष्ट आहे.

पण ज्या पद्धतीने मुस्लिम विद्यार्थ्यांनी हिंमत दाखविली आणि हिंदू व इतर धर्मीय बंधुभाव दाखवून धावून मदतीला आले, हा सुखद धक्का आहे. मुस्लिमांनी याची गंभीरपणे दखल घेतली पाहिजे. हा भ्रातृभाव वृद्धिंगत होईल या रीतीने प्रत्येक पाऊल उचलले पाहिजे. आता एनआरसी आणि सीएएची भीती बाळगण्याचे कारण नाही.

मुस्लिमेतर तरुणांनीसुद्धा राजकारण समजून घ्यावे

डॉ. आंबेडकरांना राजकीय लोकशाहीवर तडजोड करावी लागली होती. अर्थव्यवस्थेच्या मर्यादा दाखवून, त्यांच्या सामाजिक समतेच्या कार्यक्रमांना डिरेक्टिव्ह प्रिन्सिपल्समध्ये ढकलून देण्यात आले. लोकांच्या जीवनमानात निश्चित सुधारणा झाली, पण टोकाची विषमता निर्माण झाली. एक टक्का लोकांकडे देशाची ७० टक्के संपत्ती जमा झाली. श्रीमंत सत्ताधीशांनी लोकशाहीला बटिक बनविले. याकडून लक्ष विचलित करण्यासाठी राममंदिर, तिहेरी तलाक, ३७०, धर्माधारित नागरिकता, यासारखे हिंदू-मुस्लिम संघर्ष माजवणारे खेळ आजही सुरू आहेत.

भारतात शिक्षित तरुणांची संख्या फार मोठी आहे. त्यांना तर राजकीय नागरिकत्व अपुरे वाटू लागले आहे. सामाजिक नागरिकत्वाची ते भाषा बोलू लागले तर? बौद्धिक, तंत्रवैज्ञानिक, नैसर्गिक, फायनान्स कॅपिटल अशा सर्व

साधनसंपत्तीवर त्यांनी समान हिस्सेदारी मागितली तर? प्राथमिक व उच्च शिक्षण, आरोग्य, सामाजिक सुरक्षा, राहण्यासाठी घर आणि जमीन, कामाचे ठिकाण असे अधिकार ते मागू लागले तर? शेतमालाला भावाची हमी, कृषी-औद्यागिक क्षेत्राचा विकास, ऊर्जा आणि मटेरियलच्या क्षेत्रात त्यांनी हक्क उभे केले तर? अशा प्रसंगी जात आणि धर्मांचा खेळ खेळण्याशिवाय मार्ग नाही. प्रत्यक्ष आजही जातिव्यवस्थेमुळे विषमता आहे. हिंदू विरुद्ध मुस्लिम केल्याने असमानतेच्या मुख्य कारणांकडे लक्ष जाणार नाही. लोकांना आपल्या हक्कांचा आणि अधिकारांचा विसर पडेल. यासाठी फाळणी आणि पाकिस्तान, हिंदुधर्मराष्ट्र असा भूलभुलैया निर्माण केला जात आहे.

पण नागरिकता कायदा आणि एनआरसीविरोधी आंदोलनात खासकरून जामिया आणि अलिगडच्या विद्यार्थ्यांना ज्याप्रकारे भारतातील सर्व विद्यापीठांतून पाठिंबा मिळाला, याने भारताचे तरुण आजही धर्मापलीकडे जाऊन देशाचा विचार करतात हे दिसले. हे तरुण राजकारणाची दिशा बदलू शकतील यावर विश्वास पक्का होतोय. भारतीय समाजाला 'नॉलेज सोसायटी' बनविण्याचे आणि प्रत्येक भारतीय 'मानव संसाधन' विकसित करण्याचे सर्वांत मोठे आव्हान आहे. त्यासाठी सर्व प्रकारच्या नैसर्गिक, बौद्धिक, आर्थिक संपत्तीचे लोकशाहीकरण करणे आवश्यक आहे. राजकीय सत्तेचे समन्याय्य वाटप झाले पाहिजे. बहुजनांनी धर्मापलीकडे जाऊन एकत्रित राजकीय बहुमत घडविले पाहिजे. नव्या राजकारणाची आखणी झाली पाहिजे. आता शेवटी भारतीय नागरिकतेची कायद्याच्या चौकटीत कसोटी कोणती, इतका मुद्दा सांगून विषय संपवतो.

कायद्याच्या भाषेत भारतीय नागरिक कोण ?

१) भारतीय राज्यघटनेतील कलम ५ प्रमाणे भारतीय नागरिक

भारतीय राज्यघटनेतील प्रकरण २ मध्ये आर्टिकल ५ ते ११ मध्ये भारतीय नागरिक कोण होईल हे स्पष्ट करण्यात आले आहे. आर्टिकल ५ मधील तरतुदीप्रमाणे २६ जानेवारी १९५० रोजी घटनेचा अंमल सुरू झाला त्या समयी ज्या व्यक्तीचा अधिवास भारतात होता आणि जिचा जन्म भारतात झाला होता, किंवा मातापित्यापैकी एकाचा जन्म भारतात झाला होता किंवा घटनेचा अंमल सुरू होण्यापूर्वी पाच वर्षांपासून जो भारतात राहत आला आहे तो भारतीय नागरिक मानला जाईल.

२) नागरिकत्त्व कायदा १९५५ सेक्शन ३ च्या आधार जन्माने नागरिकत्वात सुधार

◆ ज्या व्यक्तीचा जन्म २६ जानेवारी किंवा त्यानंतर परंतु १ जुलै १९८७ पूर्वी झालेला आहे ती भारतीय नागरिक आहे.

◆ ज्याचा जन्म १ जुलै १९८७ रोजी किंवा त्यानंतर परंतु नागरिकता दुरुस्ती कायदा २००३ लागू होण्यापूर्वी (म्हणजे २ डिसेंबर २००४ पूर्वी) झाला आणि जन्माच्या वेळी किमान आई-वडिलांपैकी एकजण भारतीय नागरिक आहे. तोसुद्धा भारतीय नागरिक आहे.

◆ ज्याचा जन्म नागरिकता दुरुस्ती कायदा २००३ लागू झाल्या रोजी किंवा त्यानंतर झाला आहे, आणि ज्याचे आई-वडील भारतीय नागरिक आहेत किंवा आईवडिलांपैकी एकजण भारतीय नागरिक आहे आणि दुसरा बेकायदा रहिवासी नाही तो भारतीय नागरिक आहे.

३) वंशजाच्या आधारावर मिळणारे नागरिकत्त्व

१) जिचा जन्म फाळणीपूर्वी भारताबाहेर झाला होता, जी भारतीय राज्यघटनेचा अंमल सुरू झाल्यासमयी भारतीय नागरिक होती किंवा समजली जात होती, त्या व्यक्तीला केवळ वंशत्वाने भारतीय नागरिक समजले जाईल.

भारताबाहेर जन्मलेली खालील व्यक्ती केवळ वंशत्वाने भारतीय गणली जाईल-

अ) व्यक्तीच्या जन्माच्या वेळी तिचे वडील जर २६ जानेवारी १९५० रोजी किंवा त्यानंतर, पण १० डिसेंबर १९९२ पूर्वी भारतीय नागरिक असतील,

ब) व्यक्तीच्या जन्मासमयी तिचे वडील जर १० डिसेंबर १९९२ रोजी किंवा त्यानंतर, आई किंवा वडीलांपैकी एकजण भारतीय नागरिक असतील.

४) नोंदणीद्वारे मिळणारे नागरिकत्व

बेकायदा नागरिक नसलेली, भारतीय वंशाची फाळणीपूर्व किंवा स्वातंत्र्यानंतर भारतात सर्वसाधारण सात वर्षांपासून राहणारी व्यक्ती, भारतीय नागरिकाशी विवाह केलेली व्यक्ती, भारतीय नागरिकांची मुले आणि एका वर्षापासून भारतात राहणारा ओव्हरसीज सिटिझन ऑफ इंडिया कार्डहोल्डर असे लोक इतर काही अटी अंतर्गत नोंदणी करून भारतीय नागरिकत्त्व मिळवू शकतात. विशेष म्हणजे नोंदणी करण्यायोग्य विशेष परिस्थिती आहे याविषयी समाधानी असेल तर केंद्र सरकार कोणत्याही अल्पवयीन मुलाची भारतीय नागरिक म्हणून नोंदणी करण्याचा निर्णय घेऊ शकते.

५) नागरिकीकरण (नॅच्युरलायझेशन)द्वारा नागरिकत्व

बेकायदा स्थलांतरित नसलेल्या कोणत्याही सक्षम आणि वय पूर्ण केलेल्या

कोणत्याही व्यक्तीने निर्देशीत केलेल्या पद्धतीत नॅच्युरलायझेशनचा दाखला मिळण्यासाठी अर्ज केला असेल आणि अर्जदार नॅच्युरलायझेशनकरिता या कायद्यातील परिशिष्ट तीनमधील तरतुदीनुसार पात्र आहे याची केंद्र सरकारला खात्री पटली असेल, तर त्या व्यक्तीला नॅच्युरलायझेशनद्वारे नागरिकत्व मिळू शकते.

तसेच, जर का केंद्र सरकारला अर्जदार व्यक्तीने वैज्ञानिक, तत्त्वज्ञान, कला, साहित्य, जागतिक शांतता किंवा सर्वसामान्यपणे मानवी विकास अशा क्षेत्रांत असामान्य सेवा बजावली आहे, वाटले तर परिशिष्ट तीनमधील काही किंवा सर्व अटींतून सूट देऊ शकते.

६) ओव्हरसीज सिटिझन ऑफ इंडिया कार्डहोल्डर म्हणून नोंदणी

दुसऱ्या देशाचा नागरिक असलेला परंतु राज्यघटना अस्तित्त्वात येण्यासमयी किंवा त्यानंतर भारताचा नागरिक होता किंवा राज्यघटना अस्तित्त्वात येण्यासमयी भारतीय नागरिक होण्यास पात्र होता, किंवा १५ ऑगस्ट १९४७ नंतर भारताचा भाग बनलेल्या भूमीशी निगडित होता-

अशा नागरिकाचे मूल, नातू/नाती किंवा पणतू / पणती किंवा अल्पवयीन बालक आहे, किंवा दोन्ही पालक भारतीय नागरिक आहेत किंवा एक पालक भारतीय नागरिक आहे, त्यांचे अल्पवयीन भारतीय नागरिकाशी विवाहित विदेशी कुळाची व्यक्ती किंवा ओव्हरसीज सिटिझन ऑफ इंडियन कार्ड होल्डरशी विवाहित विदेशी कुळाची व्यक्ती हे सर्व लोक ओव्हरसीज सिटिझन ऑफ इंडिया कार्ड होल्डरच्या नोंदणीकरिता पात्र आहेत.

मात्र, विशेष असे, की जी व्यक्ती किंवा जिचे पालक किंवा आजी-आजोबा किंवा पणजोबा यांपैकी कोणीही पाकिस्तान, बांगला देश ओव्हरसीज सिटिझन ऑफ इंडिया कार्डहोल्डर म्हणून नोंदणी करण्यास पात्र असणार नाहीत.

नागरिकत्वाचा पुरावा

२. घटनेचा अंमल झाला म्हणजे २६ जाने. १९५० मध्ये जे भारतात वास्तव्य करत होते ते सर्व भारतीय नागरिक आहेत.

३. त्यानंतर २६ जानेवारी १९५० ते १ जुलै १९८७ पर्यंत ज्यांचा जन्म झाला तेसुद्धा भारतीय नागरिक आहेत. या काळातील लोकांना स्वत:चा जन्मदाखला पुरेसा आहे.

४. ज्याचा जन्म १ जुलै १९८७ रोजी किंवा त्यानंतर परंतु २ डिसेंबर २००४ पूर्वी झाला आणि जन्माच्या वेळी किमान आई-वडिलांपैकी एकजण भारतीय

नागरिक आहे अशी व्यक्ती भारतीय नागरिक आहे. पण अशा व्यक्तीला स्वत:चा आणि आई-वडिलापैंकी किमान एकाचा जन्मदाखला लागेल.

५. ज्याचा जन्म २ डिसेंबर २००४ नंतर झाला तेसुद्धा भारतीय नागरिक आहेत. त्यांचे आई-वडील भारतीय नागरिक असावेत, पण पैकी एकजण बेकायदा रहिवासी नसावा. म्हणजे व्यक्तीला स्वत:चा आणि आई-वडील दोघांचा जन्मदाखला लागेल, किंवा जन्माची तारीख सिद्ध करणारा अन्य पुरावा लागेल.

(वास्तविक हे प्रकरण मुस्लिमांसाठी मला अधिक महत्त्वाचे वाटत होते आणि तपशिलात लिहायची इच्छा होती; पण पुस्तक लवकर हवे होते, शिवाय खूप विषय समाविष्ट झाल्याने पुस्तक किचकट झाले होते. म्हणून मी येथेच थांबण्याचा निर्णय केला. खासकरून मुस्लिमांनी माझी इतर पुस्तके वाचावीत. त्यांत काही गोष्टी मी नोंदविल्या आहेत.)

परिशिष्ट २

भारतीय राज्यघटनेची रचना

२६ जून १९५० साली स्वीकारलेल्या मूळ भारतीय राज्यघटनेत एकूण ३९५ कलमे (Articles) होती आणि विषयानुरूप २२ प्रकरणांत किंवा भागांत (Parts of constitution) ही सर्व कलमे सामावलेली होती. आजवर १०३ घटना-दुरुस्त्या (Constitutional amendments) झाल्या आहेत. त्यामुळे आता एकूण कलमांची संख्या ४४८ आहे. मूळ घटनेतील ७ आणि ९ ही दोन प्रकरणे (७ वी घटनादुरुस्ती १९५६) रद्द केली गेली. पण त्यानंतर गरजेनुसार झालेल्या घटनादुरुस्त्यांद्वारे एकूण पाच प्रकरणे नव्याने घटनेत समाविष्ट करण्यात आली आहेत. प्रकरण IVA आणि XIA (४२ वी घटनादुरुस्ती, १९७६), प्रकरण IX आणि XA (७६ व ७४ वी घटनादुरुस्ती, १९९२) आणि प्रकरण IXB (९७ वी घटनादुरूस्ती २०११) अशी ही नव्याने समाविष्ट प्रकरणे आहेत. एकंदर सध्याच्या भारतीय राज्य घटनेत एकूण ४४८ कलमे, २५ प्रकरणे, १२ परिशिष्टे (Shedule) आणि ५ जोडपत्रे (Annexure) आहेत.

राज्यघटनेनुसार भारतीय नागरिकत्वाची तरतूद

भारतीय राज्यघटनेतील प्रकरण क्रमांक दोन नागरिकत्वाशी संबंधित असून त्यात कलम ५ ते कलम ११ अशी एकूण ७ कलमे आहेत. यातील कलम ११मधील तरतुदीनुसार संसदेने भारतीय नागरिकत्व कायदा १९५५ केला. याचाच

अर्थ भारतीय नागरिकत्व मुख्यत: राज्यघटना १९५० मधील प्रकरण क्रमांक दोन आणि भारतीय नागरिकत्त्व कायदा १९५५ या दोन तरतुदींनी निश्चित होते. राज्यघटना बनवली जातानाच फाळणी झाली. भारतातून पाकिस्तान आणि पाकिस्तानातून भारतात मोठ्या प्रमाणावर जनतेचे स्थलांतर झाले. तसेच भारताबाहेर राहणारे भारतीय वंशाचे लोक होते. या परिस्थितीचा विचार करून नागरिकत्वाच्या तरतुदी करण्यात आल्या आहेत. मूळचा नागरिकत्व कायदा १९५५ पुढील काळात १९८६, १९९२, २००३, २००५, २०१५ आणि सध्या २०१९ सालात बदलण्यात आला आहे.

भारतीय घटना १९५० : प्रकरण २ (आर्टिकल ५ ते ११)

आर्टिकल ५ : घटनेचा अंमल सुरू होताना देण्यात आलेले भारतीय नागरिकत्व

भारतीय घटनेचा अंमल होताना (म्हणजे २६ जानेवारी १९५५ रोजी) भारतीय प्रदेशात अधिवास करणारी प्रत्येक व्यक्ती आणि :

अ) जिचा जन्म भारतात झाला होता, किंवा

ब) जिच्या मातापित्यांपैंकी किमान एकाचा जन्म भारतात झाला होता, किंवा

क) जिचे अंमल होण्याच्या तारखेच्या किमान ५ वर्षे पूर्वीपासून भारतात वास्तव्य होते,

भारतीय नागरिक होईल.

आर्टिकल ६ : आर्टिकल ५ मध्ये काही नमूद असले, तरी ज्या व्यक्तीने आता पाकिस्तानात समावेश असलेल्या प्रदेशातून भारतात १९ जुलै १९४८ पूर्वी स्थलांतर करून भारतात कायमस्वरूपी वास्तव्य केले आहे अशा व्यक्तीस भारतीय नागरिकत्व खालील अटींवर बहाल होईल -

अ) व्यक्ती किंवा तिच्या आई-वडिलांपैकी एकजण किंवा तिच्या आजी-आजोबांचा जन्म- गव्हर्नमेंट ऑफ इंडिया ॲक्ट १९३५ (मूळचा कायदा) मध्ये व्याख्या केल्याप्रमाणे भारतात झाला होता आणि,

ब) ए) अशा प्रकारे १९ जुलै १९४८ पूर्वी स्थलांतर केलेल्या व्यक्तीने स्थलांतर केल्यापासून भारतात वास्तव्य केले आहे, किंवा

बी) जर व्यक्तीने १९ जुलै १९४८ रोजी किंवा त्यानंतर स्थलांतर केले

असल्यास, तिने नागरिकत्वासाठी भारतीय राज्यघटना लागू होण्यापूर्वी निर्देशित नमुन्यात आणि पद्धतीने अर्ज केला असेल आणि भारत सरकारने याकरिता नेमलेल्या अधिकाऱ्याने भारतीय नागरिक म्हणून नोंदणी केली असेल :

नोंदणीसाठी अर्ज दाखल करण्याच्या तारखेपूर्वी किमान सहा महिन्यांपासून व्यक्ती भारतीय प्रदेशात वास्तव्य करत असल्याशिवाय अशाप्रकारे नोंदणी करण्यात येणार नाही.

आर्टिकल ७ : १ मार्च १९४७ नंतर भारतीय भूमीतून पाकिस्तानात स्थलांतर करणाऱ्यांना काही अपवादात्मक स्थिती वगळता भारतीय नागरिक गणले जाणार नसल्यासंबंधी तरतुदी या कलमात आहेत.

आर्टिकल ८ : भारतीय वंशाच्या परदेशात वास्तव्य असलेल्या नागरिकांना भारतीय नागरिकत्व प्रदान करण्याची तरतूद या कलमात आहे. ज्या व्यक्तीचे पालक किंवा पालकाचे आई-वडील यापैकी एकाचा जन्म भारतात झाला आहे (गव्हर्नमेंट ऑफ इंडिया ॲक्ट १९३५ मूळ कायद्यानुसार) आणि जी परदेशस्थ आहे अशा व्यक्तीने भारतीय दूतवासात योग्य प्रकारे नोंदणी केल्यास भारतीय नागरिक गणले जाईल.

आर्टिकल ९ : कलम ५ अंतर्गत नागरिकत्वास पात्र असणाऱ्या किंवा कलम ६ किंवा कलम ८ अंतर्गत नागरिक गणल्या जाऊ शकणाऱ्या कोणत्याही व्यक्तीस जर तिने स्वेच्छेने कोणत्याही परदेशातील नागरिकत्व स्वीकारले असेल तर ती भारतीय नागरिक राहणार नाही. (या तरतुदीनुसार भारतात दुहेरी नागरिकत्व नाकारण्यात आले आहे.)

आर्टिकल १० : या प्रकरणातील वरील कोणत्याही तरतुदीनुसार नागरिक असणारी किंवा नागरिक मानल्या गेलेल्या प्रत्येक व्यक्तीचे संसदेद्वारा करण्यात येणाऱ्या कोणत्याही कायद्याच्या तरतुदींना अधीन राहून नागरिकत्व निरंतर चालू राहील. (याचा अर्थ नागरिकत्वाचे पुनरुज्जीवन करण्याची आवश्यकता नाही. किंवा, दुसऱ्या शब्दांत, काही कारणांनी रद्द झाले नसल्यास नागरिकत्व आपसूक अबाधित राहते आणि मृत्यूनंतर चिरंतन राहते.)

आर्टिकल ११ : नागरिकत्व प्रदान करणे, नागरिकत्व रद्द करणे आणि यासंबंधाने कोणत्याही नव्या तरतुदी करणे याचा संसदेला संपूर्ण अधिकार आहे आणि या प्रकरणातील वरील कोणतीही तरतूद संसदेचे अधिकार अवरुध्द करू शकणार नाही.

भारतीय नागरिकत्व कायदा, १९५५

नागरिकत्वाची प्राप्ती

सेक्शन २ : अन्वयार्थ

सब-सेक्शन (१) : (बी) 'बेकायदा स्थलांतरीत' म्हणजे परकीय व्यक्ती, जिने

(अ) वैध पासपोर्ट किंवा इतर प्रवासाची कागदपत्रे आणि इतर असे दस्तऐवज किंवा या बाबतीत निर्देशीत करण्यात येईल अशा कायद्याखाली किंवा अधिकाराविना भारतात प्रवेश केला आहे,

(ब) वैध पासपोर्ट किंवा इतर प्रवासाची कागदपत्रे आणि इतर असे दस्तऐवज किंवा या बाबतीत निर्देशित करण्यात येईल अशा कायद्याखाली किंवा अधिकारासह भारतात प्रवेश केला आहे, परंतु परवानगीपेक्षा अधिक काळासाठी भारतात राहिली आहे.

'परंतु जर हिंदू, शीख, बौद्ध, जैन, पारसी किंवा ख्रिश्चन समाजाशी संबंधित व्यक्तीने ३१ डिसेंबर २०१४ रोजी किंवा तत्पूर्वी अफगाणिस्तान, बांगला देश किंवा पाकिस्तानातून भारतात प्रवेश केला असेल आणि पासपोर्ट (एन्ट्री इन टु इंडिया) ॲक्ट १९२० मधील सेक्शन (३), सब- सेक्शन (२) क्लाज (ब)मधून किंवा फॉरिनर्स ॲक्ट १९४६ मधील लागू होणाऱ्या तरतुदींमधून किंवा नियम किंवा त्याअधीन केलेल्या आदेशातून केंद्र सरकारने ज्याला सूट दिली असेल त्याला या कायद्यांतर्गत बेकायदा स्थलांतरित समजले जाणार नाही.'

सेक्शन ३ : जन्माने नागरिकत्व

सब-सेक्शन (१) : सब-सेक्शन (२)मधील तरतुदी वगळता भारतात जन्मलेली प्रत्येक व्यक्ती, जी-

(ए) २६ जानेवारी १९५० रोजी किंवा तदनंतर परंतु १ जुलै १९८७ पूर्वीची आहे,

(बी) १ जुलै १९८७ रोजी किंवा तदनंतर, परंतु नागरिकत्व (दुरुस्ती) कायदा २००३ पूर्वी आणि जन्माच्या वेळी किमान आई किंवा वडील यांच्यापैकी एकजण नागरिक आहे,

(ब) नागरिकत्व (दुरुस्ती) कायदा २००३ लागू झाल्या रोजी किंवा तदनंतर जेथे -

(ए) आई-वडील दोघेही भारतीय नागरिक आहेत, किंवा

(बी) जन्माच्या वेळी आई वडील यांच्यापैकी एकजण भारतीय नागरिक आहे

आणि एकजण बेकायदा रहिवासी नाही,

जन्माने भारतीय नागरिक मानली जाईल.

सब-सेक्शन (२) : या सब-सेक्शनप्रमाणे ज्याच्या आई किंवा वडिलांना परदेशी वकिलातीमधील राजदूताप्रमाणे विशेष कायदेशीर संरक्षण प्राप्त असेल आणि जे परकीय असतील त्यांच्या संततीला नागरिकत्व मिळणार नाही. तसेच, ज्याचे आई किंवा वडील परकीय शत्रू असतील आणि बालकाचा जन्म त्या काळी शत्रूच्या ताब्यातील प्रदेशात झाला असेल, तो भारतीय नागरिक नाही.

सेक्शन ४ : वंशजाच्या आधारावर मिळणारे नागरिकत्व

(१) भारताबाहेर जन्मलेली व्यक्ती वंशत्वाच्या आधारे भारतीय नागरिक असेल,

(ए) तिच्या जन्मासमयी जर २६ जानेवारी १९५० रोजी किंवा त्यानंतर, पण १० डिसेंबर १९९२ पूर्वी वडील भारतीय नागरिक असतील,

(बी) तिच्या जन्मासमयी जर १० डिसेंबर १९९२ रोजी किंवा त्यानंतर आई किंवा वडील या पैकी एकजण भारतीय नागरिक असतील,

जर का वरील क्लॉज (अ)मध्ये निर्देशित व्यक्तीचे वडील केवळ वंशाधारित नागरिक असतील तर खालील अट पूर्ण केल्याशिवाय व्यक्तीला या क्लॉजच्या तरतुदीने नागरिकत्व मिळणार नाही-

(अ) व्यक्तीच्या जन्मानंतर किंवा हा कायदा अस्तित्वात आल्यापासून, यापैकी जे उशिरा असेल तेव्हापासून एक वर्ष पूर्ण होण्यापूर्वी, किंवा याहून विलंब झाल्यास केंद्र सरकारच्या परवानगीने भारतीय कान्सुलेटमध्ये नोंदणी करावी लागेल, किंवा

(इ) व्यक्तीच्या जन्मासमयी तिचे वडील भारत सरकारच्या नोकरीत असतील :

जर का वरील क्लॉज (इ)मध्ये निर्देशित व्यक्तीचे वडील केवळ वंशाधारित नागरिक असतील तर खालील अट पूर्ण केल्याशिवाय व्यक्तीला या क्लॉजच्या तरतुदीने नागरिकत्व मिळणार नाही-

(अ) व्यक्तीच्या जन्मानंतर किंवा १० डिसेंबर १९९२ रोजी किंवा त्यानंतर, यापैकी जे उशिरा असेल तेव्हापासून एक वर्ष पूर्ण होण्यापूर्वी, किंवा याहून विलंब झाल्यास केंद्र सरकारच्या परवानगीने भारतीय कान्सुलेटमध्ये नोंदणी करावी लागेल, किंवा

(इ) व्यक्तीच्या जन्मासमयी तिच्या आई-वडील यापैकी एकजण केंद्र

सरकारच्या नोकरीत असतील:

शिवाय, जर का नागरिकत्व (दुरुस्ती) कायदा २००३चा अंमल सुरू होण्याच्या दिवशी किंवा त्यानंतर व्यक्तीने निर्देशित करण्यात येईल अशा नमुन्यात आणि पद्धतीने भारतीय कान्सुलेटमध्ये तिच्या जन्माची नोंदणी केल्याशिवाय या सेक्शनमधील तरतुदीनुसार नागरिकत्व मिळणार नाही-

(अ) जन्मानंतर किंवा नागरिकत्त्व (दुरुस्ती) कायदा २००३ अमलात आल्यानंतर एक वर्ष पूर्ण होण्यापूर्वी जे उशिरा असेल, किंवा

(ब) वरील कालावधी विलंबित झाल्यास केंद्र सरकारच्या परवानगीने :

शिवाय जर का अशा व्यक्तीचे पालक निर्देशित करण्यात येईल अशा नमुन्यात आणि पद्धतीत आपल्या अल्पवयीन पाल्याने दुसऱ्या देशाचे पारपत्र धारण केलेले नाही, असे प्रतिपादित करत नाहीत तोपर्यंत तिच्या जन्माची अशाप्रकारे नोंद करण्यात येणार नाही.

(१ए) या सेक्शनच्या आधारे नागरिकत्व प्राप्त करणारी अल्पवयीन व्यक्ती दुसऱ्या देशाचीसुद्धा नागरिक असेल आणि प्रौढ वय प्राप्त केल्यानंतर सहा महिन्यांच्या आत सदर नागरिकत्व किंवा राष्ट्रीयत्वाचा त्याग केला नाही तर भारतीय नागरिक राहणार नाही.

(ब) जन्मनोंदणी करण्यापूर्वी परवानगी घेतली नसली, तरी केंद्र सरकारने आपल्या अखत्यारीत निर्देशित केल्यास या तरतुदीकरिता सरकारच्या परवानगीने नोंदणी झाली असे मानले जाईल

(३) सब-सेक्शन (१)मधील तरतुदीकरिता, ज्याचा जन्म फाळणीपूर्वी भारताबाहेर झाला होता, जो भारतीय राज्यघटनेचा अंमल सुरू झाल्यासमयी भारतीय नागरिक होता किंवा समजला जात होता, त्या व्यक्तीला केवळ वंशत्वाने भारतीय नागरिक समजले जाईल.

सेक्शन ५ : नोंदणीद्वारे मिळणारे नागरिकत्व

सब-सेक्शन (१) : या सेक्शनमधील तरतुदी आणि निर्देशित करण्यात येतील अशा इतर अटी आणि बंधनास अधीन राहून अर्ज सादर केल्यास, बेकायदा स्थलांतरित नसून जिला राज्यघटनेतील तरतुदीनुसार किंवा या कायद्यातील इतर तरतुदीनुसार नागरिकत्व प्राप्त नसेल, जर ती व्यक्ती खालील कोणत्याही वर्गवारीत मोडत असेल, तर केंद्र सरकार अशा व्यक्तीस नागरिक म्हणून नोंदवू शकेल -

(ए) नोंदणी अर्ज सादर करण्यापूर्वी सात वर्षांपासून भारतात सर्वसाधारण

रहिवासी असलेली भारतीय वंशाची व्यक्ती,

(बी) फाळणीपूर्व भारताबाहेरील कोणत्याही देशात किंवा ठिकाणी सर्वसाधारण रहिवासी असणारी भारतीय वंशाची व्यक्ती,

(सी) भारतीय नागरिकाशी विवाह केलेली आणि नोंदणी अर्ज सादर करण्यापूर्वी सात वर्षांपासून भारतात सर्वसाधारण रहिवासी असणारी व्यक्ती,

(डी) भारतीय नागरिक असलेल्या व्यक्तीची अल्पवयीन मुले,

(ई) या सब सेक्शनमधील क्लॉज (ए)अंतर्गत किंवा सेक्शन ६च्या सब-सेक्शन (१)अंतर्गत जिच्या पालकांची भारतीय नागरिक म्हणून नोंदणी झाली आहे अशी वय पूर्ण केलेली सक्षम व्यक्ती,

(एफ) वय पूर्ण करणारी सक्षम व्यक्ती किंवा तिच्या आई-वडिलांपैकी एकजण पूर्वी स्वतंत्र भारताचे नागरिक होते, आणि नोंदणीसाठी अर्ज सादर केल्यापासून १२ महिन्यांपासून भारतात सर्वसाधारण रहिवासी आहे,

(जी) वय पूर्ण करणारी सक्षम व्यक्ती जिने 'ओव्हरसीज सिटिझन ऑफ इंडिया कार्ड होल्डर' म्हणून नोंदणी केली आहे आणि जी अर्ज दाखल करण्यापूर्वी १२ महिन्यांपासून भारतात सर्वसाधारण रहिवासी आहे.

स्पष्टीकरण १ : क्लॉज (ए) आणि (सी) अर्जदार भारतातील सर्वसाधारण रहिवासी आहे असे मानले जाईल, जर

(अ) नोंदणीसाठी अर्ज केल्या दिवसापासून मागे व्यक्ती सलग १२ महिने भारतात राहत आलेली असावी, आणि

(ब) उल्लेखलेल्या १२ महिन्यांच्या कालावधीमागील आठ वर्षांमध्ये तिचा भारतातील रहिवास सहा वर्षांपेक्षा कमी नसावा.

(१ए) केंद्र सरकार, विशेष परिस्थिती आहे असे खात्री झाल्यास, तशा परिस्थितीविषयी लेखी नोंद करून, सब-सेक्शन (१)मधील क्लॉज (एफ) आणि क्लॉज (जी) आणि स्पष्टीकरणातील १ मधील क्लॉज (एच)मध्ये नमूद केलेल्या बारा महिन्यांच्या कालावधीची मर्यादा विविध खंडांसह जास्तीत जास्त ३0 दिवसांपर्यंत शिथिल करू शकेल.

स्पष्टीकरण २ : व्यक्ती किंवा व्यक्तीच्या आई-वडिलांपैकी एकजण फाळणीपूर्व भारतात जन्मलेला असेल, किंवा १५ ऑगस्ट १९४७ नंतर तो प्रदेश भारतात सामील झाला असेल तर या सब-सेक्शनसाठी अशी व्यक्ती भारतीय वंशाची मानली जाईल.

(२) सज्ञान वय पूर्ण करणाऱ्या व्यक्तीने दुसऱ्या परिशिष्टात निर्देशित

केलेल्या नमुन्यात निष्ठा व्यक्त करणारे शपथपत्र सादर केल्याविना सब-सेक्शन (१) अंतर्गत नागरिक म्हणून नोंदणी होणार नाही.

सब-सेक्शन (३) : या कायद्यांतर्गत ज्या व्यक्तीने भारतीय नागरिकत्व सोडून दिले आहे, किंवा जिला भारतीय नागरिकत्वापासून वंचित करण्यात आले आहे, किंवा ज्याचे भारतीय नागरिकत्त्व रद्द करण्यात आले आहे, अशा व्यक्तीची केंद्र सरकारच्या आदेशाचा अपवाद करता, सब-सेक्शन (१)अंतर्गत भारतीय नागरिक म्हणून नोंदणी करण्यात येणार नाही.

(४) नोंदणी करण्यायोग्य विशेष परिस्थिती आहे याविषयी समाधानी असेल तर केंद्र सरकार कोणत्याही अल्पवयीन मुलाची भारतीय नागरिक म्हणून नोंदणी करण्याचा निर्णय घेऊ शकते.

(५) या सेक्शनअधीन नोंदणी झालेली व्यक्ती नोंदणी केलेल्या तारखेपासून भारताची नोंदणीकृत नागरिक होईल, आणि राज्यघटनेच्या सेक्शन ६ क्लॉज (ए)(बी) किंवा सेक्शन ८ अंतर्गत नोंदणी झालेली व्यक्ती घटनेचा अंमल सुरू झाल्या दिवसापासून किंवा नोंदणी केलेल्या तारखेपासून यापैकी उशिरा असलेल्या तारखेपासून भारताचा नोंदणीकृत नागरिक समजला जाईल.

(६) विशेष परिस्थितीपोटी एखाद्या व्यक्तीला किंवा गटातील व्यक्तींना सब-सेक्शन (१) क्लॉज (ब)मधील रहिवासाच्या अटीमध्ये सवलत देणे क्रमप्राप्त बनले आहे याविषयी केंद्र सरकारची खात्री झाली असेल तर अशा कारणांची लेखी नोंद करून सवलत प्रदान करू शकेल.

टिपणी : जर एखादी व्यक्ती या सेक्शनमधील अटींची पूर्तता करू शकत असेल, तर तिची / त्याची भारतीय नागरिक म्हणून नोंदणी करता येईल. जो भारताचा नागरिक नाही परंतु नोंदणीकृत नागरिक होऊ इच्छितो त्याला या सेक्शनचा आधार घेता येईल. National Hunan Rights Commission v state of Arunachal Pradesh, AIR 1996 SC 1243: (1996) 1 SCC 742.

सेक्शन ६ : नॅच्युरलायझेशन (नागरिकीकरण) द्वारा नागरिकत्त्व

(१) सक्षम आणि वय पूर्ण केलेल्या कोणत्याही व्यक्तीने, जी बेकायदा स्थलांतरित नाही, निर्देशित केलेल्या पद्धतीत तिला नॅच्युरलायझेशनचा दाखला मिळण्यासाठी अर्ज केला असेल, जर अर्जदार नॅच्युरलायझेशनकरिता परिशिष्ट तीनमधील तरतुदीनुसार पात्र आहे याची केंद्र सरकारला खात्री पटली असेल, तर तिला नॅच्युरलायझेशनचा दाखला प्रदान करू शकेल.

जर का केंद्र सरकारच्या मतानुसार अर्जदार व्यक्तीने वैज्ञानिक, तत्त्वज्ञान, कला, साहित्य, जागतिक शांताता किंवा सर्वसामान्यपणे मानवी विकास अशा क्षेत्रांत असामान्य सेवा बजावली असेल तर सरकार परिशिष्ट तीनमध्ये निर्देशित शर्तींतून पूर्णत: किंवा कांही शर्तींना सूट देईल.

१) : सब-सेक्शन (१)अंतर्गत ज्या व्यक्तीला सर्टिफिकेट ऑफ नॅच्युरलायझेशन प्रदान करण्यात आले आहे, परिशिष्ट दोनमध्ये निर्देशित केलेल्या नमुन्यात निष्ठेची शपथ घेतल्यानंतर सर्टिफिकेट प्रदान केलेल्या तारखेपासून नॅच्युरलायझेशनद्वारे भारतीय नागरिक होईल.

सेक्शन ६ए : आसाम करारानुसार व्यक्तीच्या नागरिकत्वाची विशेष तरतूद

(१) या सेक्शनच्या तरतुदीकरिता -

(ए) 'आसाम' म्हणजे सिटिझनशीप (अमेंडमेंट)ॲक्ट, १९८५ लागू होण्यापूर्वीचा लगेचच आसाम राज्यात समाविष्ट असलेला प्रदेश

(इ) 'आढळून आलेला परकीय' म्हणजे फॉरेनरर्स ॲक्ट, १९४६ मधील तरतुदीनुसार आणि फॉरिनर्स (ट्रॅब्युनलस) ऑर्डर, (१९६४) या ऑर्डर अंतर्गत स्थापित ट्रॅब्युनलद्वारा आढळून आलेला परकीय

(ब) 'निर्दिष्ट प्रदेश' म्हणजे सिटिझनशिप ॲक्ट, १९८५चा अंमल सुरू होण्यापूर्वी लगेचचा बांगला देशमध्ये समाविष्ट प्रदेश

(क) जर व्यक्ती किंवा तिच्या पालकांपैकी एकजण अथवा आजी-आजोबांपैकी कोणीही यांचा फाळणीपूर्व भारतात जन्म झाला असेल तर ती व्यक्ती भारतीय वंशाची मानली जाईल,

(म) फॉरिनअर्स (ट्रॅब्युनल्स) ऑर्डर, (१९६४)अंतर्गत स्थापित ट्रॅब्युनल एखादी व्यक्ती परकीय असल्याचे आपले मत संबंधित अधिकारी किंवा प्राधिकरणाला कळवेल त्या तारखेपासून ती व्यक्ती परकीय आढळल्याचे सर्वसाधारणपणे मानले जाईल.

(२) सब-सेक्शन (६) आणि (७) मधील तरतुदींच्या अधीन राहून भारतीय वंशाच्या सर्व व्यक्ती, ज्यांनी १ जानेवारी १९६६ पूर्वी निर्दिष्ट प्रदेशातून आसाममध्ये प्रवेश केला (ज्यांची नावे समाविष्ट असलेली मतदारयादी १९६७च्या सार्वत्रिक लोकसभेच्या निवडणुकीसाठी वापरण्यात आली होती अशा सर्वांसह) आणि आसाममध्ये दाखल झाल्या तारखेपासून जे सर्वसाधारणपणे आसामचे रहिवासी आहेत, १ जानेवारी १९६६ पासून भारताचे नागरिक आहेत असे मानले जाईल.

(३) सब-सेक्शन (६) आणि (७)मधील तरतुदींच्या अधीन राहून भारतीय वंशाची प्रत्येक व्यक्ती, जिने -

(अ) १ जानेवारी १९६६ रोजी किंवा त्यानंतर, परंतु २५ मार्च १९७१ पूर्वी निर्दिष्ट प्रदेशातून आसाममध्ये प्रवेश केला, आणि

(इ) आसाममध्ये दाखल झाल्या तारखेपासून जे सर्वसाधारणपणे आसामचे रहिवासी आहेत, आणि

(ब) जो परकीय आढळून आलेला आहे,

केंद्र सरकारने या संदर्भात सेक्शन १८ अंतर्गत तयार केलेल्या नियमानुसार या नियमामध्ये स्पष्ट केले जाईल अशा प्राधिकरणाकडे (यानंतर या सब-सेक्शनमध्ये रजिस्टरिंग ॲथॉरिटी म्हणून उल्लेख केला जाईल) स्वतःची नोंदणी करेल आणि जर परकीय आढळून आलेल्या तारखेरोजी त्याचे नाव कोणत्याही विधानसभा किंवा लोकसभा मतदारसंघाच्या चालू मतदारयादीमध्ये समाविष्ट असेल, त्या तारखेपासून नाव वगळण्यात येईल.

स्पष्टीकरण : या सब-सेक्शन अंतर्गत नोंदणी करू इच्छिणाऱ्या प्रत्येक व्यक्तीच्या संदर्भात फॉरिनर्स (ट्रॅब्युनल्स) ऑर्डर, (१९६४) अंतर्गत स्थापित झालेल्या ट्रॅब्युनलच्या मतानुसार जी व्यक्ती परकीय असेल, या सबसेक्शनच्या क्लॉज (ब)च्या पूर्ततेकरिता पुरेसा पुरावा मानला जाईल, आणि जर या सब-सेक्शनच्या इतर तरतुदींमधील गरजांची पूर्तता व्यक्ती करते का याविषयी काही प्रश्न निर्माण झाले तर रजिस्टरिंग ॲथॉरिटी -

(ए) जर इतर गरजांच्या संदर्भातील मतामध्ये एखादा निष्कर्ष असेल, तर प्रश्नाचा निर्णय निष्कर्षाशी सुसंगत राहील अशा प्रकारे करेल,

(बी) इतर गरजांच्या संदर्भातील मतामध्ये निष्कर्ष नसेल तर प्रश्न, सेक्शन १८ अंतर्गत केंद्र सरकार तयार करेल अशा नियमांनुसार अधिकार क्षेत्र असलेल्या, उल्लेखलेल्या आदेशाने स्थापित ट्रॅब्युनलकडे मंजूर करेल आणि या संदर्भात मिळालेल्या मतांशी सुसंगत निर्णय करेल.

(४) सब-सेक्शन (३)अंतर्गत नोंदणी केलेल्या व्यक्तीला परकीय म्हणून आढळलेल्या तारखेपासून आणि या तारखेपासून दहा वर्षांचा कालावधी पूर्ण होईपर्यंत भारतीय नागरिक म्हणून सारखेच हक्क आणि कर्तव्ये असतील, (पासपोर्ट ॲक्ट,१९६७ अंतर्गत पासपोर्ट मिळवण्याचा हक्क आणि यासंबंधी असलेल्या कर्तव्यासमवेत), परंतु त्याचे नाव कोणत्याही विधानसभा किंवा लोकसभा मतदारसंघाच्या मतदारयादीमध्ये उल्लेखलेल्या दहा वर्षांचा कालावधी

पूर्ण झाल्याशिवाय नोंदविण्याचा अधिकार असणार नाही.

(५) सब-सेक्शन (३)अंतर्गत नोंदणी केलेली व्यक्ती परकीय व्यक्ती म्हणून आढळलेल्या तारखेपासून दहा वर्षांचा कालावधी पूर्ण झाल्यानंतर सर्व कारणांसाठी भारतीय नागरिक मानली जाईल.

(६) सेक्शन ८ मधील तरतुदींना बाधा न येता -

(ए) सब-सेक्शन (२)मध्ये उल्लेखलेल्या कोणत्याही व्यक्तीने सिटिझनशिप (अमेंडमेंट) ॲक्ट, १९८५ लागू होण्याच्या तारखेपासून साठ दिवसांच्या आत निर्देशित पद्धतीने आणि नमुन्यात आणि निर्देशित प्राधिकरणाकडे भारतीय नागरिक राहू इच्छित नसल्याचे प्रतिज्ञापत्र सादर केल्यास त्या वर्षी त्या सब-सेक्शनखाली ती व्यक्ती भारतीय नागरिक झाली असे मानण्यात येणार नाही,

(इ) सब-सेक्शन (२)मध्ये उल्लेखलेल्या कोणत्याही व्यक्तीने सिटिझनशिप (अमेंडमेंट) ॲक्ट, १९८५ लागू होण्याच्या तारखेपासून किंवा परकीय आढळलेल्या तारखेपासून यापैकी जी उशिरा असेल, साठ दिवसांच्या आत तो त्या सब-सेक्शन आणि सब-सेक्शन (४) आणि (५) मधील तरतुदींना बांधील राहू इच्छित नाही, असे निर्देशीत पद्धतीने आणि नमुन्यात आणि निर्देशीत प्राधिकरणाकडे प्रतिज्ञापत्र सादर केल्यास, त्याला सब-सेक्शन (३)खाली स्वत:ची नोंदणी करण्याची आवश्यकता राहणार नाही.

स्पष्टीकरण : या सब-सेक्शनअंतर्गत प्रतिज्ञा सादर करणे आवश्यक असणारी व्यक्ती ज्याअर्थी करार करण्यास पात्र नाही, त्या समयी अमलात असणाऱ्या कायद्यानुसार कोणतीही सक्षम व्यक्ती तिच्या मार्फत प्रतिज्ञा सादर करू शकेल.

(७) सब-सेक्शन (२) ते (६)मधील कोणत्याही तरतुदी कोणत्याही व्यक्तीसंदर्भात लागू होणार नाहीत -

(अ) सिटिझनशिप (अमेंडमेंट) ॲक्ट, १९८५ लागू होण्याच्या तारखेच्या लगेचच एक वर्षापूर्वीपासून जी भारतीय नागरिक आहे.

(इ) सिटिझनशिप (अमेंडमेंट) ॲक्ट, १९८५ लागू होण्याच्या एक वर्षापूर्वी फॉरिनर्स ॲक्ट १९४६ अंतर्गत जिला भारतातून हद्दपार करण्यात आले आहे.

(८) कोणत्याही इतर प्रचलित कायद्यातील लागू तरतुदींमध्ये काही नमूद असले तरी या सेक्शनमधील स्पष्टपणे नमूद तरतुदींचा अंमल अबाधित राहील.

सेक्शन ७ : प्रदेशाच्या सामीलीकरणामुळे प्राप्त नागरिकत्व

जर एखादा प्रदेश भारताचा भाग बनल्यास, या प्रदेशाशी संबंध असल्याकारणाने केंद्र सरकार अधिकृत गॅझेटद्वारे आदेश जारी करून अशा

व्यक्तींना भारतीय नागरिक असल्याचे निर्देशित करू शकेल आणि आदेशात नोंदवण्यात येईल अशा तारखेपासून या व्यक्ती भारताच्या नागरिक होतील.

ओव्हरसीज सिटिझन ऑफ इंडिया कार्डहोल्डर

सेक्शन ७ ए : ओव्हरसीज सिटिझन ऑफ इंडिया कार्डहोल्डरची नोंदणी

(१) केंद्र सरकार निर्देशित करील अशा अटी, बंधने आणि पद्धतीच्या अधीन राहून याकरिता अर्ज सादर केल्यास ओव्हरसीज सिटिझन ऑफ इंडिया कार्डहोल्डर म्हणून नोंदणी करील-

(अ) पूर्ण वय आणि क्षमता असलेल्या कोणत्याही व्यक्तीने-

(ब) दुसऱ्या देशाची नागरिक आहे, परंतु राज्यघटना अस्तित्वात येण्यासमयी किंवा त्यानंतर भारताची नागरिक होती, किंवा

(क) जी दुसऱ्या देशाची नागरिक आहे, परंतु राज्यघटना अस्तित्वात येण्यासमयी भारतीय नागरिक होण्यास पात्र होती, किंवा

(ड) जी दुसऱ्या देशाची नागरिक आहे, परंतु १५ ऑगस्ट १९४७ नंतर भारताचा भाग बनलेल्या भूमीशी निगडित होती, किंवा

(इ) अशा नागरिकाचे मूल, नातू/नाती, किंवा पणतू / पणती आहे, किंवा

(अ) व्यक्ती, क्लॉज (ब)मध्ये उल्लेखलेल्या व्यक्तीचे अल्पवयीन बालक आहे, किंवा

(ब) व्यक्ती, जी अल्पवयीन आहे, आणि जिचे दोन्ही पालक भारतीय नागरिक आहेत किंवा एक पालक भारतीय नागरिक आहे, किंवा

(क) भारतीय नागरिकाशी विवाहित विदेशी कुळाची व्यक्ती किंवा सेक्शन ७ अंतर्गत नोंदणी झालेल्या ओव्हरसीज सिटिझन ऑफ इंडियन कार्डहोल्डरशी विवाहित विदेशी कुळाची व्यक्ती आणि या सेक्शन अंतर्गत सादर केलेल्या अर्जाच्या तारखेपासून किमान सलग दोन वर्षांपूर्वी ज्याच्या लग्नाची नोंदणी झाली आहे आणि विवाहबंधनात आहेत :

ओव्हरसीज सिटिझन ऑफ इंडिया कार्डहोल्डरच्या नोंदणीकरिता मात्र अशा विवाहित व्यक्तीला प्रथम भारताच्या अधिकारिक प्राधिकरणाकडून सुरक्षा संमती मिळवावी लागेल :

जी व्यक्ती किंवा जिचे पालक किंवा आजी-आजोबा किंवा पणजोबा पैकी कोणीही पाकिस्तान, बांगला देश किंवा असे देश ज्यांच्यासंबंधी केंद्र सरकार अधिकृत गॅझेटमध्ये प्रसिद्ध करेल अशा इतर देशांची नागरिक आहे किंवा होती,

ती या सेक्शनअंतर्गत ओव्हरसीज सिटिझन ऑफ इंडिया कार्डहोल्डर म्हणून नोंदणी करण्यास पात्र असणार नाही.

(२) केंद्र सरकार सध्याच्या पर्सन्स ऑफ इंडियन ओरिजिन कार्डहोल्डर यांना ओव्हरसीज सिटिझन ऑफ इंडिया कार्डहोल्डर असल्याचे समजण्यासंदर्भातील तारीख अधिकृत गॅझेटद्वारे सूचित करेल.

खुलासा- या सब-सेक्शनसाठी 'पर्सन्स ऑफ इंडियन ओरीजन कार्डव्होल्डर' म्हणजे केंद्र सरकारद्वारे या संदर्भात जारी नोटीफिकेशन नंबर २६०११४९८ तारीख १९ ऑगस्ट २००२ नुसार नोंदणी झालेल्या व्यक्ती.

(३) सब-सेक्शन (१)मध्ये काही नमूद असले, तरी केंद्र सरकारला विशेष स्थिती असल्याची खात्री वाटत असेल, तर अशी स्थिती लेखी नोंदवून व्यक्तीची नोंदणी ओव्हरसीज सिटिझन ऑफ इंडिया कार्डहोल्डर म्हणनू करू शकेल.

सेक्शन ७ अ : ओव्हरसीज सिटिझन ऑफ इंडिया कार्डहोल्डरला प्राप्त हक्क

(१) अमलात असलेल्या इतर कोणत्याही कायद्यात काहीही नमूद असले, तरी ओव्हरसीज सिटीझन ऑफ इंडिया कार्डहोल्डरला सब-सेक्शन (२)मधील नमूद हक्क वगळता केंद्र सरकारद्वारा ऑफिशिअल गॅझेटमध्ये प्रसिद्ध करण्यात येणारे याबाबतचे अधिकार प्राप्त असतील :

(२) ओव्हरसीज सिटिझन ऑफ इंडिया कार्डहोल्डरला भारतीय नागरिकाला प्राप्त असलेले अधिकार मिळणार नाहीत -

(अ) राज्यघटनेतील आर्टिकल १६ अंतर्गत सार्वजनिक नोकऱ्यांमधील संधीच्या समानता

(आ) राज्यघटनेतील आर्टिकल ५८ अंतर्गत राष्ट्रपती म्हणून निवडणूक लढविणे

(ब) राज्यघटनेतील आर्टिकल ६६ अंतर्गत उपराष्ट्रपती म्हणून निवडणूक लढविणे

(क) राज्यघटनेतील आर्टिकल १२४ अंतर्गत सुप्रीम कोर्टाचा न्यायाधीश म्हणून नेमणूक

(ड) राज्यघटनेतील आर्टिकल २१७ अंतर्गत हायकोर्टाचा न्यायाधीश म्हणून नेमणूक

(एफ) रिप्रेझेंटेशन ऑफ पीपल्स ॲक्ट १९५० मधील सेक्शन १६ अंतर्गत मतदार म्हणून नोंदणी

(जी) रिप्रेझेंटेशन ऑफ पीपल्स ॲक्ट १९५१ मधील सेक्शन ३ व ४ नुसार

लोकसभेचा किंवा राज्यसभेचा सदस्य होण्यासाठी आवश्यकतेनुसार पात्रता

१) रिप्रझेंटेशन ऑफ पीपल्स ॲक्ट १९५१ मधील सेक्शन ५, ५ ए आणि सेक्शन ६नुसार विधानसभेचा किंवा विधान परिषदेचा सदस्य होण्यासाठी आवश्यकतेनुसार पात्रता,

(अ) केंद्र सरकारद्वारा जारी केलेल्या विशेष आदेशामध्ये निर्देशित सार्वजनिक सेवा आणि पदांकरिता नियुक्तीव्यतिरिक्त केंद्र आणि कोणत्याही राज्याच्या कारभारासंदर्भातील अशा सेवा आणि पदांसाठीची नियुक्ती,

(३) सब-सेक्शन (१)अंतर्गत जारी केलेले प्रत्येक नोटिफिकेशन लोकसभेसमोर मांडण्यात येईल.

सेक्शन ७ अ : ओव्हरसीज सिटिझन ऑफ इंडिया कार्डचा त्याग

(१) जर पूर्ण वयाच्या आणि क्षमतेच्या एखाद्या ओव्हरसीज सिटिझन ऑफ इंडिया कार्डहोल्डरने निर्देशित पद्धतीमध्ये ओव्हरसीज सिटिझन ऑफ इंडिया कार्डहोल्डर म्हणून त्याची नोंदणी केलेल्या कार्डचा त्याग करण्याचे घोषित करत असेल, तर केंद्र सरकार अशा घोषणेची नोंदणी करेल, आणि अशा नोंदणीनंतर त्या व्यक्तीचे ओव्हरसीज सिटिझन ऑफ इंडिया कार्डहोल्डर म्हणून अस्तित्व संपुष्टात येईल.

(२) जेव्हा एखाद्या व्यक्तीचे ओव्हरसीज सिटिझन ऑफ इंडिया म्हणून अस्तित्व सब-सेक्शन (१)नुसार संपुष्टात येईल, तेव्हा सेक्शन ७ ए सब-सेक्शन (१) क्लॉज (क) अंर्तगत विदेशी जन्माच्या विवाहित (पती वा पत्नी)ला प्राप्त झालेले ओव्हरसीज सिटिजन ऑफ इंडिया कार्ड आणि त्या व्यक्तीच्या प्रत्येक अल्पवयीन मुलाची ओव्हरसीज सिटिझन ऑफ इंडिया कार्डहोल्डर म्हणून असलेली नोंदणी, तत्काळ ओव्हरसीज सिटिझन ऑफ इंडिया कार्डहोल्डर म्हणून संपुष्टात येईल.

सेक्शन ७ ब : ओव्हरसीज सिटिझन ऑफ इंडिया कार्डहोल्डरची नोंदणी रद्द होणे

केंद्र सरकारचे खालील बाबतींत समाधान झाल्यास सेक्शन ७ब सब-सेक्शन (१)अंर्तगत मान्यता दिलेली नोंदणी आदेशाद्वारे रद्द करू शकते-

(अ) ओव्हरसीज सिटिझन ऑफ इंडिया कार्डहोल्डरची नोंदणी मिळवताना भ्रष्ट पद्धत अवलंबली, चुकीची माहिती दिली किंवा कोणतीही वस्तुनिष्ठ माहिती लपविली, किंवा

(इ) ओव्हरसीज सिटिझन ऑफ इंडिया कार्डहोल्डरने राज्यघटनेविषयी

अनादर दाखविल्याचे कायद्याने सिद्ध झाले, किंवा

(ब) भारत युद्धात गुंतलेला असताना ओव्हरसीज सिटिझन ऑफ इंडिया कार्डहोल्डरने शत्रूशी बेकायदा व्यापार केला किंवा संवाद साधला किंवा शत्रूला युद्धात मदतकारक होईल याची जाणीव असतानाही तशा प्रकारचा व्यापार किंवा आर्थिक उलाढाल केली किंवा त्याच्याशी संबंध ठेवला, किंवा

(क) सेक्शन ७ ए, सब-सेक्शन (१)अंर्तगत नोंदणीस मान्यता मिळवल्यानंतर ओव्हरसीज सिटिझन ऑफ इंडिया कार्डहोल्डरला पाच वर्षांच्या आत दोन वर्षांहून अधिक काळाच्या तुरुंगवासाची शिक्षा झाली असेल, किंवा

(ड) भारताच्या अखंडतेचे आणि सार्वभौमिकतेचे हितरक्षण, भारताचे संरक्षण, भारताचे इतर देशांशी मैत्रीचे संबंध, किंवा भारताच्या सार्वजनिक हितासाठी असे करणे आवश्यक असेल, किंवा

(एफ) सेक्शन ७ ए, सबसेक्शन (१) क्लॉज (क)अंतर्गत कार्ड धारण केलेल्या ओव्हरसीज सिटिझन ऑफ इंडिया कार्डहोल्डरचे लग्न-

(अ) सक्षम कोर्टाद्वारे कायद्याने किंवा अन्य अशा प्रकारे लग्नाचे विघटन झाले असेल, किंवा

(ब) घटस्फोट झाला नसेल, पण अशा विवाहबंधनात असताना त्याने अन्य व्यक्तिशी लग्न केले असेल.

नागरिकत्व संपुष्टात येणे.

सेक्शन ८ : नागरिकत्वाचा त्याग करणे

(१) जर पूर्ण वयाच्या आणि सक्षम भारतीय नागरिकाने निर्देशित पद्धतीत भारतीय नागरिकत्वाचा त्याग करत असल्याचे प्रतिज्ञापत्र सादर केले, तर संबंधित प्राधिकरण प्रतिज्ञापत्राची नोंद करेल, आणि नोंदणीनंतर सदर व्यक्तीचे भारतीय नागरिकत्व संपुष्टात येईल:

जर का अशा प्रकारचे प्रतिज्ञापत्र भारत कोणत्याही युद्धात सामील असताना सादर झाले असेल तर केंद्र सरकार निर्देशित करेतोपर्यंत नोंदणी स्थगित ठेवण्यात येईल.

(२) जेथे एखाद्या व्यक्तीचे सेक्शन (१)अंतर्गत नागरिकत्व संपुष्टात येते, तेव्हा व्यक्तीच्या प्रत्येक अल्पवयीन मुलाचे भारतीय नागरिकत्व त्यासोबतच संपुष्टात येते :

जर का अशा मुला/मुलीने वय पूर्ण झाल्यावर एका वर्षाच्या आत निर्देशित नमुन्यात आणि पद्धतीत भारतीय नागरिकत्व पुनर्संपादन करण्याची इच्छा व्यक्त

करणारे प्रतिज्ञापत्र सादर केले, तर त्यानंतर पुन्हा भारतीय नागरिक होता येईल.

टिप्पणी : भारतीय नागरिकत्वाचा त्याग केलेल्या व्यक्तीला ती भारतात राहत असल्याकारणाने रहिवासाचा हक्क सांगता येणार नाही. A. H. Magermans v. S. K. Ghosw AIR 1966 cal 552

सेक्शन ९ : नागरिकत्व रद्द होणे

(१) कोणत्याही भारतीय नागरिकाने नॅच्युरलायझेशनद्वारे, नोंदणीद्वारे किंवा स्वेच्छेने इतर देशाचे नागरिकत्व स्वीकारले, किंवा २६ जाने १९५० आणि हा कायदा अस्तित्वात येण्याच्या कालावधीत स्वेच्छेने इतर देशाचे नागरिकत्व स्वीकारले असेल, असे नागरिकत्व सुरू झाल्यापासून किंवा प्राप्तीनंतर, जी काही परिस्थिती असेल, त्याचे भारतीय नागरिकत्व संपुष्टात येईल :

भारत कोणत्याही युद्धात गुंतलेला असण्याच्या काळात जर का भारतीय नागरिकाने स्वेच्छेने इतर देशाचे नागरिकत्व स्वीकारले, तर केंद्र सरकारने अन्यथा निर्देशित केल्याशिवाय या सब-सेक्शनमधील तरतुदी लागू होणार नाहीत.

(२) भारतीय नागरिकाने इतर देशाचे नागरिकत्व केव्हा किंवा कसे स्वीकारले या संदर्भात काही प्रश्न उपस्थित झाल्यास या बाबतीत निर्देशित करण्यात येईल अशा पद्धतीने आणि पुराव्यासंबंधी नियमांच्या आधारे असे प्राधिकरण निर्णय करेल.

टिप्पणी : सेक्शन ९, भारतीय नागरिकत्व रद्द होणे किंवा विदेशी नागरिकत्व प्राप्त करणे या बाबतीत एक संपूर्ण संहिता आहे. Bhagwati Prasad dixit 'Ghorewala v. Rajeev Gandi, AIR 1986 SC 1534

सेक्शन १० : नागरिकत्व हिरावले जाणे

(१) भारतीय नागरिक, जो नॅच्युरलायझेशन किंवा राज्यघटनेच्या केवळ आर्टिकल ५, क्लॉज (ब)द्वारे किंवा राज्यघटनेच्या आर्टिकल ६, क्लॉज (इ) (ii) किंवा या कायद्याच्या सेक्शन ५, सब-सेक्शन (१) क्लॉज (ए) मधील तरतुदी वगळता नोंदणीद्वारे नागरिक आहे, या सेक्शन अंतर्गत जर केंद्र सरकारच्या आदेशाने त्याचे नागरिकत्व हिरावून घेण्यात आले तर त्याचे भारतीय नागरिकत्व संपुष्टात येईल.

(२) या सेक्शनमधील तरतुदींच्या अधीन केंद्र सरकार खालील बाबींत समाधानी असल्यास अशा कोणत्याही भारतीय नागरिकाचे नागरिकत्व आदेशाद्वारे हिरावून घेऊ शकेल-

(अ) नोंदणी किंवा नॅच्युरलायझेशनचे सर्टिफिकेट भ्रष्ट मार्गाने, चुकीची

माहिती देऊन किंवा वस्तुस्थिती लपवून मिळवले असेल किंवा

(इ) नागरिकाने आपल्या उक्ती अथवा कृतीने भारतीय राज्यघटनेबद्दल अनिष्ठा किंवा अनादर व्यक्त केल्याचे कायद्याने सिद्ध झाले असेल

(ब) भारत युद्धात गुंतलेला असताना नागरिकाने शत्रूशी बेकायदा व्यापार केला किंवा संवाद साधला किंवा शत्रूला युद्धात मदतकारक होईल याची जाणीव असतानाही तशा प्रकारचा व्यापार किंवा आर्थिक उलाढाल केली किंवा त्याच्याशी संबंध ठेवला, किंवा

(क) नोंदणीद्वारे किंवा नॅच्युरलायझेशनने नागरिकत्व प्राप्तीनंतर पाच वर्षांच्या आत नागरिकाला कोणत्याही देशांत दोन वर्षांहून अधिक काळाच्या तुरुंगवासाची शिक्षा झाली असेल, किंवा

(म) सर्वसाधारणपणे सात वर्षांहून अधिक काळासाठी नागरिक परदेशात वास्तव्यास असेल आणि या काळात तो भारताबाहेरील शैक्षणिक संस्थेत विद्यार्थी नसेल किंवा भारत सरकारच्या किंवा भारत सदस्य असलेल्या आंतरराष्ट्रीय संघटनेत नोकरीत नसेल अथवा निर्देशित पद्धतीत भारतीय वकिलातीत दरवर्षी भारतीय नागरिकत्व टिकविण्याच्या उद्देशाने नोंदणी केली नसेल

(३) व्यक्तीचे नागरिकत्व चालू ठेवणे जनहिताचे नाही अशी जोपर्यंत खात्री होत नाही तोवर या सेक्शनखाली केद्र सरकार नागरिकत्व हिरावून घेणार नाही.

(४) या सेक्शन अंतर्गत आदेश जारी करण्यापूर्वी जिच्या विरुद्ध आदेश जारी होणे प्रस्तावित असेल त्या व्यक्तीला आदेश कोणत्या आधारावर प्रस्तावित आहे याची कल्पना देणारी लेखी सूचना केंद्र सरकार देईल, आणि जर सब-सेक्शन (२) मधील क्लॉज (अ) वगळता इतर कोणत्या तरतुदींच्या आधारे आदेश प्रस्तावित असेल तर या संदर्भात निर्देशित पद्धतीत अर्ज करून आपले प्रकरण चौकशी कमिटीकडे पाठविण्यासाठी मागणी करण्याचा हक्क त्याला राहील.

(५) जर सब-सेक्शन (२)मधील क्लॉज (अ) वगळता कोणत्याही तरतुदींच्या आधारे एखाद्या व्यक्तीच्या विरुद्ध आदेश प्रस्तावित करायचा असेल आणि त्या व्यक्तीने निर्देशित पद्धतीत अशाप्रकारे अर्ज सादर केला, तर केंद्र सरकार याबाबत निश्चित आणि इतर बाबबींत शक्यतो चौकशी कमिटीकडे पाठवेल. या चौकशी कमिटीमध्ये अध्यक्ष (ज्याने कमीत कमी दहा वर्षे न्यायिक पदावर काम केले असेल) आणि दोन सदस्य केंद्र सरकारतर्फे नियुक्त असतील.

(६) असे प्रकरण सादर झाल्यानंतर चौकशी कमिटी निर्देशित पद्धतीने चौकशी करेल आणि केंद्र सरकारला आपला अहवाल सादर करेल आणि केंद्र

सरकार सर्वसाधारणपणे या चौकशी अहवालातील मार्गदर्शनरूप या सेक्शन अंतर्गत आदेश जारी करेल.

सेक्शन १३ : शंकास्पद प्रकरणात सर्टिफिकेट ऑफ सिटिझनशिप

केंद्र सरकार शक्यतो ज्याच्या भारतीय नागरिकत्वाबाबत शंका उपस्थित झाल्या असतील त्यातील योग्य वाटणाऱ्या प्रकरणात भारतीय नागरिक असल्याचे प्रमाणित करेल आणि या सेक्शनअंतर्गत जारी केलेला दाखला, जर का सदर व्यक्तीने भ्रष्ट पद्धतीने, चुकीची माहिती देऊन किंवा कोणतीही माहिती लपवून मिळवल्याचे सिद्ध झाले नाही तर सदर तारखेपासून ती नागरिक होती, याचा हा निर्णायक पुरावा असेल. याने त्यापूर्वीच्या तारखेपासून व्यक्ती नागरिक होती या पुराव्याला बाधा येणार नाही.

सेक्शन १४ : सेक्शन ५ए ६ आणि ७ए अंतर्गत अर्ज निकाली करणे

(१) सेक्शन ५ए६ आणि ७ए अंतर्गत दाखल अर्ज केंद्र सरकार अथवा अधिकृत प्राधिकरण, विवेकाला अनुसरून मान्य अथवा अमान्य करू शकतील, आणि मान्य किंवा अमान्य करण्याचे कारण देणे बाध्य असणार नाही.

(२) सेक्शन १५ मधील तरतुदींच्या अधीन राहून वर उल्लेख केल्याप्रमाणे केंद्र सरकार किंवा अधिकृत प्राधिकरणाचा निर्णय अंतिम असेल, आणि याला न्यायालयात उपस्थित करता येणार नाही.

सेक्शन १४ ए : नॅशनल आयडेंटिटी कार्ड प्रदान करणे

(१) केंद्र सरकार प्रत्येक भारतीय नागरिकाची सक्तीने नोंदणी करून त्याला नॅशनल आयडेंटिटी कार्ड प्रदान करू शकेल.

(२) केंद्र सरकार नॅशनल रजिस्टर ऑफ इंडियन सिटिझन तयार करू शकेल आणि त्या कार्यासाठी नॅशनल रजिस्ट्रेशन ॲथॉरिटी गठित करेल.

(३) सिटिझनशिप (अमेंडमेंट) ॲक्ट, २००३ लागू होण्याच्या तारखेपासून रजिस्ट्रेशन ऑफ बर्थ ॲन्ड डेथ ॲक्ट, १९६९ (१८ ऑफ १९६९)च्या सेक्शन ३ सब-सेक्शन (१)अंतर्गत नेमण्यात आलेले रजिस्ट्रार जनरल, इंडिया, हे नॅशनल रजिस्ट्रेशन ॲथॉरिटी म्हणून पदभार सांभाळतील आणि रजिस्ट्रार जनरल ऑफ सिटिझन रजिस्ट्रेशन म्हणून कार्य पाहतील.

(४) रजिस्ट्रार जनरल ऑफ सिटिझन रजिस्ट्रेशन यांना त्यांचे कार्य आणि जबाबदारी पार पाडण्यासाठी आवश्यक अशा इतर सहायक अधिकारी आणि कर्मचारीवर्ग यांची केंद्र सरकार नियुक्ती करेल.

(५) सक्तीने भारतीय नागरिकांची नोंदणी करण्यासाठी कोणत्या प्रक्रियेचे

पालन करावे हे निर्देशित करण्यात येईल.

सेक्शन १५ : सुधार करण्यासाठी अर्ज

(१) अधिकृत प्राधिकरण, किंवा कोणताही अधिकारी किंवा (केंद्र सरकार वगळता) इतर कोणत्याही सत्तासंस्थेने या कायद्यांतर्गत केलेल्या आदेशामुळे बाधित झालेली व्यक्ती आदेश झाल्या तारखेपासून ३० दिवसांच्या आत केंद्र सरकारकडे त्या आदेशात सुधारणा करण्यासाठी अर्ज करू शकेल.

जर का अर्जकर्त्याला सबळ कारणांमुळे अर्ज सादर करणे शक्य झाले नाही व याबाबत केंद्र सरकारचे समाधान झाले तर विलंबित अर्जाची दखल घेईल.

(२) सब-सेक्शन (१)अंतर्गत असा अर्ज मिळाल्यानंतर केंद्र सरकार, बाधित व्यक्तीचा अर्ज आणि यासंबधी आदेश जारी करणारा अधिकारी किंवा प्राधिकरण यांच्याकडून सादर झालेला अहवाल यांची पडताळणी करून अर्जासंदर्भात योग्य वाटेल असा आदेश जारी करेल, आणि केंद्र सरकारचा हा आदेश अंतिम असेल.

सेक्शन १५ ए : पुनरावलोकनासाठी अर्ज

(१) केंद्र सरकारच्या निर्णयाने बाधित झालेली कोणतीही व्यक्ती असा आदेश जारी झाल्यानंतर तीस दिवसांच्या आत या आदेशाचे पुनरावलोकन होण्यासाठी अर्ज करू शकेल :

जर का अर्जकर्त्याला सबळ कारणांमुळे अर्ज सादर करणे शक्य झाले नाही व याबाबत केंद्र सरकारचे समाधान झाले तर विलंबित अर्जाची दखल घेईल.

जर का सेक्शन १४ ए मधील तरतुदींच्या अंर्तगत जारी झालेल्या आदेशांच्या पुनरावलोकनासाठी सादर झालेला अर्ज सेक्शन १८ सब-सेक्शन (१) क्लॉज (पं)मध्ये निर्देशित करण्यात येईल अशा पद्धतीचा अवलंब करून निर्गत केला जाईल.

(२) सब-सेक्शन (१)अंर्तगत अर्ज प्राप्त झाल्यानंतर केंद्र सरकारला योग्य वाटेल असा आदेश जारी करेल, आणि पुनरावलोकनाबाबत असा झालेला निर्णय अंतिम असेल.

सेक्शन १६ : अधिकाराचे हस्तांतरण-

केंद्र सरकार आदेशाद्वारे सूचित करेल, की या कायद्यातील सेक्शन १० आणि सेक्शन १८ वगळता कोणत्याही तरतुदीने त्याला प्राप्त झालेले कोणतेही अधिकार, आदेशात नमूद केली जाईल अशी परिस्थिती आणि अशी अवस्था उद्‌भवल्यास, ज्यांचा निर्देश करण्यात येईल असे अधिकारी आणि

प्राधिकरणसुद्धा या अधिकारांची अंमलबजावणी करू शकतील.

सेक्शन १७ : अपराध

कोणतीही व्यक्ती, जी या कायद्यांतर्गत कोणतीही बाब प्राप्त करण्यासाठी, काही करण्यास किंवा न करण्यास जाणीवपूर्वक खासकरून महत्त्वपूर्ण चुकीची माहिती सादर करेल, पाच वर्षांपर्यंत कैदेच्या शिक्षेस किंवा पन्नास हजार रकमेच्या दंडास किंवा दोन्ही शिक्षेस पात्र होईल

सेक्शन १८ : नियमावली बनविण्याचा अधिकार

या कायद्याच्या उद्देशपूर्तीसाठी केंद्र सरकार ऑफिशियल गॅझेटमध्ये नोटिफिकेशन काढून नियमावली तयार करू शकेल.

भारतीय नागरिकत्व कायदा, १९५५

सेक्शन १४ ए : नॅशनल आयडेंटिटी कार्ड प्रदान करणे

(१) केंद्र सरकार प्रत्येक भारतीय नागरिकाची सक्तीने नोंदणी करून त्याला नॅशनल आयडेंटिटी कार्ड प्रदान करू शकेल.

(२) केंद्र सरकार नॅशनल रजिस्टर ऑफ इंडियन सिटिझन तयार करू शकेल आणि त्या कार्यासाठी नॅशनल रजिस्ट्रेशन ॲथॉरिटी गठित करेल.

(३) सिटिझनशिप (अमेंडमेंट) ॲक्ट, २००३ लागू होण्याच्या तारखेपासून रजिस्ट्रेशन ऑफ बर्थ ॲन्ड डेथ ॲक्ट, १९६९ (१८ ऑफ १९६९)च्या सेक्शन ३-सब-सेक्शन (१)अंतर्गत नेमण्यात आलेले रजिस्ट्रार जनरल, इंडिया हे नॅशनल रजिस्ट्रेशन ॲथॉरिटी म्हणून पदभार सांभाळतील करतील आणि रजिस्ट्रार जनरल ऑफ सिटिझन रजिस्ट्रेशन म्हणून कार्य पाहतील.

(४) रजिस्ट्रार जनरल ऑफ सिटिझन रजिस्ट्रेशन यांना त्यांचे कार्य आणि जबाबदारी पार पाडण्यासाठी आवश्यक अशा इतर सहायक अधिकारी आणि कर्मचारीवर्ग यांची केंद्र सरकार नियुक्ती करेल

(५) सक्तीने भारतीय नागरिकांची नोंदणी करण्यासाठी कोणत्या प्रक्रियेचे पालन करावे हे निर्देशित करण्यात येईल. ◆

६

जगाला चिंता : जागतिकीकरण, युद्ध आणि वंशसंहारामुळे स्थलांतरित आणि निर्वासित होणाऱ्या दु:खी माणसांची

▶ मोदी सरकार गुंतले स्वदेशी मुस्लिमांना छळण्यात आणि परदेशी हिंदूच्या बेगडी प्रेम प्रदर्शनात

मुळात एनआरसीची चर्चा, भारतात बेकायदा स्थलांतरितांची संख्या बेसुमार वाढली, या आवईतून जन्मलेली आहे. भारतात स्थलांतरणाने गंभीर पातळी गाठली? किंवा स्थलांतरितांमुळे भारताच्या अर्थव्यवस्थेचे कंबरडे मोडले? किंवा नैसर्गिक साधन संपत्तीवरचा ताण असह्य झाला? असा काही अभ्यास झाला का? बरे बेकायदा स्थलांतरित केवळ मुसलमान आहेत का? त्यांची नेमकी संख्या किती आहे? आश्चर्य म्हणजे भारताचे गृहमंत्री शहांनी सरकारकडे असा आकडा नसल्याचे परवा लोकसभेत कबुल केले! खरेतर, तात्पुरते अथवा कायम स्थलांतर करू इच्छिणारे, बेकायदा घुसखोर किंवा निर्वासीत यांच्यासाठी आपल्या सरकारकडे व्यापक धोरण नाही. कायद्याची रचना आणि हाताळणारी यंत्रणा नाही. चिंता दिसते ती श्रीमंत देशातील 'इंडियन डायस्पोरा'च्या उच्चजातीवर्गाच्या डॉलरची! त्यांना 'ओव्हरसीज सिटिझन ऑफ इंडिया कार्डहोल्डर'द्वारे सवलतींचा वर्षाव करण्याची! पण फिजी, श्रीलंका, भूमध्य आशिया, आफ्रिकेसह जगभरात 'मजूर' म्हणून गेलेल्या हिंदू अथवा भारतीयांना वाऱ्यावर सोडले. म्यानमारसारख्या देशात मुस्लिमांचे उघड शिरकाव सुरू असताना मानवतेच्या रक्षणासाठी जागतिक पातळीवर काय केले? उलट काही हजार पिडीत रोंहिंग्या शरणार्थींना वाळवी म्हणून पुन्हा पुन्हा हाकलून देण्याची निर्लज्ज भाषा कशी करू शकता? मुस्लिमांचा इतका द्वेष कशासाठी?

भारतात हे बेकायदा स्थलांतरीत कोण? एकतर अवैध मार्गांनी कोणत्याही कागदपत्रांशिवाय घुसखोरी करून आले किंवा वैध पासपोर्ट वा अन्य कागदपत्रांनी दाखल झाले आणि मुदत संपल्यानंतरही येथेच राहिले, असे हे लोक आहेत. या लोकांची ओळख पटविणे आणि त्यांना मुळच्या देशात म्हणजेच आपल्या

देशातून घालवून देण्यासाठी एनआरसीचा उपक्रम केंद्र सरकारने हाती घेतला आहे. मोघम बोलण्यापेक्षा, मोदी सरकार आणि त्यांच्या पक्षाच्या मते हे अवैध बेसुमार स्थलांतरित बांग्लादेश आणि पाकिस्तानातून आलेले मुसलमान आहेत! या मुसलमानांना देशातून हाकलून मोदी सरकारला शाब्बासकी मिळवायची आहे. मुस्लिम शत्रू देशातील हिंदू आणि मुस्लिमेतर लोकांना भारताचे नागरिक बनविल्याबद्दल हिंदुंची सहानुभूती मिळवायची आहे. काँग्रेसने जे केले नाही ते आम्ही केले हे भांडवल करून निवडणूका जिंकत राहणे हा डावपेच आहे. त्यासाठी या निमित्ताने हिंदू-मुस्लिम फाळणी जर कायमस्वरूपी करता आली तर करावी असाही याचा उद्देश आहे. थोडक्यात, एनआरसीचा सगळा उपद्व्याप पाकिस्तान आणि बांग्लादेशातून बेकायदा आलेले मुस्लिम घुसखोर शोधणे स्पष्ट असाच आहे. आपण या प्रकरणात याच्या थोडे वर उठून स्थलांतराचा खरोखरच भारतात प्रश्न किती गंभीर आहे. हे पाहू, नंतर इतर अंगाची चर्चा करू.

जगभरात स्थलांतरणाची वस्तुस्थिती

स्थलांतरण ही जागतिक प्रक्रिया आहे. जागतिक बँक, सीआयए आणि युनायटेड नेशन्ससारख्या संस्था याचा बारकाईने अभ्यास करून आपले अहवाल प्रसिद्ध करतात. युनायटेड नेशन्सचा जागतिक स्थलांतर २०१७च्या अहवालानुसार जगभरातून स्थलांतरितांचे प्रमाणात सतत वाढ होत आहे. २०१७साल अखेर जगभरातून २५ कोटी ८० लाख लोकांनी स्थलांतर केले आहे. एकूण स्थलांतरितामध्ये ६४ टक्के स्थलांतरण उच्च उत्पन्नाच्या देशात, ३२ टक्के स्थलांतर मध्यम उत्पन्नाच्या देशात तर केवळ ४ टक्के स्थलांतर कमी उत्पन्न असलेल्या देशात झालेले आहे. अमेरिका (५ कोटी), सौदी अरेबिया व जर्मनी (१.२ कोटी प्रत्येकी), रशियन फेडरेशन (२ कोटी), युके (०.८८ कोटी) आणि नॉदर्न आयर्लंड (.८३ कोटी) या देशातून क्रमशः सर्वाधिक स्थलांतर झाले आहे. जगातील प्रमुख १० देशात ५० टक्के स्थलांतर होते. सर्वाधिक स्थलांतर करणारे आशियाई देशात जन्मलेले (१०.६ कोटी) आहेत. त्यातही जगभरात सर्वाधिक स्थलांतर करणारे भारतीय असून त्यांची संख्या १.७ कोटी आहे. बांगलादेशातून ७० लाख, पाकिस्तानातून ६० लाख लोक स्थलांतरीत झाले आहेत. स्थलांतर करणाऱ्यांमध्ये स्त्रियांचे प्रमाण ४८ टक्के आहे. जागतिक स्थलांतरण आणि निर्वासितांच्या गंभीर प्रश्नाविषयी युनायटेड नेशन जगातील सर्व देशांनी मानवतावादी भूमिका घेण्याविषयी एक मसुदा तयार करत आहे. मोदी सरकारची भूमिका याच्या विरोधात आहे असे दिसते !

जगभरात निर्वासितांच्या बाबतीत कायद्याची रचना आहे. ते निर्वासितांच्या प्रचंड संख्येचा सामना करत आहेत. भारतात भाजपा सरकार याबाबत गंभीर नाही. म्यानमारमध्ये रोहिंग्यांचा नरसंहार सुरू आहे. मोदी सरकारला त्यांच्याविषयी जरासुद्धा सहानुभूती नाही. त्यांना देशाबाहेर हाकलून देण्याची भाषा बोलली जाते. कारण रोहिंग्या मुसलमान आहेत. मोदी सरकार हिंदू-मुस्लिम धर्मांध उथळ राजकारण खेळण्यात मस्त आहे. गेल्या २५ वर्षात साम्राज्यवाद्यांनी लादलेल्या युद्धामुळे जवळपास सव्वा कोटी मुसलमानांनी जीव गमावला आहे. जगात २०१६च्या अखेरीस राजकीय छळ, दहशतवाद, युद्ध इ. कारणांनी निर्वासित किंवा राजाश्रय मागणाऱ्यांची एकूण संख्या २.९५ कोटी होती. विशेष म्हणजे ८२.५ टक्के निर्वासित मुख्यतः विकसनशील देशातून राहतात. तुर्कस्तानमध्ये सर्वाधिक म्हणजे ३१ लाख निर्वासित राहतात. यांनतर जॉर्डन (२९ लाख), पॅलेस्टाईन (२२ लाख), लेबनॉन (१६ लाख), पाकिस्तान (१४ लाख), जर्मनी (१.३ लाख) आणि युगांडा (१.२ लाख) याचा क्रमांक लागतो. याचा अर्थ मध्यपूर्वेत मुस्लिम देश उद्ध्वस्त झाल्यानंतर निर्वासितांना सांभाळण्याचा आर्थिक ताण मुस्लिम देशांनाच सहन करावा लागतो आहे. युद्ध लादून निर्वासित निर्माण करणाऱ्या विकसित देशांनी ही जबाबदारी टाळलेली दिसते. आंतरराष्ट्रीय स्तरावर हा विषय गांभीर्याने घेण्याची गरज आहे. यापैकी कोणत्याच अहवालात भारतातील स्थलांतरांची समस्या म्हणून दखल नाही. किंवा गांभीर्याने नोंद आढळत नाही. तरी भारतात मोदी आणि भाजपा या मुद्यावर प्रचंड गोंगाट आणि गोंधळ माजवत आहे.

बेसुमार बेकायदा बांग्लादेशी मुस्लिमांचा बागुलबुवा

फाळणीपासून एक प्रथा बनली आहे. पाकिस्तान आणि बांग्लादेशातून हिंदू किंवा इतर धार्मिक अल्पसंख्य भारतात बेकायदा प्रवेश करून आले की ते धार्मिक छळ सोसणारे 'शरणार्थी' आणि मुसलमान आले की ते 'घुसखोर'! तिबेटमधील बौद्ध आणि श्रीलंकेतून आलेले हिंदू शरणार्थी आहेत. कायदेशीर अडचणीमुळे हिंदू शरणार्थींनासुद्धा नागरिकत्व मिळवण्यात अनेक वर्षे वाट पाहावी लागली. पण त्यांना शरणार्थी सर्टिफिकेट मिळाल्यामुळे भारतीय नागरिकांचे काही अधिकार वगळता, मानवी सुविधा मिळाल्या. २०१५ नंतर मोदी सरकारला नागरिकता देता आली नाही तरी हिंदू शरणार्थींना कायम निवासाचा परवाना दिला आहे. पण मुस्लिम घुसखोर असल्याने त्यांना सतत तोंड लपवून राहावे लागले. किंवा जेलमध्ये कुजावे लागते.

बरे, भारतात एकूण बेकायदा घुसखोरांची संख्या किती? त्यामध्ये बेकायदा वास्तव्य करणारे मुसलमान किती? केंद्रिय गृहमंत्री असताना इंद्रकुमार गुजराल यांनी १० ऑगस्ट १९९८ रोजी होम मिनिस्ट्री/ इंटलिजन्स ब्युरो सुत्रांच्या आधारे लोकसभेत सादर केलेली माहिती सुप्रीम कोर्टात सादर करण्यात आली आहे. त्यानुसार भारतात बेकायदा राहणारे स्थलांतरितांची संख्या एक कोटी आहे. राज्यवार त्यांची संख्या अशी -

प. बंगाल - ५४ लाख , आसाम - ४० लाख, त्रिपुरा - ८ लाख, बिहार - ५ लाख, महाराष्ट्र - ५ लाख राजस्थान - ५ लाख, दिल्ली - ३ लाख, एकूण - १ कोटी ८ लाख.

भारताच्या होम मिनिस्ट्रीने राज्याकडून माहिती घेऊन ३१ डिसेंबर २०१४ अखेरपर्यंत भारतात दुसऱ्या देशातील लोकांची संख्या २,८९,३९४ इतकी असल्याचे सांगितले आहे. यामध्ये बांग्लादेशी- १,०३,८१७, श्रीलंका- १,०२,४६७ , तिबेट- ५८,१५५ आणि म्यानमार- १२,४३४ पण रोहिंग्यांचा हा आकडा ४० हजारपर्यंत असावा असा अंदाज आहे. शिवाय अफगाणिस्तान- ३४६९, पाकिस्तान- ८७९९ आणि इतर २५३ आहेत.

बेकायदा मुस्लिम स्थलांतरितांची नेमकी संख्या किती असेल? या विषयी सच्चर समितीने अहवालात विचार केला आहे. त्यांच्या अंदाजानुसार २१व्या शतकाच्या शेवटी भारताची एकूण संख्या १७० ते १८० कोटी आणि मुस्लिमांची संख्या ३२ ते ३४ कोटी राहील. म्हणजे ती १८ ते १९ टक्क्यांच्या दरम्यान राहील. यामध्ये त्यांनी स्थलांतरणाने मुस्लिमांच्या संख्येतील वाढ हिशेबाने काढली आहे. जन्म मृत्यू दराने होणारी नैसर्गिक वाढ आणि प्रत्यक्ष वाढ यातील फरक म्हणजे स्थलांतराने झालेली वाढ. हे सगळे हिशेब त्यांनी केले आहेत. हे हिंदू आणि मुस्लिमांच्या लोकसंख्या वाढीच्या दरातील फरकाच्या १/६ इतकी आहे. १९६१ ते २००१ या चार दशकांच्या कालावधीत हिंदूचा दर २.०४ तर मुस्लिमांचा दर २.७० इतका आहे. यातील फरक ०.६६ येतो. याच्या एक षष्ठांश म्हणजे ०.११ आकडा येतो. मुस्लिमांची भारतातील आजची लोकसंख्या जरी २० कोटी मानली तर त्याच्या ०.११ टक्के म्हणजे हा अंक २ लाख २० हजार येतो. इतक्या छोट्या संख्येच्या मुस्लिम घुसखोरांना शोधणे काय कठिण आहे? त्यासाठी संपूर्ण देशाला वेठीला धरण्यात अर्थ काय? हे मुस्लिमांऐवजी हिंदू जनतेने विचारायला हवे.

१९७१ नंतर पाकिस्तान आणि बांग्लादेशातून होणारे स्थलांतर खूप रोडावले

आहे. श्रीलंकेतून स्थलांतर जास्त झाले तरी त्यातले बरेच परततील. त्यातही मुस्लिम वगळता इतर सर्व शरणार्थींना मोदी सरकार नव्या कायद्याने नागरिकत्व बहाल करणार आहे. म्हणजे बेकायदा स्थलांतरित राहिले केवळ मुसलमान आणि त्यांची संख्या २० लाख होईल. मग एवढ्या बेकायदा मुस्लिमांना शोधण्यासाठी, १३० कोटी लोकांना आपली नागरिकता सिद्ध करायला लावणे योग्य आहे का? भोंदूगिरीला भाळलेल्या जनतेने विचार करणे बंद केले आहे. म्हणजे मुद्दा तोच, काळा पैसेवाल्यांचा शोध घ्यायचा नाही. सर्वसमान्य गरीब जनतेची नोटाबंदी करून पराक्रम दाखवायचा! जनता खुळी झाली तर हेच चालणार!

शेवटी, बेकायदा घुसखोर सहन करू नयेत असे मानले तरी, घुसखोर येतात कोठून? आकाशातून पडत नाहीत किंवा जमिनीतून उगवत नाहीत. सरळ आहे सीमा पार करून येतात. सागरी सीमेवर तट रक्षक दल आहे. जमिनी सीमेवर बॉर्डर सिक्युरिटी फोर्स तैनात आहे. आता तर सीमेवर वीजेचे काटेरी कुंपण घातले आहे. अत्याधुनिक उपकरणे, सेटलाइट अन् काय काय आहे. पाकिस्तानात ३.७० टक्के हिंदू इतकी आहे. पाकिस्तानातून अत्यंत किरकोळ स्थलांतर होते. बांग्ला देशातसुद्धा हिंदू वा मुस्लिमेतरांची संख्या ९.८ इतकी झाली आहे. आता मोदींच्या न्यायाने मुस्लिम व्यतिरिक्त सर्वांना भारतात प्रवेश मुक्त आणि नागरिकता मिळणार असेल, तरी उरलेले हिंदुसुध्दा भारतात येणार नाहीत. अर्थात याची अंतीम मुदत सुद्धा ३१ डिसेंबर २०१४ आहे. मुस्लिम आले तर जेलमध्ये सडण्याशिवाय त्यांना दुसरा मार्ग नाही. तर ते कशाला येतील? म्हणजे घुसखोरीचा फार बिकट प्रश्न उभारला आहे किंवा भविष्यात उभारणार आहे, असे दिसत नाही. मग इतकी मोठी ऐतिहासिक कवायत कशासाठी? उरल्या सुरल्या मुस्लिमांना घालवायला? त्यासाठी इतर मार्ग आहेत. सगळ्या हिंदूंचा छळ करण्याची गरज काय?

भारतीय उच्चजातीवर्गाचा परदेशी डायस्फोरा आणि परदेशस्थ कामगार यांच्यातील भेदभाव संपुष्टात यावा

आपल्याच भारतीय वंशाच्या परदेशात कोणत्याही सामाजिक सुरक्षाविना राहणाऱ्या कष्टकरी भावंडांबद्दलसुद्धा आपण असंवेदनशील आहोत. या जगभरातल्या सर्वांत अल्पसंख्य कष्टकरी वर्गासाठी त्यांच्या मानवाधिकारांचे रक्षण करणारे आणि त्यांच्या हितसंबंधांचे रक्षण करणारे कायदे व्हावेत, यासाठी आपण हा लढा करताना विचार केला पाहिजे. युपीए सरकारने नेमलेल्या वर्मा कमेटीच्या सूचना केवळ परदेशस्थ डॉलर कमावणाऱ्या डायस्फोराचे हितसंबंध

राखण्यासाठी झाला आहे.

उदाहरणार्थ, मुस्लिम गल्फ देशातून नोकऱ्या करणाऱ्या केरळीयन लोकांची संख्या २०१४ साली १२.४८ लाख होती. त्यांनी पाठविलेला २०१४ सालचा पैसा ७२,६८० कोटी रुपये होता. आज तो दुप्पट असावा. आज १० कोटी भारतीय जगातील विविध देशात राहतात. इतरही देशात छोट्या नोकऱ्या करून भारतात आपल्या कुटुंबाला पैसे पाठविणाऱ्यांची संख्या कोटींनी आहे. हे सारे भारतीय नागरिक आहेत. परदेशात कष्ट करणाऱ्या अशा सामान्य भारतीय नागरिकाबद्दल भारत सरकार बेफिकीर आहे. मात्र, भारताचे नागरिक नसलेल्या, परदेशातील श्रीमंत इंडियन डायस्पोरासाठी 'ओव्हरसीज इंडियन कार्ड व्होल्डर' म्हणून पायाखाली गालिचे अंथरत आहे! अक्षयकुमारसारखा भारतात राहणारा पण ओव्हरसीज सिटीझन मोदींची मुलाखत घेऊन आम्हाला देशभक्ती शिकवितो. अशा ओव्हरसीज सिटीझनना भारतात बेमुदत राहण्याचा, प्रॉपर्टी बनविण्याचा, गुंतवणूक करण्याचा आणि कर भरण्यापासून दूर राहण्याचा संपूर्ण हक्क दिला गेला आहे. मोठ्या प्रमाणात नटनट्या, व्यापारी, बडे उद्योगपती आणि संपूर्ण इंडियन अप्पर कास्ट डायस्फोरा याचा फायदा घेत आहे. परदेशस्थित भारतीय वंशाची कष्टकरी जनता आणि भारतीय वंशाची उप्परकास्ट इंडियन डायस्फोरा यांच्यात होणारा भेद आपण जाणून घेतला पाहिजे. इंडियन डायस्फोराला विशेष नागरिकत्वाचा कायदा आणि कष्टकरी स्थलांतराना हाकला! हा अन्याय सहन करता कामा नये. ◆

७

नागरिकता कायद्यासाठी फाळणी आणि नेहरू-लियाकत पॅक्ट उगाळण्याचा बाष्कळपणा

▶ हिंदू शरणार्थींना नागरिकता देण्यास विरोध असण्याचे कारण नाहीच, पण मुस्लिमांना विरोध का?

मोदी सरकारने कलेल्या नागरिकता कायद्यानुसार केवळ मुस्लिमांना अवैध घुसखोर ठरवून जेलमध्ये पाठविले जाईल किंवा पकडून स्वत:च्या देशात परत पाठविले जाईल; पण पाकिस्तान, बांगला देश आणि अफगाणिस्तानमधील हिंदू आणि इतर धर्मीयांना छळाचे कारण देऊन नागरिक बनविले जाईल. याच देशात हजारा, शिया, पख्तू, उझबेकी, अहमदी अशा अल्पसंख्य मुस्लिम जमाती आणि बहाई धर्मीयांचे वास्तव्य आहे. हिंदूंप्रमाणेच या देशातील स्वधर्मीय मुस्लिम अल्पसंख्य जमाती आणि अन्य धर्मीयांचे शिरकाण होते. चायनात उगुर आणि तिबेटी, रशियात चेचन, इराण-इराक-सीरिया-तुर्कस्तान या देशांत कुर्द, इराक आणि सीरियात मेझदी, श्रीलंकेत तमिळी... जगभराच्या प्रत्येक राष्ट्रात अल्पसंख्याकांचा छळ आणि वंशहत्या होते. अल्पसंख्याकांच्या मानवी हक्कांचा विचार धर्माच्या पलीकडे जाऊन होणे अत्यावश्यक आहे. नागरिकतेच्या बाबतीत यासाठी उदारवादी भूमिका आंतरराष्ट्रीय पातळीवर मान्य झाली पाहिजे. अशा वेळी भारताने प्रतिगामी आणि धर्मद्वेषाची भूमिका घेऊन मुस्लिमांना नागरिकत्वातून वगळण्याचा कायदा करणे अत्यंत लाजिरवाणे आहे. भारतात मुस्लिम असणे हा अपराध आहे काय?

भारतात तालिबान किंवा उमात उद् दावासारख्या संघटना किंवा व्यक्तींना राजकीय आश्रय द्या, असे कोणी म्हणणार नाही. कोणत्याही देशात हिंदूंचा छळ होत असेल तर भारतात त्यांना निव्वळ आश्रय नव्हे, नागरिकत्व मिळाले पाहिजेच. याबद्दल कोणाचेच दुमत होणार नाही. पण तालिबानची सत्ता आल्यानंतर तेथील पुरोगामी मुस्लिमांचे शिरकाण सुरू झाले, जीव वाचविण्यासाठी देशत्याग करावा लागला तर? मुसलमान आहेत म्हणून त्यांना

आश्रय नाकारायचा का? म्यानमारमध्ये रोहिंग्याच्या कत्तली झाल्या तरी ते मुसलमान आहेत म्हणून माणुसकी दाखवायची नाही? जीव गमवावा लागत असेल तरी नागरिकत्व नाकारायचे काय? श्रीलंकेतील तमिळींचे काय करायचे? भारताने पूर्वी तालिबान राजवटीच्या काळात तालिबानविरोधी अफगाणींना राजकीय आश्रय दिला आहे. तिबेटवर चीनने ताबा मिळवल्यानंतर परागंदा झालेल्या दलाई लामा आणि त्यांच्या सर्व अनुयायांना भारताने राजकीय आश्रय दिला. त्यांना भारतात 'परागंदा तिबेट सरकार' स्थापन करण्याची मुभा दिली. ते चालविण्यासाठी निधी दिला. सर्व सुविधायुक्त वस्त्या उभारून त्यांचे जागोजागी संपूर्ण पुनर्वसन केले आहे. नागरिकत्व बहाल केले आहे. फाळणीनंतर निर्वासित पाकिस्तानी सिंधींना नागरिकत्व देऊन त्यांचे संपूर्ण पुनर्वसन केले. श्रीलंकेतील तमिळींना निर्वासित म्हणून स्वीकारले. या राजकीय कृतीचे सगळेच स्वागत करतील. आपण बांगला देश निर्मितीत हस्तक्षेप केला. त्या काळात मोठ्या प्रमाणात आसाम व उत्तरपूर्वेत बांगलादेशीयांचे स्थलांतर झालेले आहे. त्यामुळे आंतरराष्ट्रीय पातळीवर जे घडते तेच आपल्या देशात घडले आहे. नेपाळींच्या बाबतीतही आपली भूमिका अत्यंत सौहार्दाची आहे. भारत आणि नेपाळची बॉर्डरसुद्धा खुली आहे. तिबेट, नेपाळ, भूतान देशांतून नित्याने स्थलांतर सुरू असते. श्रीलंकेतूनही हेच घडते. जागतिकरणात प्रत्येक देश बहुधर्मिक, बहुभाषिक आणि बहुवांशिक होणे अटळ आहे. आता सगळेच देश बहुधार्मिक/वांशिक वगैरे झाले म्हणून जगातील देशांच्या सीमा खुल्या झाल्या असे नाही. आर्थिक, भौतिक कारणांनी हे भारतालासुद्धा परवडणारे नाही. हे मान्य केले तरी स्थलांतरितांच्या प्रश्नावर काही तरी तारतम्य बाळगावे लागेल.

थोडक्यात, मुद्दा असा, की ज्या कोणा समुदायाचा राजकीय वा अन्य कारणांनी संहार होतो तेव्हा मानवतावादाच्या आधारावर सर्वच देशांनी त्यांना राजकीय आश्रय दिला पाहिजे. आवश्यक असेल तर पुनर्वसन करून नागरिकत्व दिले पाहिजे. त्याचप्रमाणे एखाद्या व्यक्तीला काही कारणांनी एखाद्या देशाचे नागरिकत्व स्वीकारायाचे असेल तर कायद्याच्या चौकटीत त्याला मुभा दिली पाहिजे. केवळ धर्माच्या आधारे नागरिकत्व नाकारणे लोकशाही आणि मानवताविरोधी व्यवहार होईल. राजकीय आश्रय असेल किंवा नागरिकत्व देण्याचा प्रश्न, याबाबत भारताचा कायदा आहे आणि राजकीय धोरण आहे. नागरिकत्व देण्याचे किंवा नाकारण्याचे निर्णय या आधारे होत आले आहेत. या कायद्यातील काही त्रुटींमुळे सरकारला निर्णय घेण्यात अडचणी असतील तर

त्यासाठी बदल करायला हरकत नाही. पण सध्या भारतात नागरिकत्व देण्यावरून जी घटनादुरुस्ती झाली आहे. यात विशेषत: मुस्लिमांना या मानवतावादी हक्कापासून वंचित करण्याचा प्रयत्न आहे. हे आंतरराष्ट्रीय मानदंडांचे उल्लंघन करणारे आहे. भारताच्या धर्मनिरपेक्ष आणि उदार भूमिकेला छेद देणारे आहे, घटनेची चौकट मोडणारे आहे.

नव्या घटनादुरुस्तीचा आग्रह धरणाऱ्यांना इस्राइलबद्दल विशेष प्रेम आणि आकर्षण आहे. इस्राइल हे ज्यूंचे होमलँड असणे ही वेगळी समस्या आहे. बहुतांश ज्यू युरोप आणि जगभरातून स्थलांतरित होऊन अरबस्थानात आले. खरे तर दुसऱ्या महायुद्धानंतर आणले गेले. अरबांची जमीन बळकावून इस्राइल ज्यूंचे होमलँड बनले आहे. स्थानिक अरब निर्वासितांचे जीवन जगत आहेत. कोणत्या अर्थाने इस्राइल आपला आदर्श बनू शकतो? ज्यू आणि अरब संबंधांची तुलना हिंदू-मुस्लिम संबंधात होत नाही. भारतात हिंदू-मुस्लिम संबंध, संस्कृती आणि परंपरेला मानवतेचा मोठा इतिहास आहे. कृतिमरीत्या हिंदू-मुस्लिमांमध्ये शत्रुत्व निर्माण करण्याचा जोरदार प्रयत्न सुरू आहे हा भाग निराळा. भारतातील मुसलमान, स्थानिक हिंदू धर्मांतरित आहेत. कोणी त्यात परकीय किंवा स्थलांतरित नाही. धर्मांतर केल्याने नागरिकत्वाचा किंवा देशावरचा हक्क संपत नाही. भारत हिंदूइतकेच मुस्लिमांचे आणि इतर सर्वधर्मियांचे होमलँड आहे.

भारत, पाकिस्तान, अफगाणिस्तान आणि बांगला देश हे सारेच प्राचीन सिंधू संस्कृतीशी संबंधित एकाच समुदायाचा भाग आहेत. महाभारत आणि रामायणातले उल्लेख त्या हद्दीपर्यंत जातात, आणि ते स्वाभाविकही आहे. मौर्य काळापासून अगदी मुगलांच्या राजवटीत काबूलपर्यंत राज्य एकछत्री होते. वसाहतकाळात आणि महायुद्धानंतर जगभरात नवे देश आणि त्यांच्या सीमारेषा निश्चित झाल्या आहेत. देशांची विभागणी, आखणी करण्यात पाश्चिमात्य वसाहतवादी शक्तींचा हात आहे. त्यांच्या हितसंबंधांनी देशाच्या सीमांना बाधा झालेली आहे. भारत-पाकिस्तानप्रमाणे कोरिया, व्हिएतनाम, येमेन आणि अरब राष्ट्रांची फाळणीसुद्धा याच शक्तींनी घडवली आहे. शीतयुद्धाच्या काळात रशिया, चीनने याला हातभार लावलेला आहे. अगदी जर्मन देशाची फाळणी करून बर्लिनमध्ये भिंत उभी करण्यात आली होती; पण जर्मन जनतेने यांचा पराभव केला आणि पुन्हा एक राष्ट्र निर्माण करण्यात यश मिळवले. व्हिएतनाम आणि कोरियामध्ये तसा विचार बळावतोय. रशियन फेडरेशन, युरोपियन युनियनपासून आपल्याला शिकता आले पाहिजे. आज भारतीय उपखंडात निदान

शत्रुत्व नसावे. सहकार्य वाढावे. यात सर्वांचे हित आहे. यासाठी राजकीय प्रयत्नांची गरज आहे. पण दुर्दैवाने आज मोदी सरकार या देशांना स्वत:हून शत्रुदेशांच्या यादीत टाकत आहे.

नेहरू-लियाकत पॅक्टचा बाष्कळपणा

फाळणी काँग्रेस नावाच्या संघटनेने केली असे शहा म्हणतात. पण काँग्रेसमध्ये नेहरूंसोबत पटेल होतेच. मग पटेलांवर त्यांचा आक्षेप असायला हवा. खरे तर फाळणी म्हणजे दोन धर्मांच्या समुदायांमधली उभी फूट नव्हती. ही सगळी ऐतिहासिक बनवाबनवी आहे. ब्रिटिशकाळात मतदानाचा हक्क सर्वांना नव्हता. प्रांतिक सरकार हे सुरुवातीला ६ टक्के, नंतर १५ टक्के हिंदू-मुस्लिम श्रीमंत व जमिनदारांकडून निवडले जात होते. दोन्ही धर्मांतल्या उच्च जातिवर्गांचा हा सत्तासंघर्ष होता. त्या नेत्यांना सत्तेच्या वाटपाचा प्रश्न सोडविता आला नाही. जनतेला याच्याशी काही देणे-घेणे नव्हते. प्रथम सावरकर आणि नंतर जीनांनी द्विराष्ट्रवादाचा सिद्धांत मांडला; पण भारतातल्या २० कोटी मुसलमानांनी आणि जम्मू-काश्मीरच्या जनतेने द्विराष्ट्रवादाचा सिद्धान्त खोटा ठरवला आहे. फाळणीचा हिंसाचार आणि दोन्ही बाजूंनी झालेले स्थलांतर याची कारणे विविध आहेत, पण जे घडले तो इतिहास आहे. त्याची पुनरावृत्ती करायची का? की चुका सुधारून पुढे जायचे ?

१९५० साली नेहरू-लियाकत अली करार झाला तो दोन्ही देशांतील हिंदू-मुस्लिम अल्पसंख्य जनतेच्या सुरक्षेसाठी अल्पसंख्य आयोग स्थापन करणे, स्थलांतर करू इच्छिणाऱ्यांची संपत्ती जप्त न करणे आणि दंगलखोरांना शासित करण्याच्या मुद्द्यावर. आज भाजपाकडे स्वातंत्र्यात लढणारा हीरो नाही. म्हणून ते सरदार पटेल यांना नेहरूंच्या विरुद्ध हीरो करायचा प्रयत्न करतात. पण सरदार पटेलांनी नेहरू-लियाकत पॅक्टला पाठिंबा दिला होता. हिंदू महासभा, आरएसएसचे हीरो श्यामाप्रसाद मुखर्जी यांनी या पॅक्टला विरोध केला होता. मुखर्जींनी हिंदूंच्या रक्षणासाठी भारताने पूर्व पाकिस्तानवर लष्करी कारवाई करून तो प्रदेश भारताला जोडावा, अशी अव्यवहार्य मागणी केली होती. मग आज गृहमंत्री शहा 'नेहरू-लियाकत पॅक्टचा अंमल झाला नाही', असे कसे म्हणू शकतात? हवे तर त्यांनी मुखर्जींच्या इच्छेप्रमाणे बांगला देश जिंकून भारतात सामील होण्याचा प्रस्ताव मांडायला हवा. बहुमत त्यांच्याकडे आहे. अडचण कसली ?

दुसरे, त्यांनी ज्या भारतीय राज्यघटनेची शपथ घेतली, ती राज्यघटना त्यांना

भारतातील भाषिक आणि धार्मिक अल्पसंख्यांकांचे संरक्षण आणि विकास करण्याची, त्यांच्या हक्कांचे संरक्षण करण्यास आज्ञा देते. भारत देशाचे गृहमंत्री म्हणून परदेशातील कोणत्याही धर्माच्या अल्पसंख्याकांचे रक्षण नव्हे, भारतातील अल्पसंख्याकांची त्यांनी काळजी करायची आहे. जर का मानवतावादी दृष्टीने भारत देशाने धर्माच्या नावे अत्याचार होणाऱ्यांना आश्रय द्यायचे, मदत द्यायची किंवा नागरिकत्व द्यायचे ठरविले, तरी राज्यघटना त्यांना धर्माच्या किंवा प्रदेशाच्या नावे कोणताही भेदभाव करण्यास मज्जाव करते. जगातल्या कोणत्याही धर्माच्या व्यक्तीला किंवा समुदायाला समानतेने ही मदत दिली पाहिजे, असे देशाची घटना सांगते; पण त्यांनी पास केलेला कायदा राज्यघटनेची विटंबना करणारा आहे. कायद्याच्या समर्थनासाठी त्यांनी दिलेली कारणे ऐतिहासिकदृष्ट्या बाष्कळ आणि बालिश आहेत. हिंदू-मुस्लिमांचे धृवीकरण घडवून हिंदू मतांचा गठ्ठा हस्तगत करण्याची ही चाल आहे.

आपण आता शहाणपणाने शेजार मान्य करावा. भारत-पकिस्तानसह सार्क देशांमध्ये परस्पर सहकार्य वाढवायला हवे. काश्मीर मुद्द्यावर अडून बसण्यात अर्थ नाही. सीमेवर जवान मरताहेत, मग बोलणीची भाषा कशी करता? या प्रश्नाची मजल सहकार्याची भाषा बोलणाऱ्यांना देशद्रोही ठरवण्यापर्यंत जाऊ शकते. ही भाषा दोन्ही बाजूंच्या अविवेकी राजकारण्यांची आहे. बहुसंख्य भारतीय आणि पाकिस्तानी जनतेला मात्र शांतता आणि सहकार्य हवे आहे. पाक मिलिटरी आणि भारतविरोधी राजकारण्यांवर दबाव वाढविण्यासाठी भारताने शांतताप्रिय पाकिस्तानी जनतेसोबत उभे राहिले पाहिजे. आज पाकिस्तानी अर्थव्यवस्थेचा कडेलोट होण्याच्या मार्गावर आहे. चीन किंवा अमेरिका या संधीचा फायदा घेऊन पाकिस्तानला आपल्या दावणीला बांधतात. अशा प्रसंगी भारताने पुढाकार घेऊन पाकिस्तानची अर्थव्यवस्था वळणावर आणायला मदत करायला हवी. अशा कृतीमुळे भारतविरोधी शक्तींची तोंडे बंद होतील, दहशतवादाला चपराक बसेल. या दिशेने आंतराष्ट्रीय राजकारण पुढे नेण्याची गरज आहे. प्रस्तावित नागरिकत्वाच्या कायदादुरुस्तीत देशाचे कोणतेही हित सामावलेले नाही. त्याने कोणतेही आंतराष्ट्रीय हित साधणार नाही. मानवजातीचे यात कल्याण संभवत नाही. देशाच्या घटनेची धर्मनिरपेक्ष चौकट मजबूत होत नाही. तरीही अशा कायद्याचा आग्रह कशासाठी? अशा संकुचित राजकारणाने भारत नव्हे, हिंदुराष्ट्रसुद्धा बळकट होणार नाही! ◆

८

समारोप : आत्मचिंतनासाठी प्रेमाचा सल्ला ....

▶ 'एक मुस्लिम मारला जाणे, म्हणजे एक मुस्लिम कमी होणे' असे दंगलीत पोलिसांचे वर्तन होते - श्रीकृष्णा कमिशन अहवाल. एनआरसी किंवा सीएए अशा कायद्यांच्या माध्यमातून, मोदी सरकारचे वर्तन 'भारतात मुसलमान फार झाले, यापुढे आणखी नको' याच धर्तीवर आहे. वाराणसीमध्ये लाठीचार्जच्या दरम्यान सगीर अहमद या ११ वर्षाच्या मुलाचा मृत्यू झाला. 'शहरात अशा घटना रोज घडतात' मुलाच्या मृत्यूवर वाराणासी 'डीएम'ची प्रतिक्रिया प्रशासनाची मानसिकता दर्शविते. मुस्लिमांनी आंदोलनातून माघार घेण्यासाठी भाजपा शासीत राज्यातील प्रशासन आणि पोलिस प्रचंड दडपशाही करत आहे. हिंदुमुस्लिम सामाजिक फाळणी त्यांचा अजेंडा आहे. हिंदूराष्ट्र बनविण्यात राज्यघटना मोठा अडथळा आहे. पण घटना बदलण्याच्या दिशेने या टेस्ट केसेस सुरू आहेत. सध्यातरी मोदिंनी मांडलेल्या हिंदुहोम लॅन्डची कायदेशीर मुदत ३१ डिसेंबर २०१४ रोजी संपणार आहे.... हे चालत राहील.

पण स्वत:ची वंचितता आणि मागासलेपणा संपविण्याचा मुसलमान विचार करणार आहेत का ? की सतत नकारत्मक प्रतिक्रियावादी शोरगुल करत राहायचे आहे? मुस्लिमांचे समाजांतर्गत जटील प्रश्न कसे सुटणार आहेत ? सोडवणूकीचा मार्ग कोणता? सोडवणूकीची जबाबदारी कोण स्वीकारणार? या प्रश्नांचा माग काढत आणि सोडवणूकीसाठी पुढे सरकण्याचा प्रकर्षाने गेल्या अनेक वर्षापासून प्रयत्न करत आहोत. इतरांना सहभागी होण्याचे आवाहन करत आहोत. एकंदर आम्हाला जाणवणारी चिंता पुढील शब्दात मांडण्याचा प्रयत्न केला आहे.

खुलेपणा, आधुनिकता आणि वैज्ञानिक विचारांचा स्वीकार केल्याविना मुस्लिम समाजात परिवर्तन अशक्य. प्रतिक्रियावादी बनून कोणत्याही समाजाने प्रगती साधलेली नाही. नकारात्मक हंगामा करण्यात कांहीजणांना पुढारीपण दिसत असेल. धिंगाणा घालणारा जमाव स्वत: आनंद घेत असतो. वरून आदेश घेऊन सवाब मिळवण्याऱ्याला काही केल्याचे समाधान होत असेल. अशा कृतीतून

शक्तीच्या अपव्ययाविना हाती काही लागत नाही. यातून कधी परिवर्तन येत नाही. सृजनशीलता, सकारात्मक कृतिशीलता आणि नव्याच्या शोध घेणाऱ्या समाजाचा विकास होतो. स्वत: विचार करून, बांधिलकीने सामिल होणारा आणि त्यागाची तयारी असलेला समाज केवळ बदल घडवतो.

तिहेरी तलाक कायद्यात मुस्लिम पुरूष संकटात आला. बायकांनाही रस्त्यावर उतरायची परवानगी मिळाली. कायदा पास झाल्यावर मोर्चेकऱ्याने काही चिंता वाहिल्याचे मला तरी आठवत नाही. आरक्षणासाठी याच स्वरूपाचे क्षणिक उत्साहाचे मोर्चे पाहण्यात आले. आसाम एनआरसी, ३५ ए रद्द आणि ३७० कलम अक्रियाशील केल्यानंतर, माझा त्याच्याशी संबंध काय? मुस्लिमांची अशीच भावना होती ! बाबरी मस्जिदच्या निकालानंतर भितीपोटी सर्वांनीच गप्प बसणे पसंत केले. नागरिकता कायद्यानंतर परकीय ठरवून मुसलमानांना जेलमध्ये टाकले जाणार, अशी भिती घातल्यामुळे तो मोर्चाला अंदाज घेत बाहेर पडेल. नोकरदार, मध्यमवर्ग आपली नोकरी, व्यवसाय, करियर, कुटुंब सांभाळण्यात, स्थावर-जंगम गोळा करण्यात आणि संसारिक आनंद घेण्यात मग्न आहे. त्यालाही भिती आणि आपली मजबुरी आहे. कोणालाही, कोणताही विषय समजून घ्यायची त्याची इच्छा नाही. कोणी मला गंभीर दिसत नाही. कितीही मोठे भावनिक आंदोलन परिवर्तनाची नांदी ठरेल यावर माझा विश्वास नाही.

न्यूनगंड, पराभूत मनोवृत्ती, दुभंगलेले व्यक्तीमत्व, निराशा आणि भणंगपणाने बहुतांश जनता ग्रासलेली आहे. कातडीबचाव आणि संधीसाधुपणाची सोबत आहेच. 'रोजीरोटीसाठी धावाधाव आणि मन:शांतीसाठी मस्जिद' ही चाकोरी त्याने उपाय म्हणून स्वीकारलेली आहे. कर्मकांडाची गुंगी त्याला आवडते. दैवावर भरोसा ठेवल्याने त्याला आत्मसंतुष्टता आणि स्तब्धतेचा अनुभव मिळतो. इतर झंझट त्याला नको आहे. स्वातंत्र्यानंतर, जग जिंकण्याचा त्याचा आत्मविश्वास खालावत गेला आहे. ही पोकळी पारलौकीक चिरंतन आयुष्याच्या जीवनदृष्टीने भरून काढली गेली आहे. धर्म त्याचा भावनिक आणि वैचारिक जीवनाधार बनला आहे. संस्कृती, इतिहास, भविष्य, वारसा, अभिमान, संवाद भाषा, आणि विचार धर्माभावती पिंगा घालतात आहे. प्रत्येक गोष्ट धर्माशी जोडून बोलल्याविना त्याला आपली वाटत नाही. धर्माला स्पर्श न करता पुढे जाणे अवघड बनले आहे. ईस्लाम समाजिक परिवर्तनात अडथळा नाही. जामिया आणि आलिगडच्या खासकरून मुलीना बोलताना ऐकल्यानंतर ही गोष्ट पुन्हा प्रकर्षाने जाणवली. प्रश्न जगाकडे पाहण्याच्या जीवनदृष्टीचा आहे.

जीवनाचा अवकाश विस्तारण्याचा आहे. रूढीवादाच्या कात्रीने नवविचारांचे पंख सातत्याने छाटत राहिलो तर आकाशात भरारी कशी घेणार? कालांतराने आकाशाची ओढच नष्ट होणार...

'ईस्लाम' मला जितका सहज सोपा, समानता मानणारा, मानवतावादी, बुद्धीवादी, विवेकवादी, पर्यावरणवादी, विज्ञानवादी, पुरोगामी विचारांना सामावणारा, लवचिक आणि परिवर्तनशील धर्म आढळला. 'मुसलमान' बहुतांश तितकाच स्थितीशील, कर्मठ आणि संकुचीत आढळला. याचे कारण, त्याच्यापर्यंत अन्य पुरोगामी विचार पोहोचणे दूरचे, सोडून द्या. मुळ क्रांतीकारी आणि परिवर्तशील ईस्लाम सुद्धा पोहोचलेला नाही. ईस्लामचे अतिशयोक्त कथाकथन किंवा मिथ्याकथन नियमीत ऐकवणारे प्रवक्ते स्वतः साचेबद्ध, रूढीवादी आणि भूतकाळात जगणारे लोक आहेत. मुस्लिमांना कथा ऐकण्याची आणि ऐकवण्याची त्यांनी सवय लावली आहे. ईस्लामच्या ऐतिहासिक गौरवात आणि पारलौकीक जीवनाच्या रम्य कथानकात तो रमून जातो. स्वतः विचार करणे बंद झाल्याने वर्तमान आणि भविष्याचे भान राहिलेले नाही. मुस्लिमातील शिक्षणाचा अभाव आणि वैचारिक दारिद्र्याचा रूढीवाद्यांनी पुरेपुर फायदा उचलला आहे. विचारवंत, पुरोगामी, समाजसुधारक विकलांग आहेत. राजकारणी आपला हेतू साध्य करण्यात व्यस्त आहेत. तर फुटकळ संस्था, संघटना आणि कार्यकर्त्यांची चलती आहे.... नवे काही रूजण्याची, उगवण्याची शक्यता धुसर आहे.

दैववाद आणि कर्मकांडात गुंतविणाऱ्या ईस्लामचा प्रचार आणि आचार शिकवणाऱ्या संघटनेला लाखो अनुयायी मिळाले आहेत. तरी, पारलौकिक मुक्तीच्या स्वार्थाने बरबटलेल्या लोकांचा, तो जमावडा राहणार आहे. 'आपण श्रेष्ठ आहोत', या अहंकारी भ्रमात, हे लोक स्वतः जगत राहतील आणि भ्रमांची विपूल पुर्नपैदास करत राहतील. त्यांच्याकडे जग बदलण्याची क्षमता नाही, कारण तसा विचार, दृष्टी, कृती आणि उद्दिष्ट नाही. अकृतीशील आणि स्थितीशील अवस्था मुस्लिमांना दिवसेदिवस अधिक दयनीय आणि कमजोर बनवत राहील. मुसलमानांना त्यांच्या बरबादीचे कारण सांगताना बाह्य शक्तीकडे बोट दाखवले जाते. पण प्रत्यक्षात मुसलमान स्वतःच आपल्या बरबादीचे कारण आहेत. या बाह्य शक्ती, मुस्लिमांच्या कमजोर परिस्थितीचा, जगभर केवळ फायदा उठवत आहेत.

ईस्लाम एक आंतरिक गहन सर्वांगीण शोध आहे. त्याच्या विचारात विविधता

आणि मतभेद असू शकतात. ईश्वरी एकत्व (वाहदत) आणि सामाजिक विविधता हे इस्लामचे वैशिष्ट्य आहे. 'वाहदत' एक गूढ आत्मशोध आहे. त्याला सर्वांनी एकाच प्रकारची बाह्यांगी दिखाव्याची चिन्हे मिरवून 'एकत्व' दर्शविण्याची गरज निश्चित नव्हती. बाह्यांगी 'एकत्व' उथळ मिरवणे आहे. ईस्लामशी याचे देणेघेणे नाही. राजकिय आणि इतर अनेक कारणांनी हिंदूमुस्लिमांचा सामाजिक अवकाश आक्रसला आहे. दुराव्यामुळे हिंदूना मुस्लिमांतील बाह्यांगी बदलात तालेबानशी साधर्म्य जाणवले. हिंदूमध्ये उमटणाऱ्या राजकीय प्रतिक्रियांचा विचार व्हायला हवा होता. आज दाढी, टोपी, झब्बा, सुरमा, साफा, बुरखा ही चिन्हेच मुसलमानाची ओळख बनली. त्याचे अतुल्य कर्तुत्व किंवा वैचारिक प्रगल्भता नव्हे ! भोंगळ चिन्हांवरची श्रध्दा संपवून कर्म सांगणारा धर्म, पुन्हा दिखाव्याच्या चिन्हांचा धर्म बनवला गेला ! हे खचित भूषणावह नाही. उथळ अस्मिता आणि गौरवामुळे स्तोम माजवण्यात मजा घेणाऱ्यांचे फावले. भोंदू, बेगडी लोकांना धर्मकार्यात सामील होण्याची सहज संधी मिळाली. कर्मकांडात रमणारा मुसलमान चांगला मानला गेला. असा थोरपणा मिरवणारे लाखो झाले. अप्पलपोटेपणा, आत्मकेंद्रितता आणि संधीसाधुपणा बळावला. प्रत्येकातील खुजेपणा लपविण्यासाठी, माणसाला तुच्छ लेखणारा, एक अनामिक, बिनचेहऱ्याचा, अमूर्त 'धर्म' श्रेष्ठ झाला. धार्मिक अहंकार, इर्ष्या आणि दुराभिमानाची लागण झाली. माणुसकी आटली. खुद्द रहिम, रहिमान म्हणवणारा अल्लाह, उम्मतवर निरंतर प्रेम करणारे प्रेषित, यांच्याच नावे धर्मवेडे लोकांचे मुडदे पाडायला सहज धजावू लागले. ईस्लामची वैचारिक ओळख दहशतवादी, कट्टरवादी आणि स्त्रियांची दडपणूक करणारा धर्म अशी बनली. जगात एका महान मानवी संस्कृतीला (सिव्हिलायझेशन) जन्म देणाऱ्या सृजनशील ईस्लामला आपण कोठे आणून ठेवले? साधा मानवतावाद मुसलमांनानी अंगीकारला असता तर जगाचे कल्याण झाले असते. देशासाठी आणि मानवी समाजासाठी काही केले असते तर विपुल प्रेमाचे धनी झाले असते. स्वार्थ त्यागाचा विचार लुप्त झाला असताना, हे कसे घडणार? ज्ञानाशी नाते तुटल्याने ही अवनती अवतरली आहे. यावर गंभीरपणे विचार करण्याची वेळ आली आहे.

मुसलमान 'सिर्फ पेट और जेब भरनेके लिए जी रहे हैं ।' असे एक जेष्ठ मौलाना नेहमी दु:ख व्यक्त करतात. याचा अर्थ, माणसाची ओळख असलेल्या 'ज्ञान आणि बुद्धी' चा विकास करणे मुस्लिमांनी सोडून दिले आहे. दारिद्र्यापेक्षा

वैचारिक दारिद्र्य ही मुस्लिमांची मूळ समस्या आहे. मुस्लिमांना आंतरिक समाज सुधारणेची सर्वाधिक गरज आहे. स्त्री-पुरूष समानता, बहुविधता, सर्वसमावेशकता, लोकशाही, बुद्धीवाद, वैज्ञानिक दृष्टिकोन आणि आधुनिकतेचा त्यांनी मन:पूर्वक स्वीकार केला पाहिजे. आत्मचिकित्सा, आत्मटिका आणि वैचारिक खुलेपणा अंगिकारणे ही पूर्वअट आहे. यातून समाजाचे शैक्षणिक, आर्थिक, सांस्कृतिक आणि राजकीय प्रश्न सोडविण्याचा मार्ग सापडू शकतो. समाजाला सत्ता आणि विकासात समन्याय्य वाटा मिळण्याची शक्यता यातूनच र्निमाण होईल !

मुस्लिम समाजाला ज्ञानाधारित समाज बनविणे, हे मुस्लिमांनी आपले ध्येय बनविले पाहिजे. त्यासाठी प्रत्येक व्यक्तीला आपला विकास करण्याची प्रत्यक्ष संधी निर्माण करावी लागेल. वैज्ञानिक समाजच इस्लामिक समाज होवू शकतो, यावर भरवसा आवश्यक आहे. यासाठी व्यापक वैचारिक चळवळ बांधण्याची तीव्र गरज आहे. २१ व्या शतकाची ही नितांत गरज आहे. वैचारिक दारिद्र्य न घालवता मुस्लिमांची राजकीय, आर्थिक आणि शैक्षणिक समस्या संपवता येणार नाही!

या वैचारिक, सांस्कृतिक, शैक्षणिक आणि सामाजिक परिवर्तनासाठी किमान दोन पिढ्यांना खपावे लागेल. त्यासाठी तज्ञ लोकांचे सहकार्य लागेल. हे काम अत्यंत कुशलतेने आणि व्यावसायिक कौशल्य वापरून करावे लागेल. शोध आणि संशोधन हाती घ्यावे लागेल. यासाठी संस्थात्मक रचना उभारावी लागेल. भौतिक सुविधा निर्माण कराव्या लागतील. किमान १० एक वर्षांचा कालबद्ध कार्यक्रम आखून, प्रत्येक जिल्ह्यातून किमान १००० स्त्री-पुरूष कार्यकर्ते प्रशिक्षित करावे लागतील. हे प्रशिक्षित कार्यकर्ते शिक्षण, आरोग्य, तंत्रविज्ञान विकास, रोजगार, साहित्य, कला आणि संस्कती, मानवाधिकार आणि एकंदर विकासाच्या प्रश्नावर काम करतील. लोकांमध्ये माहिती पोहोचवणे, जागृती घडविणे, शिकण्याची जिज्ञासा निर्माण करणे, संघटन बांधणे असे अनेकविध काम करतील. हे कार्य किमान महाराष्ट्र राज्यात प्रायोगिक पद्धतीने करावे लागेल.

यासाठी प्रथम, ब्रेन स्टॉर्मिंग आणि कृती कार्यक्रम आखण्यासाठी आणि त्याची अंमलबजावणी करणारी 'सेंटर फॉर रेनेसाँ' ही संस्था उभारावी लागेल. त्यांनतर याला 'मुस्लिम युनिव्हर्सिटी' ची स्थापना करून जोड द्यावी लागेल. या दोन संस्था समाजाच्या संपूर्ण परिवर्तनासाठी परस्पर पूरक कार्य करतील. या माध्यमातून विचारंवत, विविध क्षेत्रातील तज्ञ, कार्यकर्ते यांचे जाळे निर्माण होईल.


या संस्थांच्या माध्यमातून केवळ महाराष्ट्र नव्हे तर भारत आणि जगाशी जोडले जाण्याची आणि मुस्लिम समाजाच्या परिवर्तनाला प्रचंड उर्जा आणि गती प्राप्त होण्याची शक्यता निर्माण होईल. या संस्थेसाठी ५ एकर जागा, इमारत, पगार आणि इतर खर्चासाठी मुस्लिमांना किमान १० कोटी रुपयांची गुंतवणूक करावी लागेल. हे काम आम्ही प. महाराष्ट्र आणि कोकणासाठी कोल्हापुरातून आरंभले आहे. अधिक माहिती माझी इतर पुस्तके पाहावीत.

शेवटी, आपण संपूर्ण देश आणि भारतीय समाजाच्या हिताला प्राधान्य दिले पाहिजे. भारतीय समाजाचा एक घटक म्हणूनच विचार केला पाहिजे. सर्व क्षेत्रात योगदान दिले पाहिजे. मानवजातीचा विचार टाळून मुस्लिमांचा विचार होऊ शकत नाही. केवळ काही शक्ती जाणीवपूर्वक मुस्लिमांचे राजकीय आणि एकंदर खच्चीकरण करण्याचा प्रयत्न करतात. त्यांच्यापासून संरक्षण आणि ऐतिहासिक व अन्य कारणांनी आलेले मागासलेपण नष्ट करण्यासाठी मुस्लिम म्हणून विचार करावा लागेल. पण भारतापुरते बोलायचे तर, आपले लक्ष्य हिंदू आणि इतर समाज घटकांसोबत एकजीव होऊन बहुमत घडविले पाहिजे आणि बहुमतांचा भाग बनलो पाहिजे.

एनआरसी आणि नागरिकतेच्या पुस्तिकेत, हे काय? असा कोणाला प्रश्न पडेल. पण आजच्या कुंठीत अवस्थेमध्ये परिवर्तन घडविण्याची धडपड सुरू झाली नाही. तर दरवेळी असे उद्‌भवणारे वाद संपवत राहण्यातच आपण बरबाद होत राहू! म्हणून मला समाजांतर्गत आणि वैचारिक परिवर्तनाची तीव्रतने आवश्यकता जाणवते. अन्यथा कोणाला हिणवण्यात, डिवचण्यात किंवा कमी लेखण्यात माला काही स्वारस्य नाही. माझी कडवट टिका सहन करण्याची आणि विचार करण्याची सर्वांना अल्लाह बुद्धी देवो, ही प्रार्थना! ◆

संदर्भ :

1. Citizenship and its Discontents – Niraja Gopal Jayal
2. Citizenship in India – Anupana Roy
3. Politics of Inclusion – Zoya Hasan
4. Renaissance for Knowledge society – Humayun Mursal
5. Report of Sachar committee 2007
6. UN's world migration Report 2017
7. Citizenship Act 1955
8. Constitution of India: chapter II, Shedule 5th and 6th
9. Citizenship (amemndment) Acts1986, 1992, 2003, 2005, 2015
10. Citizenship (amendment) Bill 2019
11. The citizenshop (registration of citizens and issue of national identity cards) Rules 2003
12. Foreigners Act 1946
13. Foreigners (Tribunals) order 1964
14. Foreigners (Traibunals) Amendment order 2019
15. Sarbananda Sonowal Vs Union of India and Anr 2005 (SC)
16. Lal babu Husain and others Vs. Electoral registration officer and others SC 1995
17. VC Dr Faizan Mustfa, Ex. Solicitor general Mr Harish salve, SC Ad Prashant Bhushan, Ipsita Chakaravarty & Viyaayat Lalwani, Sangeeta Barooah Pisharoya, Mukesh Rawat, Shoaib Daniyal and so many eminent unmentioned writer's blogs, articles and u tube vedios have helped me to understand the subject and write, I'm indebted to all of them. ◆



लेखकाविषयी..

लेखक नव-मार्क्सवादी विचारधारेच्या 'श्रमिक मुक्ती दल' चळवळीत १९८५ मध्ये समाजिक कार्यकर्ता म्हणून सहभागी झाला. या चळवळीमुळे जात, वर्ग, लिंग, धर्म आणि संस्कृती यांची सामाजातील गुंतागुंत, तसेच टिकावू शेती, पाणी, पर्यावरण, वस्तू, उर्जा, बांधकाम क्षेत्रातील नवतंत्रज्ञान, शहरांची पुनर्रचना, कृषिउद्योग इ. यांच्याशी निगडीत पर्यायी विकास नवनितीचे प्रश्न आणि राजकीय हितसंबंधांचा संघर्ष जाणून घेण्यास मदत झाली. लोकवैज्ञानिक के. आर. दाते आणि श्री. अ. दाभोळकर यांच्यासोबत काम करताना शेती, उद्योग, सेवाक्षेत्र आणि खासकरून मुक्त शिक्षण पद्धती, इ. संबंधी धोरणविषयक नव्या जाणिवा विकसीत होण्यास आणि 'पर्यायी जागतिक व्यवस्था शक्य आहे' यावर विश्वास दृढ होण्यास मदत झाली. सुरुवातीची काही वर्षे सर्वांत पिडीत वर्ग म्हणून एससींसोबत काम केले, विद्रोही सांस्कृतिक चळवळीसोबत काम केले.

१९९२-९३ च्या मुंबई दंगलीने मोठा धक्का दिला आणि तेव्हा राजकीय परिस्थितीची निकड जाणवून खासकरून अल्पसंख्य मुस्लिम समाजासोबत काम करण्याचा निर्णय केला. पुढे २००२ च्या नरसंहाराच्या काळात श्रमुदच्या सहकाऱ्यांसोबत 'हिंदी हैं हम...हिंदोस्ताँ हमारा' (H५) चळवळीची स्थापना केली. मुस्लिमांचे मागासलेपण, राजकिय बहिष्कृतता आणि वैचारिक परिवर्तनावर संपूर्ण लक्ष केंद्रित केले. २००४ मध्ये सच्चर समितीच्या स्थापनेपूर्वीच मुस्लिमांच्या सर्वांगीण मागासलेपणाचा अभ्यास व विकासाची

योजना आखण्यासाठी 'मुस्लिम विकास आयोगाची' मागणी महाराष्ट्र सरकारकडे केली. सतत केलेल्या आंदोलनाने २००९ साली डॉ. मेहमदूर रेहमान अभ्यासगट स्थापन करण्यात यश आले. या आयोगाकडे मुख्यतः 'मुस्लिमांच्या विकासाचे मॉडेल', '५ टक्के कर्नाटक धर्तीवर आरक्षण कोटा', 'मुस्लिम युनिव्हर्सिटी' आणि गुरखा कौन्सिलच्या धर्तीवर 'वैधानिक विकास कौन्सिल' या प्रमुख मागण्या मांडल्या. आरक्षणाची मागणी मान्य झाली. पुढे मुस्लिमांच्या धार्मिक अधिकारावर अतिक्रमण करणारे जाचक 'जीआर' बदलासाठी लढा केला. जनतेत राजकिय जागृतीच्या अभावी इतर मुद्दे मार्गी लागले नाहीत.

२०१५ साली 'आधुनिक ज्ञानाधारित मुस्लिम समाजाची' उभारणी आणि '२१व्या शतकाला अनुरूप मानव संसाधन विकास' च्या उद्दिष्टाने 'रेनेसाँ'ची संकल्पना मांडली. 'सेंटर फॉर रेनेसाँ' आणि 'मुस्लिम युनिव्हर्सिटी' या दोन संस्थांच्या माध्यमातून मुस्लिमांचे शैक्षणिक व सर्वांगीण विकासाचे मॉडेल मांडले. 'मुस्लिम फौंडेशन फॉर रेनेसाँ' ही संस्था स्थापन केली. सध्या प. महाराष्ट्रासाठी कोल्हापूर येथे ऑफिस आणि हेरले ता. हातकणंगले येथे सव्वा एकर जागेत सेंटर उभारणीचे काम जारी आहे. ब्रेन स्टॉर्मिंग आणि विविध प्रशिक्षण कार्यासाठी सेंटरची रु. १० कोटींची ही योजना आहे. सध्या सार्वत्रिक मोफत डिजिटल साक्षरता मोहिम सुरू आहे. सर्व विचारवंत, तज्ञ, तंत्रज्ञ आणि सामाजिक कार्यकर्ते आणि जनतेने यात योगदान द्यावे असे आवाहन! ◆

लेखकाचे इतर लिखाण

- रेनेसाँ, फॉर नॉलेज सोसायटी
- मुस्लिम युनिव्र्हसिटी ॲन्ड सेंटर फॉर रेनेसाँ : ड्रिम अँड ॲक्शन प्लॅन
  ३) हाँ, मुमकीन है !
- कोंडी आरक्षणची आणि मुस्लिमांची
- जनहिताची निवडणूक : मतांच्या प्रमाणात प्रतिनिधित्वाची !
- बाबरी ते कणेरी
- डिजीटल लिटरसी अभियान : मक्सद और मंझील
- सच्चर समिति अहवाल
- स्वायत्ततेचे प्रयोग : तेलंगणा, विदर्भ आणि झारखंड
- श्रीकृष्ण कमिशन संक्षिप्त अहवाल
- मंदिर-मस्जिदी निकालाचा न्याय्य अन्याय

सीएए आणि एनआरसी

राज्यघटना बदलणारे सूत्र

सरकारने 'आधार कार्ड'ला नॅशनल आयडेंटिटी कार्ड आणि 'आधार नंबर'ला नॅशनल आयडेंटिटी नंबर घोषीत करणारा कायदा करावा. मग, भारतीय नागरिकांची नोंदवही म्हणजे 'एनआरसी' बनविण्याचे कारकुनी आणि तांत्रिक काम सरकारने आपल्या ॲथॉरिटीमार्फत निवांत करावे. त्याचा जनतेशी काय संबंध? यासाठी अकारण 'एनआरसी'च्या जाचक, अन्यायकारक आणि अनावश्यक कायद्यांची गरजच काय? या कायद्याच्या अंमलबजावणीसाठी एवढी प्रचंड यंत्रणा, नोंदण्या, नोटिशी, सुनावण्या, कोर्ट-कचेऱ्या, दंड-शिक्षेची गरज काय? डिटेन्शन कॅम्पची भिती आणि जनतेचा छळ कशासाठी? सरकारने अब्जावधी रूपयांचा खर्च कशासाठी करायचा? दस्तऐवज हा नागरिकांचा मुलभूत हक्क आहे आणि दस्तऐवज देणे ही सरकारची प्राथमिक जबाबदारी! त्यामुळे सरकारने प्रत्येक भारतीयाला महत्वाचे दस्तऐवज मोफत मिळण्याचा हक्क देणारा कायदा करावा! आजचे एनआरसीचे सर्व कायदे रद्द करावेत. न रहे बाँस न बजे बाँसुरी!

'सीएए' म्हणजे धर्माच्या आधारे नागरिकत्व देणारा कायदा! भारतीय राज्यघटनेच्या तत्वाविरुद्ध असलेला कायदा बहुमताच्या जोरावर घुसडून राज्यघटना बदलण्याचा हा प्रयत्न आहे. धार्मिक आधारावर समाजाची फाळणी घडवून असंतोष माजवण्याचा हा अमानुष प्रयत्न आहे.

₹१००